TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

# वीर विनायक




वा. गो. देशपांडे

UNIVERSAL
LIBRARY
OU_192017
UNIVERSAL
LIBRARY

OUP—851—5-8-74—15,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M9232 D45V Accession No. M2561

Author દેશપાંડે વા. ગો

Title વીર વિનાયક.

This book should be returned on or before the date last marked below

निलय प्रकाशन १ लें

# वीर विनायक

मूल्य २ रुपये


वा. गो. देशपांडे

*** प्रकाशक व मुद्रक
ग. वि. देशपांडे
विजय प्रकाशन
३६ नारायण, पुणे २.

प्रथमावृत्ति १९५२

सर्व हक्क प्रकाशकाधीन

*** मुद्रणस्थळ
इंदिरा प्रेस,
२७० सदाशिव, पुणे २.



प्रिय मित्र यशवन्त कृष्ण केळकर यांस—

तात्या ! तूं व मी दोघांनीं स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचें चरित्र लिहावयाचं ठरविलं. पण अचानक तुला देवाघरचं बोलावणं आलं आणि तूंही कर्तव्यतत्परतेनं निघून गेलास. मात्र आपलं कार्य अपुरं राहिलं. तें पुरं करण्याचा मी हा अल्पसा प्रयत्न केला आहे.

तें हें चरित्रात्मक पुष्प तुलाच अर्पण.

वा. गो. देशपांडे

राजकारणाला धर्म आहे नि धर्माला राजकारण आहे. अिटाली-मध्यें जन्मलेल्या रामदासांना मॅझिनी म्हणतात. हिंदुस्थानांत जन्मलेल्या मॅझिनीला रामदास म्हणतात. बाकी दोघेही अेकच सांगतात कीं, राज-कारण धार्मिक असेल तरच तें पवित्र आहे व धर्म राजकीय असेल तरच तो पवित्र आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर

# 'वीर विनायका'चें स्वागत

दि. १० मे १९५२ ला पुण्यास अभिनव भारताचा सांगता समारंभ आणि भारतीय क्रांतियत्नांत बलिदान केलेल्या हुतात्म्यांचा स्मरणदिन वीर सावरकर यांचे नेतृत्वानें मोठ्या प्रमाणावर साजरा केला जात असतांच हें 'वीर विनायक' या शीर्षकाचें स्वातंत्र्य वीरांचें अद्ययावत आणि आटोपशीर चरित्र प्रसिद्ध होत आहे, हा चांगला योग आहे. ज्या भारतीय क्रांतिपर्वाची स्वातंत्र्यप्राप्तीनें समाप्ति झाली त्या क्रांतिपर्वाचे द्रष्टे आणि अपक्रमशील पुढारी वीर सावरकर होते. या पुढारीपणामुळें आलेल्या महान नि प्राणघेण्या संकटाशीं अंजुन त्यांना पुरून सावरकर उरले. त्यांच्या प्रज्ञेचें तेज जसें अंदमानांत जाण्यापूर्वी होतें तसेंच नंतरहि जगज्जगांत राहिलें, त्यांचा आत्मप्रत्यय अतूट राहिला, त्यांची प्रेरक कार्यक्षमता जागती राहिली, हें अेक आश्चर्य होय. सावरकरांच्या जीवनाला जें अेक अद्भुतरम्यतेचें तेजोवलय मनचक्षूंना दिसतें तें त्यामुळेंच. अंदमानांतून परत आल्यावर नवीन कांहीं न करतां पूर्वार्जित प्रतिष्ठेच्या शिदोरीवर त्यांना कालक्रमणा सहज करतां आली असती. त्या सुस्थपणामध्यें कदाचित त्यांना मान-सन्मानहि अधिक लाभला असता. परकीय राज्याकडून झालेल्या छळानंतर स्वकीय लोक आणि राज्यकर्ते यांचे-कडूनहि छळ सोसण्याचे प्रसंग त्यांना आले नसते. १९१४

मध्यें लो. टिळक मंडालेहून सुटून आल्यावर त्यांनी संन्यास घ्यावा, काशीला जावें, गीताप्रवचनें करीत कालक्रमणा करावी अशा सूचना करण्यांत आल्या होत्या. पण त्या सूचना जशा टिळकांनीं क्षणार्धांत अव्हेरल्या. तद्वतच १९२४ नंतर वीर सावरकर यांनी केवळ सामाजिक कामांत रमून बुडून जावें असें परकीय राज्यालाहि वाटलें असेल. पण ती सूचना मानली जाणार नाही हें निश्चित असल्यानें त्यांनीं त्यांच्यावर बंधनें घातली. सरकारी बंधनें नसलेले लोक दीर्घ शिक्षेच्या अनुभवाच्या कटु घुटक्यानतर आपण होऊन बंधनें पत्करतात. उलट वीर सावरकरांवर बंधनें घातलीं असतांहि ते त्या बंधनाचे टोकांवर जाऊन पर्यायानें राजकारण करीत होते. त्यांच्या त्या वेळच्या सामाजिक, धार्मिक व्याख्यानांवर कित्येक वेळा रूपकानें राजकीय प्रचार केल्याचा संशय सरकारला आला होता. पण त्यांना यासाठीं छेडण्यास आलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना सावरकरांनीं उलट कोटिक्रमानें अितकें गांगरून टाकलें, कीं या भाषणासाठीं सावरकरांना पेचांत टाकण्याचा उद्योग केल्यास सरकारलाच पेंच पडेल अशी भीति त्यांना वाटली असावी.

बंधविमोचनाची उत्स्फूर्त प्रेरणा हा सावरकरांच्या महनीयतेचा मोठा अंश आहे. या प्रेरणेनें स्वकीय—परकीय बंधनांशीं झगडले. बंधनांचा त्यांना बाऊ वाटण्याअैवजीं बंधन घालणाऱ्यांना त्यांचा बाऊ वाटावा असा तेजस्वीपणा त्यांनीं वेळो-

वेळी प्रगट केला. स्वातंत्र्य लक्ष्मीचा जयघोष भारतांत प्रथम विशीच्या आसपास असलेल्या वीर सावरकरांनीं केला. पण त्याचे मागें बुद्धिनिष्ठ विचारसरणी, आणि अितिहास सिद्ध मार्गाचें संशोधन हें होतेंच. देशभक्तीच्या अुत्कट भावनेला हे दोन पंख होते. म्हणून त्यांची क्रांतीची भरारी केव्हांही निव्वळ भावनावश नव्हती. भावनावशतेला बुद्धिवादाची जोड सतत होती.

केवळ राजकीय क्रांतिकारी आणि नेते सावरकर असते तरीहि त्यांचें नांव भारताचे अस्तित्व असेपर्यंत स्मरणीय झालें असतेंच. पण त्यांचें मूलभूत व्यक्तित्व त्या एका क्रांति-कार्यापेक्षांहि मोठें, अुदात्त आणि समावेशक आहे. ते विहंगमाप्रमाणें प्रतिभेच्या झेपी घेणारे कवी आहेत. बुद्धि-वादाच्या निकषावर सामाजिक रूढी घासून घेणारे सुधारणा-प्रेरक आहेत. अनेक विषयांत आपली बुद्धि चालवून सामान्य लोकाना दिसते त्यापेक्षां पलीकडचे पाहणारे द्रष्टे आहेत. त्यांचें वक्तृत्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारें आहे. सर्व जग अुलटे चालत असलें तरी आपल्याला पटलेला विचार, अुच्चार आणि आचार चालू ठेवणारे ते निश्चयाचे मेरू आहेत.

जे शिक्षेला किंवा छळाला भीत नाहींत त्यापैकीं अनेक लोक जननिंदेला भितात. जननिंदा किंवा जनस्तुति यांच्यावर दृष्टि ठेअून आपल्या मनाला मुरड घालतात. वीर सावरकरांनी हिंदुत्वाचें राष्ट्रीय भूमिकेनें स्पष्टीकरण आणि समर्थन केलें, तें

असेंच लोकांना पचण्यास जड, कित्येकांना बोचणारें आणि कित्येकांच्या स्वार्थावर गदा आणणारें असल्यामुळें त्याला कडाडून विरोध झाला. पण वीर सावरकर सर्व बुद्धिसामर्थ्य वेचून परोपरीनें त्याचें समर्थनच करीत राहिले. त्याप्रमाणेंच हिंदूंच्या भोळ्या समजुती आणि आचार यांवर त्यांनीं अुड-विलेले बुद्धिवादाचे निर्भीड कोरडे अनेकांना झोंबणारे आणि विव्हल करणारे झाले. पण याहि संबंधात विरोधकांवर चिडून न जातां पुनः पुन्हां साधार कोटिक्रमानें सावरकरांनीं आपली मतें मांडण्याचें सोडलें नाहीं. क्रांतिकारकपणाव्यतिरिक्त सावरकर–चरित्राला तितकीच तेजस्वी अनेक अंगें आहेत, त्यापैकींच हें अेक होय.

अशा थोर पुरुषाच्या आयुष्याचें संकलित चित्र, जिवंत अितिहास–लेखकाच्या धाटणीनें लिहून अनेक पुस्तकांतून लोकांपुढें मांडले जाणें अवश्य आहे. त्यायोगें अनेकांना देशार्थ आणि लोकोद्धारार्थ त्याग आणि कष्ट करण्याची स्फूर्ती मिळणार आहे. प्रस्तुत पुस्तक अशाच प्रकारचें आहे. श्री. शि. ल. करंदीकर यांचे मोठें सावरकर चरित्र किंवा सावरकरांचें होअून घातलेलें विस्तृत्र आत्मचरित्र वाचण्याची शक्ति आणि फुरसत नसणारे अनेकशः लोक आहेत. विद्यार्थी आणि मध्यमवयस्क असेहि त्यांत आहेत. त्यांना या पुस्तकांत आलेले अित्थंभूत नि क्रमवार चरित्र फार अुपयुक्त आहे. श्री. देशपांडे यांनीं स्वयंप्रेरणेनें हें पुस्तक लिहून आणि प्रसिद्ध करून सावरकर विषयक वाङ्मयांत महत्वाची भर घातली आहे.

१८।४।५२ ग. वि. केतकर

# कृतज्ञता

हें चरित्र अर्धवट लिहिलें असतांच ' दैनिक भारत 'च्या व्यवस्थापकांना दाखविलें. १० मेस साजऱ्या होणाऱ्या अभिनव भारत सांगता समारंभाचे कार्यवाह श्री. श्री. पु. गोखले यांनाही दाखविलें. त्यांनीं अनेक मोलवान सूचना केल्या. त्या मला पटल्या व मी त्या स्वीकारल्याही. त्याचप्रमाणें स्वातंत्र्यवीर सावरकरांचे चिरंजीव विश्वास सावरकर यांनीं स्वातंत्र्यवीर सावरकरांचें छायाचित्र पुरविलें व लेखनांत ' अ 'ची बाराखडी असावी अशी अिच्छा व्यक्त केली. मी प्रथमपासूनच ती लिपी वापरत असतो; पण ' विश्वास ' अिच्छेनें अधिक कसोशिनें ती या चरित्रांत अुपयोगिली आहे.

आतां चरित्र तर लिहिलेंच. पण प्रस्तावना ? सावरकर चरित्र लिहितांना 'अधिकार वाणी'नें लिहिणारा प्रस्तावनाकारच हवा. श्री. शि. ल. करंदीकर यांच्या चरित्रास साहित्य सम्राटांनीं प्रस्तावना दिली. मीं श्री. ग. वि. केतकारांना भेटलों व त्यांना प्रस्तावना मागितली. त्यांनींही ' वीर विनायकाचें स्वागत 'पर चार शब्द लिहिले.

ही सर्व सिद्धता झाल्यानंतर हें चरित्र प्रकाशित करण्याची व त्याची सुंदर सजावट करण्याची जोखमीची जबाबदारी माझे चुलते चित्रकार श्री. ग. वि. देशपांडे यांनीं अुचलली व ती अुत्तम रीतीनें पार पाडली.

इंदिरा प्रेसचे श्री. ज. शं. मेढेकर यांनीं व त्यांच्या कामगारांनीं पुस्तकाच्या छपाईचें काम वेळेवर व सुबक केलें. मुखपृष्ठ श्री. सहस्त्रबुद्धे 'बालोद्यान प्रेस' यांनीं सुंदर छापून दिले.

प्रसिद्ध ब्लॉक मेकर श्री. मोघे यांनीं ब्लॉक्स सुबक व जल्द करून दिले. तसेच श्री. बाबूराव ठोकळ 'श्री लेखन वाचन भांडार' यांनी विक्रीची जबाबदारी स्वीकारली व अभिनव भारत सांगता समारंभाच्या कार्यकारी मंडळानें पुस्तक १० मेस प्रसिद्ध करण्याचा योग जमवून दिला; तेव्हां त्यांच्याबद्दल आणि पू. बाळशास्त्री हरदास व माननीय श्री. गोडे या थोर व्यक्तींनीं अभिप्राय देऊन व प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहाय्य करून उपकृत केलें आहे त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें माझें आद्य कर्तव्य आहे.

१० मे १९५२ — वा. गो. देशपांडे

# पुरस्कार

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हें नांव आधुनिक भारतांतील पराक्रमाचें, स्फूर्तीचें व तेजस्वी निर्भयतेचें प्रतीक व्हावें अितकें त्या नांवाचें मोल आहे. सावरकरांचें अुत्स्फूर्त चरित्र त्रिकाळचे संपादक श्री. शिवरामपंत करंदीकर यांनीं लिहिलें असून स्वतः सावरकरही खंडशः आपलें आत्मचरित्र लिहित आहेत. सावरकरांनीं स्वतः लिहिलेल्या त्यांच्या आत्मचरित्रांतील तेजस्विता, अितर कोणीही त्यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकांपेक्षां आगळीच असणार हें अुघड आहे. तथापि श्री. वा. गो देशपांडे यांचें हें पुस्तक भारतांतील या सर्वश्रेष्ठ विभूतींच्या जीवनाचा माध्यमिक शालेय शिक्षण घेत असलेल्या मुलांना जसा परिचय करून देअील तसा त्यांच्या मोठ्या चरित्र ग्रंथांनीं होणार नाहीं. श्री. देशपांडे यांनीं हें चरित्र लिहून विद्यार्थ्यांचे दृष्टीनें अतिशय मोलाचें कार्य केलेलें आहे, याबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. आज सावरकरांच्या नांवाला लोकप्रियतेची व सहज सन्मानाची बैठक नाहीं. भारत देशांतील लोक आपला वीर व द्रष्टा ओळखावयास असमर्थ आहेत. पण सावरकरांच्या जीवनाचा व तत्त्वज्ञानाचा सूक्ष्म अभ्यास करणाऱ्या व्यक्तीला भावी वैभवशाली व मानवतेचें पुनर्रचनेचें कार्य करूं शकणाऱ्या भारताचे सावरकर हेच द्रष्टे आहेत हें मान्य करावेंच लागेल. जीव-

नाच्या सर्व दालनांत ते आपल्या अपूर्व तेजानें तळपले आहेत. रेडियमच्या कणाप्रमाणें अखंड स्फुरणशाली असणारें त्यांचें जीवन अनेकांच्या जीवनांत कर्तृत्वाची महान् स्फूर्ति अुत्पन्न करील. या भारत राष्ट्राच्या सर्वश्रेष्ठ गुणसंपत्तीचें महान् प्रतीक असलेल्या जीवनाचा श्री. देशपांडे यांनीं विद्यार्थ्यांना या पुस्तकाच्या रूपानें करून दिलेला परिचय त्यांचे जीवन ध्येयवादानें, पराक्रमानें व त्यागानें अुजळावयास कारणीभूत होवो असें मी अिच्छितों.

अक्षय्यतृतीया
२७-४-५२

बाळशास्त्री हरदास

# पालकांसाठीं

' स्वातंत्र्यवीर सावरकरांचं ' चरित्र लिहावं असं माझ्या मनांत जेव्हां प्रथम आलं त्यावेळीं मी अिंग्रजी सहावींत शिकत होतों. त्याचवेळीं श्री. शि. ल. करंदीकर यांचें चरित्रकथन वाचून संपविलें. पण त्या वेळीं तसें चरित्र लिहिणें मला जमलं नाहीं व शक्यहि झालं नाहीं.

पण सुमारें वर्षापूर्वी माझ्या मनानं पुन्हां अुचल खाल्ली व मी येथील ' महाराष्ट्र ग्रंथालयांत ' जाअून चरित्र लिहिण्याच्या दृष्टीनं ' सावरकरांचें आत्मचरित्र ' श्री. शि. ल. करंदीकरांनीं लिहिलेलें ' सावरकर चरित्र कथन ' श्री. भट यांचें ' अभिनव भारत ' हीं व अितरहि अनेक पुस्तकें अभ्यासिलीं. अेवढ्या-वरून स्वातंत्र्यवीरांचं चरित्र बऱ्हंशी लिहितां येणं शक्य होतं.

प्रस्तुत चरित्र लिहित असतां प्रथम तें लहान मुलांसाठीं लिहावें असा विचार होता. परंतु पुढें तो अनेक मित्रांच्या सूचनेमुळें बदलावा लागून थोरांनीं वाचलें तर त्यांनाही तें अुपयुक्त वाटावें व व्हावें म्हणून लिहिण्याची धाटणी थोडीबहुत बदलावी लागली; तरीही मूळ प्राधान्य मुलांना आहे हें विसरून चालणार नाहीं.

लहान मुलांचीं मनं ओल्या मातीसारखीं असतात. माती ओली आहे तोंवरच त्याला अिष्ट तें वळण देतां येतें.

बालमनाचंही असंच आहे. या वयांत त्यांची मनं कोवळी असतात. यावेळीं त्यांवर जसे संस्कार करावेत तसे ते पुढें चिरकाल टिकून राहतात. किंबहुना मुलाचें मोठेंपण हें त्याच्या लहानपणचें प्रतिबिंबच असतें असें म्हटल्यास चुकणार नाहीं.

मुलांच्या मनाची ही ठेवण लक्षांत घेऊनच पालकवर्गानं त्यांच्या सभोंवतालचं वातावरण निर्मळ राखलं पाहिजे.

मुलांना राजकारणाचं सोयरसुतक तें काय? अगर त्यांना त्यांतलं कळणार तरी काय? तेव्हां कोणत्याही राजकारणी पुढाऱ्याबद्दल आदर अगर अनादर या दोन्हीही गोष्टी त्यांजपासून दूरच असतात. मात्र आपण राजकीय पुढाऱ्यांबद्दल बोलतांना ज्या भावना वरचेवर दर्शवूं त्या त्यांच्या डोळ्यांवर, मनावर व कानांवर आदळत गेल्यास त्यांचीही मतं: तींच बनतात. आणि वडिलांच्या मतानं राजकारणांत जो तिरस्कृत असामी असेल त्याविषयीं आपोआपच मुलांना तिटकारा वाटूं लागतो आणि पुढें तो इतका वाढतो कीं, दुर्दैवानें तिरस्कृत झालेल्या त्या व्यक्तीचें नांवही त्याला सहन होत नाहीं. त्याच्या कपाळावर आठ्या चढतात, मुखांतून शिव्यांची लाखोली वाहिली जाते. त्याच्या आयुष्याचा, त्यानें केलेल्या तळमळीच्या कार्याचा तो काडीमात्र विचार करण्यास तयार होत नाहीं,

आजची वस्तुस्थिति ही अशी आहे. आपल्या दृष्टीनं विरुद्ध असलेल्या पुढाऱ्याविषयीं मुलांच्या मनांत द्वेष निर्माण करणं ही गोष्ट आपण आतां सोडली पाहिजे. अशा पुढाऱ्यांचीं खास

मुलांसाठीं लिहिलेलीं चरित्रं पक्षोपपक्षाचा विचार न करतां दिलीं पाहिजेत. त्यांचीं मनं आपण निर्मळ व चिकित्सक बनविलीं पाहिजेत.

आणि या दृष्टीनं मी 'चरित्र' लेखनास हात घालण्याचें धाडस केलें. आज मीं सावरकर चरित्र निवडलें आहे. यालाही कारणें तशींच आहेत. लहान सहान खेड्यापाड्यांतूनही त्यांच्याविषयी अितका गैरसमज व द्वेष पसरविला गेला आहे कीं, हा गैरसमज व ही गैरप्रथा तशीच राहूं दिली तर तिचे परिणाम अनिष्ट निदान 'भावी पिढी'वर तरी अनिष्ट खास होतील. हें स्पष्ट दिसणारे 'भावी अनिष्ट' भस्मासुरी परिणाम टाळणं व राजकारणांतील गैरसमजाच्या चक्र्यांत बाळपिढीला न घुटमळवणं हें पालकवर्गाचं आद्य कर्तव्य आहे.

याच दृष्टीनं यानंतर महात्माजी, पंडितजी व सरदारजी यांचीही चरित्रें मी लिहावयास घेणार आहे.

हीं चरित्रें लिहितांना ही खबरदारी अवश्य बाळगली आहे कीं, प्रतिपक्षियांविषयीं तिरस्कार असन्न होअील असे प्रसंग वा शब्द निवडून **होतां होअील तों** टाळले आहेत.

**लेखक**

# अ भि प्रा य

श्री. वा. गो. देशपाण्डे यांनीं लिहिलेलें " वीर विनायक " या शीर्षकाचें स्वातंत्र्यवीर सावरकर यांचें चरित्र मी वाचून पाहिलें. हें चरित्र सुबोध भाषेंत लिहिलेलें असून विद्यार्थीवर्ग व लहान मुलें यांना उद्बोधक वाटेल यांत संशय नाहीं. वीर सावरकरविषयक बरींच पुस्तकें आजवर मराठींत प्रसिद्ध झालीं आहेत, परंतु तीं सर्व प्रौढ भाषेंत असल्यामुळें सामान्य जनतेस समजण्यास कठीण. प्रस्तुत चरित्र सुगम असून तें सामान्य जनतेला अुपयोगी पडेल असें मला वाटतें. थोर लोकांचीं चरित्रें हीं नेहमींच स्फूर्तिदायक असतात. विशेषत: तीं वाचल्यानें लहान मुलें व विद्यार्थी यांच्या मनावर अिष्ट तो परिणाम होतो. वास्तव सुगम भाषेंत लिहिलेलीं थोर विभूतींचीं चरित्रें जितकीं जास्त लिहिलीं जातील तितकीं पाहिजेच आहेत. या दृष्टीनें पहातां श्री. देशपाण्डे यांचा हा प्रथम प्रयत्न सर्वतोपरी अभिनंदनीय म्हटला पाहिजे.

पुणें ४
दि. २।५।१९५२.

प. कृ. गोडे
क्यूरेटर,
भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मन्दिर.


वि. दा. सावरकर

# — मुलांनो —

अेके दिवशीं —

संध्याकाळचीं जेवणं झालीं आणि आम्हीं ओटीवर आलों. नेहमींच्या रिवाजाप्रमाणं लहान लहान मुलं माझ्याभोंवती गोळा झालीं नि म्हणूं लागलीं, 'दादा! गोष्ट सांग ना अेखादी.'

माझ्याजवळच्या गोष्टी म्हणजे रामाचा अक्षय अशा बाणांचा भाता थोडाच होता. सांगून सांगून माझ्याजवळच्या गोष्टी संपल्या होत्या व मीं आतां या मुलांना काय सांगावें याचा विचार करूं लागलों, तोंच एक गंमत आठवली.

जमलेल्या मुलांपैकीं प्रत्येकाला मीं विचारलें कीं, मुलांनो, आज तुम्हीं घरीं काय जेवलांत?

प्रभाकर म्हणाला, 'मीं भात खाल्ला.' सुमन म्हणाली, 'मीं भाकरी खाल्ली.'

प्रत्येकानें जें जें आपण खाल्लें तें तें सांगितलें.

मीं सहज म्हटलें, 'काय रे मुलांनो ! तुम्हांला ही भाकरी कोणी वाढली ?'

'आईनें !' झटकन् सर्वांनीं उत्तर दिलें.

मीं म्हटलें, 'भाकरी आईनें वाढली, कबूल. पण ती तुम्हाला मिळाली कुणामुळं नि कशी हें माहीत आहे कां ?'

मुलांना कांहीं सांगतां आलें नाहीं; तेव्हां मीच म्हणालों, 'ऐका तर.'

'आपला तो रंगू आहे ना ? त्याचे वडील रादबा. नेहमीं शेतावर जातात. असेच अनेक लोक कष्ट करतात, शेतावर जातात, सकाळ-पासून संध्याकाळपर्यंत राबतात, उन्हांत घामानं थबथबतात, मेहनत मशागत करतात, नांगरतात, पेरतात, कोळपतात. शेतकऱ्याची कारभारीण उन्हातान्हांतून रान तुडवीत येते. घरधन्याला चटणी—भाकर देते. शेतकऱ्यांचीं गुडघ्याएवढीं पोरंही त्याला कामांत थोडाफार हातभार लावतात. पिकाला खत घालतात. पाऊस पडतांच जमीन हिरवी हिरवी होते. हळू हळू पिकं मोठीं होतात; तरी भांगलणं कोळ-पणं वगैरे शेतकऱ्यांची मेहनत चालूच असते. मग पिकांना कणसं येतात. कणसांत दाणे भरतात. योग्य वेळ येतांच शेतकरी तीं पिकं कापतात. कणसं खुडतात. शेतांतच खळं करतात, खळ्यांतून बैल व खळ फिरवतात आणि दाणे विलग होतात, कणसं, पिश्या विलग होतात. मळणीनंतर शेतकरी व त्याची बायको, लहान लहान पोरं देखील उफणूं लागतात. मोत्यासारखे ते टपोरे दाणे !'

'आणि अिकडे आपले बाबा, दादा, सारे कामाला जातात. संध्याकाळीं येतात. तेही सर्व दिवसभर कष्ट करतात. पैसे आणतात आणि त्याचें धान्य घेऊन घरीं आअीजवळ देतात.'

'मग आअी काय करते? बाबांच्या गैरहजेरींत आपलें सर्व काम आटोपून ती तें नीट पाखडते, दळते. दळून दळून तिच्या हाताला फोड देखील येतात. मग आअी आपल्याला भाकरी करून देते. आणि तेव्हां कुठें आपल्याला भाकरी खायला मिळते.'

'खरंच कां रे दादा?' मध्येंच मुलं म्हणालीं, 'तर मग सारीच माणसं आपल्याला भाकरी देतात म्हणायचं. आपल्यासाठी अितके लोक राबतात कां?'

'हो तर! पण कुणी कुणा अेकट्यासाठीं नाहीं राबत. सारीच साऱ्यांसाठीं राबतात.'

'अगदीं तसंच आहे पहा आपल्या भारताचं. आज आपला देश स्वतंत्र झाला आहे. आपले प्रधान नेहरू आहेत. त्यांच्याच हातांत आपल्या देशाचीं सारीं सूत्रं आहेत. पूर्वी आपले सूत्रधार अिंग्रज असत. त्यावेळीं आपण लिहावं काय, वाचावं काय, याचं देखील स्वातंत्र्य नव्हतं.'

'पण आजपर्यंत अनेक वीर पुत्रानीं आपल्या सुखी संसाराचं अुजाड वाळवंट केलं. रक्ताचं पाणी केलं व स्वातंत्र्याला पाजलं. मांसाचं रक्त केलं नि तें या वृक्षाच्या मुळाशीं घातलं. तें या पिकाच्या मुळाशीं ओतलं.'

'अशा तऱ्हेनं आपल्याच भाऊबंदांच्या रक्तामांसावर पुष्ट झालेली स्वातंत्र्याची भाकरी म. गांधी, पं. नेहरू, सरदार वल्लभभाओी पटेल यांनीं आपल्या पानांत वाढली आणि आज आपण ती मोठ्या आनंदानं मिटक्या मारून खात आहों.'

'पण ती भाकरी खात असतां आपल्या श्रमिकांची, कीं ज्यांनीं कष्ट करून ही भाकरी बनविली त्यांची आठवण नको कां ठेवायला?'

'आणि तशी जर आपण ठेवली नाहीं तर आपण कृतघ्न नाहीं कां ठरणार? केलेले अुपकार आपण जाणत नाहीं असंच नाहीं कां होणार?'

'म्हणूनच आज मीं तुम्हांला अेक गोष्ट सांगणार आहे. ही गोष्ट खूप मोठी आहे. ती गम्मत सांगण्यास बरेच दिवस लागतील. रोज रात्रीं याच वेळीं मीं ती गोष्ट सांगत जाअीन. मी ज्याची गोष्ट सांगणार आहे ना, त्यानं जन्मभर आपल्या रक्ताचं पाणी आपल्या स्वातंत्र्याच्या मुळाशीं ओतलं आहे.

'त्याचं नांव—

विनायक दामोदर सावरकर'

## — मूळवृत्तान्त व बालपण —

सामान्य गोष्टीच्या संबंधांत सावरकरांचें बालपण, तरुणपण, प्रौढपण हीं सर्व अितर चार लोकांसारखींच ठरतात. कारण सावरकर झाले तरी मनुष्यस्वभावाला पुष्कळ गोष्टींत सामान्यच आहेत. पण मनुष्याचें सामान्यत्व किंवा असामान्यत्व हें अशा गोष्टींवरून न ठरवितां, कांहीं अितर विशेष गोष्टींवरून ठरवावें लागतें. अशा गोष्टी थोड्या पण त्याच महत्त्वाच्या असतात.

बालपणींच झालेली काव्यस्फूर्ति व काव्यशक्ति या गोष्टी सावरकरांमध्यें असामान्य कोटींपैकीं होत्या. अुत्कट देशभक्ति आणि स्वातंत्र्याच्या ध्येयाची निर्भय घोषणा करण्याचें धैर्य हा सावरकरांच्या अल्पवयांतलाच गुणविशेष ठरतो.

— साहित्यसम्राट केळकर. प्रस्तावना ( सावरकर चरित्र )

कोंकणच तें! डोंगराळ आणि मागासलेला, पावसाळी आणि अेकलकोंडा प्रदेश! तेथें अुर्जितावस्था ती कसची होणार? नशीब काढावयाचेंच असेल तर या खडकाळ, अुतराळ कोंकणी प्रदेशाचा त्याग करून जवळच असलेल्या देशावर जाअून काढलें पाहिजे, हें पूर्ण पटल्यानें अनेक कोंकणी कुटुंबें देशावर आली. सावरकर कुटुंब हेंही त्यांतलेंच अेक होय.

पूर्वी पेशवाअीच्या काळांत सावरकर-कुटुंबें चिपळूण तालुक्यांतून गुहागर पेट्यांतून देशावर आलें. तेथें त्यांना भगूरजवळील राहुरी हें गांव अिनाम मिळालें. तेथेंच त्यांनीं वस्ती केली.

पेशवाअींत त्यांनीं चांगलाच विश्वास कमाविला होता. शेवटच्या लढाअींत दुसऱ्या बाजीरावानें आपलें कुटुंब विश्वासानें सावरकरांच्या स्वाधीन केलें होतें. या बाजीरावसाहेबांची पळपुटी धूळही सावरकरांच्या या भगूर गांवीं लागली होती. त्यावेळीं त्यांनीं त्यांच्या आवडीची हरभऱ्याची खमंग अुसळ खाल्ली होती. संस्कृत विद्येच्या सन्मानार्थ त्यांच्या-पैकीं अेका पूर्वजाला पालखीचा मानही पेशव्यांकडून मिळाला होता.

**सावरकर नांव कां पडलें?—**

सावरकरांच्या घराण्यास सावरकर हें नांव कां पडलें? कांहीं म्हणा. माणसाची बुद्धि आडनांवांचें संशोधन करण्यास नेहमींच धडपडत असते. आणि कांहींतरी ठोकताळा आख्यायिकांच्या रूपानें बसवून आपलें समाधान करीत असते.

रत्नागिरी जिल्ह्यांत गुहागर पेट्यांत पालशेत नांवाचें अेक गांव आहे. त्या गांवाशेजारी सांवरवाडी आहे. या सांवरवाडींत सांवरीचीं

म्हणजे कापसाचीं झाडें आहेत. यामुळेंच त्या वाडीला तसें नांव पडलें. सावरकर मुळचे येथलेच. म्हणून सांवरवाडींतील ते सांवरकर असें त्यांच्या घराण्यास नांव पडलें.

**भगूर गांव —**

सावरकरांचें भगूर गांव पेशवाईंत श्रीमंतांचें आवडतें स्थान होतें. तेथील पाणी उत्तम असे. गांवाबाहेर अेक पडकी वेस, म्हादेवाचें जुनें देऊळ असा त्या गांवचा बाहेरील थाट होता. तेथें खंडोबाची भव्य मूर्ति असून जवळ असलेल्या मठांत पारिजातकाचें झाड डौलानें डुलत असे व सकाळीं शुभ्र फुलांचा सडा पसरीत असे. गांवाजवळूनच दारणा नदीचें शांत व स्वच्छ पाणी झुळझुळ वहात असे. याच गांवांत सावरकरांचे हरभट नांवाचे कोणीतरी पूर्वज येऊन राहिले होते.

**आअी, वडील —**

दामोदरपंत हें सावरकरांच्या वडिलांचं नांव. दामोदरपंतांना महादेवराव नांवाचे थोरले भाऊ होते. त्यांना बापूकाकाही म्हणत. दामोदरपंतांचे वडील त्यांचे लहानपणींच वारल्यामुळें बापूकाकांवरच संसाराचा भार पडला. बापूकाकांनींच त्यांचं सर्व लहानपण व शिक्षण केलें होतें. त्यांचें लग्नही बापूकाकांनींच करून दिलें होतें. असें जरी होतें तरी नियमाला धरून पुढें या दोघांत भाऊबंदकी बरीच माजली. अितकी कीं, पुढें हें प्रकरण शब्दावरून गुद्यांवरही येऊं लागलें.

दामोदरपंतांचं शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालें होतें. त्यांचा स्वभाव मानी, संकोची पण रागीट होता. तसेंच ते मोठे धार्मिक, शिस्तप्रीय व कडक टापटिपीचे होते.

दामोदरपंतांच्या पत्नी म्हणजे सावरकरबंधूंच्या आओी राधाबाओी याही सालस, साध्या, देवभोळ्या, वत्सल, संसारदक्ष, पतीशीं समरस होणाऱ्या आणि आनन्दी होत्या. त्यांना फळांफुलांची आवड फार असे. तीच आवड व तेच स्वभावविशेष पुढें त्यांच्या मुलांत अुतरले असल्यास नवल कसलें ?

**जन्म व बालपण—**

राधाबाओींना प्रथम दोन मुलें झालीं, परतु तीं जगलीं नाहींत. तिसऱ्या खेपेस झालेलें मूलही जगेल कीं नाहीं याची त्यांना शंकाच वाटे. पण देवानें कृपा केली व पुढचीं चार मुलें वांचलीं; अेवढंच नव्हे तर जगांत आपलं नांव कमावून खऱ्या अर्थानं जगलीं.

दामोदरपंतांचं हें तिसरं अपत्य म्हणजे गणेशपंत. गणेशपंतांच्या म्हणजे बाबांच्या पाठीवर विनायक. विनायकाच्या म्हणजेच तात्याच्या पाठीवर अेक मुलगी मैना आणि तिच्या पाठीवर नारायण अशीं पुत्ररत्नें या जगांत नव्यानं अवतरलीं. दामोदरपंतांना नारायणाच्या पाठीवरचें शेवटचें अपत्यही लाभलं नाहीं.

२८ मे १८८३ सालीं राधाबाओींच्या पोटीं विनायकानें जन्म घेतला. त्याचा जन्म भगूर येथेंच झाला. विशेष योगायोग असा कीं, १८८३ सालांतच आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत अेडन येथील तुरुंगांत मरण पावले. या वासुदेव बळवंतांनीं आपला देश स्वतंत्र करण्यासाठीं पुष्कळच हाल अपेष्टा सोसल्या होत्या आणि शेवटीं त्यांना मरणही तुरुंगांत आलें होतें. त्यांची प्राणज्योत निमाली; पण तीच जणूं विनायकाच्या शरिरांत शिरली आणि त्यामुळेंच कीं काय विनायकानंही

पुढें मोठमोठ्या धाडसी व कष्टप्रद चळवळी केल्या नि शत्रूला 'दे माय धरणी ठाय' करून सोडलं.

**बालपण —**

विनायकाचें सारें बालपण 'भगूरां'तच गेलें. आओी तुळसीची पूजा करीत असतां तिच्याजवळ बसावं, ती म्हणत असलेली सप्तपदी लक्ष देऊन ऐकावी आणि आओीनें दिलेला दुधाचा प्रसाद गट्ट करून टाकावा हा त्याचा नित्यक्रमच होऊन बसला होता. पुढें जसें त्याला वाचायला येऊं लागलें त्यावेळीं घरांत सांपडतील त्या जुन्या पोथ्या तो वाचूं लागला. आपणही तशा कांहीं लिहाव्या असं त्याला वाटूं लागलं. चार बरोबरीचीं पोरं गोळा करावीं, जवळच असलेल्या अंबराओींत जावं, मनसोक्त धुडगूस घालावा अशा आनंदांत त्याचं बालपण निघून चाललं होतं.

**शाळेंत —**

विनायकाचं बालपण वाढत चाललं तसं त्यानं शाळेंत जाणं आवश्यक भासूं लागलं. तो शाळेंत जाऊं लागला. शाळेंत गुरुजी जे शिकवीत तें तो मन लावून शिके. त्यांत कधीं तो चुकारपणा करीत नसे. शाळेंत होणाऱ्या विषयांकडं त्याचं बारीक लक्ष असल्यानं ओरवी शाळेच्या बाहेर त्याला अभ्यास करावा लागत नसे.

मग ओरवीचा वेळ हुदड्या घालण्यास सहजच सांपडे. पण तो केवळ हुदड्याच घाली असें नाहीं. त्याही काळांत आपण कांहींतरी नवी विद्या शिकावी असं त्याला मनापासून वाटे.

या वयांतच तो घोड्यावर बसायलाहि शिकला. पेशवाईपासून चालत आलेली तलवार घरीं होतीच. तलवारीचें त्यानें शिक्षण घेतलें. रामलक्ष्मणांच्या कथा त्यानं ऐकल्या होत्याच. आपणही तसंच धनुष्य-बाण मारायला शिकावं असं त्याला वाटायला लागलं. त्यानं तीही विद्या आत्मसात करून सोडली.

**बाबा–तात्यांची धनुर्विद्या**

ऐकदां बाबा तरवारीचे वार खेळत होते आणि विनायक ते सफा-ईनें चुकवून बाण सोडीत होता. बाण सोडला असं बाबांना भास-वावं आणि बाण तसाच धनुष्याला ठेवावा असं त्यानं तीन चार वेळां तरी केलं. बाबाला वाटलं विनायक कांहीं बाण सोडीत नाहीं. म्हणून तो कांहींसा बेसावध राहिला.

विनायकानं हीच संधि साधली नि आपल्या धनुष्याचा बाण सोडून दिला. बाणच तो ! आपलं करायचं काम त्यानं फत्ते केलं. बाबांचा हात रक्ताळला.

असा त्याचा खेळ चालू असतांच त्यानं आपली शरीर–प्रकृती कमावण्याकडेंही भरपूर लक्ष पुरविलं. लहानपणापासूनच त्यानं शरि-राची योग्य ती काळजी घेतल्यामुळं पुढं त्याला मोठेपणीं अंदमानांतल्या यमयातना सहन करतां आल्या. ऐवढंच नव्हे तर प्रत्यक्ष यमराजाशीं झालेल्या झुंजींतूनही तो शीरसलामत सुटूं शकला.

**आई विना भिकारी —**

असे दिवसामागून दिवस चालले होते. मुलं आईच्या मायेखालीं वाढूं लागलीं होतीं. पण कठोर दैवाला हें पहावलें नाहीं. त्यानं

आओीच्या मायेचं हें आवरण निष्ठूरपणें छिनावून घेतलं आणि तीं मुलं अघडया जगांत आओीविना कुडकुडत पडलीं.

आओी गेली. विनायकाची आओी कॉलऱ्याला बळी पडली. विनायक व त्याचीं लहानथोर भावंडं भिकारी बनलीं. म्हणतात ना, 'स्वामी तिन्ही जगाचा आओीविना भिकारी '

यावेळीं त्याचं वय फार तर नअू वर्षांचं होतं. धाकटा भाअू नारायण तर अवघा चारच वर्षांचा होता.

**वडीलच आओी झाले —**

आओी गेली म्हणून विनायकाच्या वडिलांनीं आपल्या मुलांची आबाळ होअूं दिली नाहीं. दुसरं लग्न होणं शक्य असूनही त्यांनीं तें केलं नाहीं. कारण त्यांना दिसत होतं, दुसऱ्या लग्नानंतर मुलांची पोटाची भूक भागेल पण मनाची नाहीं भागणार. मानवी मनाचा थांग मुळींच लागत नाहीं. भीष्मप्रतिज्ञा करूनही दुसऱ्या पत्नीच्या सहवासांत या मुलांकडं दुर्लक्ष होणं अगदींच अशक्य नाहीं. म्हणूनच ते मुलांची आओी बनले. त्यांनीं मुलांना भरविलें. आओीच्या प्रेमानं वाढविलं आणि बापाच्या कर्तव्यानं शिकविलं.

**येसू वहिनी —**

विनायकाच्या वडिलांनीं मुलांचं संगोपन आओीप्रमाणेंच केलें. त्यांतच त्यास विनायकाच्या वहिनीची जोड मिळाली. आओी गेल्यानंतर १–२ वर्षांतच बाबांचं लग्न झालं व घरात 'येसू वहिनी' मोकळ्या मनानं वावरूं लागली.



**सौ. येसू वहिनी**

आपल्या प्रखर पातिव्रत्यानें 'सती साध्वींचें' मानाचें स्थान कायमचें
मिळविणारी, लहान वयांतच पति व मुलाप्रमाणें जतन केलेले
विनायकभावोजी, अंदमानांत खडी फोडणें, चक्की पिसणें, तेल
काढणें असल्या यमयातना राष्ट्रासाठीं सोशीत असतां,
विरहाश्रूंनीं ओली झालेली आपली दिव्य नजर
अंदमानाकडे लावून पति भेटीची आतुरतेनें वाट
पहात धाकटा दीर विनायक व पति यांचें
मातृप्रेमानें संगोपनाचें कर्तव्य बजावणारी;
पण दीर्घद्वेषी सरकारच्या दुष्टवृत्तीमुळें
पतिविरहातच अंत पावलेली त्यागी,
कर्तव्यनिष्ठ वीर महिला,
बाबारावांची पत्नी.

विनायकची ही वहिनी स्वभावानें फार मायाळू होती. त्या घरांत आल्यानंतर तिनं त्या भावंडांना आओची अणीव मुळींसुद्धां भासूं दिली नाहीं. त्यांतल्या त्यांत तिचा विनायकावर भारी जीव. बाळ व व माओी तिच्याहून लहान पडत. बाबा तर नवरदेवच. मग: राहतां राहिला विनायक. तोच तेवढा तिच्याबरोबरीचा.

विनायकही वहिनीशीं मिसळून वागायचा. तो तिच्या खोड्या फार करी. नाना पक्षांचे नाना आवाज काढून तो साऱ्यांना स्तिमित करी. थोरांच्या हुबेहूब नकला करून हसतां हसतां मुरकुंडी वळवे. त्याच्या अंगीं असलेल्या धैर्य, बोलकेपणा, चौकसपणा व लाघवीपणा या गुणांनी त्यानें आपल्या वहिनीवर चांगलीच छाप पाडली होती.

विनायकाच्या या वहिनीला लिहायवाचायला कांहीं येत नव्हतें. विनायकला वाओीट वाटलें. त्यानें वहिनीला आणि आपल्या लहानग्या वहिणीला लिहायवाचायला शिकविलें. लवकरच वहिनीची लिहिण्या-वाचण्यांत चांगलीच प्रगति झाली. अितकी कीं, पुढें बाबा आणि विनायक अंदमानांत तुरुंगांत असतांना त्यांच्या आठवणी तिनें लिहून ठेवल्या. त्या अगदीं साध्या, सुटसुटीत व मधुर शब्दांत लिहिलेल्या आहेत. कोणी अेखाद्या विद्वान विदुषीनेंच त्या लिहून ठेवल्या नाहींत ना असें वाटल्यावांचून राहत नाहीं.

विनायकाच्या वहिनीचं विनायकाशीं केवळ वहिनीचंच नातं नव्हतं, अगर बाबांशी बाबांच्या पत्नीचंच नव्हतें तर त्यांच्या कार्यांतील विश्वासु मित्राचं, कर्तव्यदक्ष गुरुचंही होतं. जेव्हां हे दोघे बंधू कारागारांत अडकले तेव्हां तिनें अनेक महत्त्वाच्या गोष्टी बिनबोभाट

पार पाडल्या, म्हणून तेवढ्यावरच विझल्या नाहींतर आणखी केवढा हाहा:कार अुडाला असतां तें कल्पनेनं वर्णन करतां येणार नाहीं.

**विनायक वाचे काय ?**

विनायकाच्या बालपणीं गांवांत केसरी, गुराखी, जगद्‌हितेच्छु अशीं वर्तमानपत्रं येत दामोदरपंत त्याच्याकडून केसरी वाचून घेत. पुढें पुढें विनायकाला वाचनाची चांगलीच गोडी लागली. तो स्वत: वाची. बरोबरीच्या सवंगड्यांना वाचून दाखवी. पेशव्यांची बखर, निबंधमाला अशीं मोठीं मोठीं पुस्तकेंही तो मनापासून वाची आणि स्वत: कांहीं चुटके, कांहीं कविता करी.

लहानपणापासूनच त्याच्या मनांत अशीं ब्रिटिशांविरुद्ध द्वेष पसरविणारीं, चीड व आवेश उत्पन्न करणारीं वर्तमानपत्रें येत असल्यानें तेवढ्याशा चिमुकल्या वयांतही त्याच्या मनांत अिंग्रजांविषयीं तिरस्कार व द्वेष भरून राहिला. त्याला वाटूं लागलं या परकी लोकांना हांकलून लावलं पाहिजे आणि त्यासाठीं आपण स्वत: कांहींतरी केलं पाहिजे.

आणि त्याचा स्वभावही संघटनाप्रीय. गांवांतीलच राणू शिंप्याचीं मुलं राजा आणि परशु, गोपाळ कुलकर्णी, आठवल्यांचा वासू ही आणि अितर कांहीं मंडळी त्याच्या कच्छपी लागली. विनायकासारख्या हुषार तल्लख नि देशप्रीय मुलांचा त्याच्या सवंगड्यावर परिणाम काय होअी तें त्यानेंच आपल्या आत्मचरित्रांत लिहिलें आहे तें पाहणें चांगलें. तो लिहितो—

“ माझ्या वाचनाचा, संगतीचा, राजकीय आकांक्षांचा, राजकीय खेळांचा, अुत्सवांचा या सर्व मंडळींवर चिरस्थायी परिणाम होअून

तद्भावी तशा खेडवळ स्थितींत जो होणें दुर्घट होतें, असा त्यांच्या बुद्धीचा आणि शक्तीचा त्या त्या प्रमाणांत विकास झाल्यामुळें पुढच्या अभिनव भारताच्या प्रचंड चळवळींत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें आपला लहानमोठा भाग उचलण्याची त्यांच्या मनांत पूर्ण सिद्धता तेव्हां-पासूनच होत गेली."

**नाशीकला—**

विनायकाच्या मराठी पांच ओयत्ता पुऱ्या झाल्या. त्याला बारावे सरून तेरावें वर्ष लागलें. आणि ॲिग्रजी शिकावयाला तो नाशिकला गेला. नाशिकला येण्यापूर्वींच त्यानें घरीं स्वतःच्या हिंमतीनेंच ॲिग्रजी दोन ॲियत्तांचा अभ्यास केला होता. नाशिकला जातांच तो शिवाजी-स्कूलमध्यें तिसरींत बसला व चार महिन्यांनी चौथींत बसला.

**संस्कारानंतर—**

विनायक भगूरला असतानांच केसरीसारखीं वर्तमानपत्रं वाचून राष्ट्रीय विचारानं भारला होता. तशांतच राष्ट्रीय वृत्तीच्या देशभक्तांनीं चालविलेल्या शाळेंतच त्यानं आपलं नांव घातलं. साहजीकच त्याचे राजकीय विचार व ध्येयें पक्व होत चालली. मुळांतच सोनें तशांतच अग्नीचा सहवास. मग काय, बावनकशीच ठरायचं!

नाशीकला विनायक आला तरी त्याचा मूळ स्वभाव कांहीं बदलला नव्हता. त्याची भाषा मोठी मिठास, चेहरा सुंदर, नाजूक, ठसठसीत आणि सहज छाप पाडणारा त्यामुळें येथेंही त्याला बरींच मित्रमंडळीं भेटलीं. विनायक शाळेंत आल्यानंतर तेथील विद्यार्थ्यांत त्याच्या संस्कारानें अेक निराळीच प्रथा निर्माण झाली.

यापूर्वीचे विद्यार्थी चैनी व टवाळखोर आणि उथळ अभ्यासाचे असत. त्यानें येतांच ती परंपरा मोडून काढली नि विद्यार्थ्यांत राष्ट्राविषयीं प्रेम उत्पन्न करणं, चार चौघांनीं अेकत्र जमणं, गुप्त खलबतं करणं ही नवीन परंपरा विद्यार्थ्यांत निर्माण केली.

**स्वातंत्र्य शाहीर कवि गोविन्द**

विनायकानें नाशिकांत आपल्याभोंवतीं जे मित्रगण गोळा केले होते त्यांत गोविन्द दरेकर हा एक मराठा तरुण प्रमुख होता. त्याची व विनायकाची ओळख होण्यापूर्वी रंगेल व छचोर मित्रांत मिसळावं व लावण्यादि पाचकळ काव्य लिहावं वा गावं असा त्याचा कार्यक्रम होता. पण विनायकाच्या सहवासांत त्याच्यांत अेक विलक्षण क्रांति झाली. तमाशीथाटाचं वाङ्मय लिहायचं त्यानं सोडून दिलं व देशप्रेमानं ओथंबलेलं काव्य तो लिहूं लागला.

**वक्तृत्ववीर विनायक—**

नाशीकला असतांना विनायकानं अनेक चढाओढींत भाग घेतला. त्यानें अभ्यासानें वक्तृत्वकला संपादिली होती. त्याच्या भाषणांत वयाच्या मानानें फारच भारदस्तपणा, विचारांची परिप्लुतता, भाषामाधुर्य असे. त्यामुळें परीक्षकांना वाटे, हें व्याख्यान त्याचें स्वत:चें नसावें. त्यानें तें पाठ केलें असावें. आणि तसें ते बोलूनही दाखवीत व बक्षीस देण्यास टाळंटाळ करीत. मानी विनायकाला हें मुळींच सहन होत नसे. अनेक अध्यक्षांशीं त्याची यामुळें चकमक उडे.

येथें असतांनाच त्यानें कांहीं मित्रांच्या सहाय्यानें राष्ट्रभक्तसमूह ही संस्था स्थापन केली. या संस्थेंत राष्ट्रावरील प्रेमानें भारलेले, सुखाचा,

अेवढेंच नव्हे तर सर्वस्वाचा होम करण्यास सिद्ध असलेले, पडेल तेव्हां व पडेल तें काम करावयास तयार असलेले साहसी व धोरणी सभासदच फार.

त्यांच्या रात्रींच्यारात्री दरेकराच्या घरीं गप्पा मारण्यांत, कारस्थानं करण्यांत जात असत. लवकरच त्यांच्या मित्रमंडळींची संख्या वाढली व त्याला त्यानें 'मित्रमेळा' हें नांव दिलें. या मेळ्यातर्फे पुण्यास गणेशोत्सवांत व शिवोत्सवांत कार्यक्रम होत. निरनिराळीं पदें, स्वदेशीचा फटका, चाफेकरांचा पोवाडा, बाजी, तानाजी यांचा पोवाडा खड्या सुरांत म्हणत व सारें पुणें मोहीत करत.

**वडीलही गेले—**

या व अशा दुय्यम शाळेंतील गोष्टी चालू होत्या. विनायक आपले सारे अुद्योग व अुलाढाली संभाळून अेकेक अीयत्ता ओलांडीत होता. सर्व वर्षभर अितर अुलाढाली कराव्या आणि परीक्षेच्या आधीं मात्र सतत जागून अभ्यास करावा व पास व्हावं आणि तेंही चांगल्या रीतीनं हें फक्त विनायकालाच साधे. तो कुठल्याही अीयत्तेंत नापास झाला नाहीं.

विनायक व त्याचा थोरला भाअू बाबा यांचें शालेय जीवन व्यवस्थित चालू होतें. पण त्यांची आअी गेल्यापासून त्यांच्यामागें दारिद्र्य नि संकटें हात धुवून पाठीशीं लागलीं होतीं. सुमारें १८९९ च्या सप्टेंबरमध्यें भगूर गांवीं प्लेगनें कहर अुडवून दिला. प्लेग प्रतिबंधक सरकारी अुपाय फारच जालीम असल्यानें लोकांची अुदीर पडत असले तरी ते गुप्त ठेवण्याकडे प्रवृत्ती वळली होती. त्यामुळें तर प्लेगचें स्वरूप

भयंकरच झालें होतें. याच साथींत दामोदरपंत प्लेगनें पछाडले व शेवटीं त्याच महिन्याच्या ९ तारखेस त्यांचें देहावसान झालें.

पण केवळ वडिलांचा बळी घेऊनच प्लेगचें समाधान झालें नाहीं. त्यांचे चुलते बापूकाकांनाही त्यानें अचुकपणें अुचललें. लहानग्या बाळालाही प्लेगनें पछाडलें. घरीं वडील माणूस कोणीच नाहीं. हींच अेवढीं ४ कच्चीबच्चीं. जवळ राहाण्यास कोणी नाहीं, स्मशान-भूमींत भोंवतीं जळणाऱ्या प्रेतांच्या प्रकाशांत तेथील पडक्या देवा-लयांत वास्तव्य. वडील भावजय सौ. येसूबाअी व तें बंधुद्वय आपल्या आसन्नमरण धाकट्या लाडक्या भावाची अशा बिकट परिस्थितींत शुश्रुषा करीत आहेत व जवळच अेक अिमानी कुत्रें त्या भयंकर काळ-रात्रीं त्यांचे सोबतीस आहे, अशा स्थितींत तेथें राहणें धोक्याचं बनलं म्हणून तीं भावंडं नाशीकला आलीं.

बाळ तापानं फणफणलेला. त्याची अवस्था फारच बिकट झालेली, साऱ्यांच्या तोंडचं पाणी पळालं होतं. त्याला हॉस्पिटलमध्यें ठेवण्यांत आलं व त्याच्या सेवेस स्वत: बाबा तेथें राहिले.

बाबांच्या सेवेनें देवाला दया आली व बाळला बरें वाटूं लागलें. पण बाबाच त्या रोगानें आजारी पडले; तरी पुढें त्यांनाही बरें वाटूं लागलें. दैवानें खैरच केली म्हणायची.

**यावेळीं —**

अिकडे प्लेगच्या वणव्यांत सावरकरांची लहान लहान मुलं होर-पळून निघत आहेत तों तिकडं भगूरला काय झालं?

त्यांच्या घरांतून राधाबाअींच्या मृत्यूपासूनच लक्ष्मीनें काढता पाय घेतला होता. पण प्लेगच्या संहारांत सावरकर कुटुंबाची वाताहात झाली हें पाहून त्यांच्या घरांतील सर्व चीजवस्तु लंबा झाली. भांडींकुंडीं, कागदपत्र सारेंच गडप झालें. एवढेंच नव्हे तर पुढें जेव्हां बाबा घरची व्यवस्था पहावयास आले त्यावेळेस त्यांच्या भोळेपणाचा व भाबडेपणाचा फायदा घेअून कांहींनी त्यांजकडून पैसेही अुकळले आणि तेलही गेलें तूपही गेलें, हातीं धुपाटणें म्हणजे दारिद्र्य मात्र राहिलें. त्यामुळें बाबांना दुष्काळी कामावर नोकरीही धरावी लागली. घरीं खायला कांहीं नसावयाचेंच. आवश्यक वस्तुसुद्धां लाभावयाच्या नाहींत.

तरीसुद्धां विनायकास याची थोडीसुद्धां झळ पोंचूं नये म्हणून बाबा पति-पत्नि फार जपत असत. प्रसंगीं स्वतःच्या पोटास चिमटाही घेत. पण शक्यतों विनायकास कळूं देत नसत. पण अेखादेवेळेस हें बिंग बाहेर पडेच. मग बाबा येसूवहिनीवर संतापत; पण तीं तरी काय करील बिचारी? वस्तू तर आवश्यक असावयाची आणि प्रतिकूल परिस्थितिमुळें बाबांना ती वेळेवर आणून देतां यावयाची नाही. मग विनायकानें विचारल्यास त्याला काय बरें सांगावयाचें?

**चाफेकर बंधू—**

अशी अेकंदर स्थिति होती; तरी जगाच्या अितर धामधुमी चालूच होत्या. अिकडे प्लेगनें लोक चिलटासारखे मरून पडत होते. भुकेनें तडफडत होते. तशांतच हिंदुस्थानच्या राज्ञीपणाचा शिक्का बसलेल्या व्हिक्टोरिया राणीचा हिरकमहोत्सव साजरा करण्याची सरकारी आज्ञा सुटली.

याचवेळीं सुशिक्षितांवर व वर्तमानपत्रांवर अनेक जाचक बंधनं घातलीं होतीं. याची विलक्षण चीड येऊन पुण्यास गणेशखिंडीच्या रस्त्यावर दामोदरपंत व बाळकृष्णपंत चाफ़ेकरांनीं रँड व ऑयर्स्ट या दोन गोऱ्या साहेबांचा २२–६–१८९७ रोजीं खून केला.

पुढें लवकरच ते सांपडले. या खटल्याशीं टिळकांचा बादरायण संबंध जोडून त्यांच्यावर सरकारनें राजद्रोहाचा खटला भरला. नातूबंधूंना तुरुंगांत टाकलें. खटला चालू झाला. लोकमान्यांची गीता हातीं धरून चाफेकर फांशीं गेले.

याचवेळीं आणखी एक विशेप गोष्ट झाली आणि ती ही कीं, ज्या द्रवीडबंधूंनीं हा कट फोडला त्यांचाही मागें राहिलेल्या चाफेकर, रानड्यांनीं खून करून भावी फितुरांस दहशत बसविली. पुढें त्यांना तुरुंगांत ढकललें. तेथेंही फौजदाराच्या अुर्मट अुत्तरांनीं चिडून त्यावर व व्हअीनवर पिस्तुल झाडलें व अखेर चाफेकर, रानडे, साठये ही त्रयी फांसावर लटकली.

अशा या घटना विनायकाच्या भोंवतीं घडत होत्या. देशांत ब्रिटिश सरकारनें माजविलेला अत्याचार, चाफेकर बंधूंसारखे धडाडीचे देशवीर, त्यांचे ते हृदयास भिडणारे, काळजास हात घालणारे जबाब, नवे नवे निर्बंध घालून दडपू पाहणारे हुकूम यांनीं त्याच्या बालमनावर विलक्षण परिणाम झाला आणि त्या भरांत त्यानें ठरविलें कीं—

‘ स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन चाफेकर फांसावर चढले.
त्यांच्या प्राणज्योतीनें जातां जातां चेतविलेली शत्रुंजयवृत्ती,

यज्ञकुंडांत समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणें असेल तर त्याचें दायित्व आपल्यावरही पडत आहे.'

### विनायक-चतुर्भुज झाला

चाफेकरांच्या प्राणज्योतीनें विझतां विझतां विनायकाची देशप्रेमाची ज्योत पेटवून दिली. देशाचें 'स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं सशस्त्र क्रांतीचा केतु अुभारून मारतां मारतां मरेतों झुंजण्याची' त्यानें प्रतिज्ञा केली; तरी त्याचें शिक्षण थांबलें नाहीं. १९०१ सालीं तो मॅट्रिक अुत्तीर्ण झाला.

त्यानें स्थापन केलेल्या मित्रमेळा, अभिनव भारत या संघटना बाळसें धरूं लागल्या. विनायक मॅट्रिक झाला त्याच साली जव्हारचे कारभारी भाअूसाहेब चिपळूणकर यांच्या 'यमूताअी' नांवाच्या मुलीशीं त्याचा विवाह झाला आणि त्यांच्या सहाय्यानें कॉलेजला जाण्याच्या दृष्टीनें त्याचे घरीं, मित्रमंडळींत वारें वाहूं लागलें.

# — फर्ग्यूसन कॉलेजांत —

नाशीक जिल्ह्याच्या मर्यादित क्षेत्रांतच आपण आजवर कार्य करीत होतों, परंतु आपल्या मित्रमेळ्याचीं अुच्च तत्त्वें महाराष्ट्रांतील तरुणांच्या मनांवर बिंबवण्याकरितां मीं पुण्यास फर्ग्यूसन कॉलेजमध्यें जात आहे. पुण्याच्या कॉलेजमध्यें महाराष्ट्रांतील निवडक बुद्धिमान नवयुवकांचीं मनें जर मीं आपल्या ध्येयानें भारूं शकलों, तर ते जेव्हां आपापल्या जिल्ह्यांत व शहरोशहरांत जातील, तेव्हां या ध्येयाची ज्वाला घेअूनच ते अवघा महाराष्ट्र चेतवूं शकतील, यामुळें सर्व महाराष्ट्रास अल्पावधींत मी अिष्ट तें वळण लावूं शकेन. या माझ्या आकांक्षा मी पूर्ण करण्याचा कसून प्रयत्न करीन.

त्यांच्या या चळवळीकडे प्रथमवर्षी अध्यापकवर्ग संशय दृष्टीनें पाहूं लागला, दुसऱ्या वर्षी त्याच्या हृदयांत या आंदोलनामुळें भय निर्माण झालें; तृतीय वर्षी भयाचें स्थान द्वेषानें

पटकावलें व चवथे वर्षी तर त्यांच्या द्वेषाग्नीस क्रोधाचें अिंधन मिळाल्यामुळें, अध्यापकांच्या रागाच्या होळींत सावरकर संघाचे विद्यार्थी भस्मसात होतात कीं काय अशीच जणो पाळी आली.

— श्री. मोपेकृत 'सावरकर जीवन चरित्र'

कॉलेजांत प्रवेश करण्यापूर्वीच विनायकाचें ध्येय निश्चित झालें होतें. 'देशस्वातंत्र्य हें त्याच्या जीवनाचें ध्येय व सशस्त्र क्रान्ति हा त्याचा ध्येयप्राप्तीचा मार्ग' ठरला होता. त्यामुळें कॉलेज प्रवेशानंतर त्याच्यांत नवीन असा बदल होण्याचं कारण नव्हतं. अुलट त्यानें अंगिकारलेल्या कार्यांत त्याला नवीन रक्ताचे व आपल्या ध्येयास जुळणारे सहकारी हवे असल्यानें तो त्या दृष्टीनें कॉलेजमध्यें वावरूं लागला व तरुणांची देशभक्तिप्रीय व त्यागप्रीय संघटना उभारण्याच्या कामीं त्याला भरपूर यश आलें.

कॉलेज शिक्षणास पुण्यास येतांच विनायकाचीं कार्याचीं चक्रं जोरांत चालू झालीं. लो. टिळक व शिवरामपंत परांजपे यांजकडे त्याचें येणें जाणें सुरूं झालें. लो. टिळक तरुणांस सबूरीचा व सावधगिरीचा अिषारा देत; पण त्यांचा अुत्साह खचूं देत नसत. परांजपे अशा क्रांतिप्रवण तरुणांस अुत्तेजनच देत. परांजप्यांच्या मुलाशीं–कृष्णरावाशीं–त्याची गाढ मैत्री जडली.

कॉलेजमध्यें असतांना विनायकानें जर डोळे दिपविणारें कोणतें कार्य केलें असेल तर परदेशी कपड्यांची होळी करण्याचें. या होळीस टिळकांचा, परांजप्यांचा भरपूर पाठिंबा होता. अेवढेंच नव्हे तर ते

त्यांत अुघड अुघड सामीलही होते. अेका छकड्यांत त्यांनीं विदेशी कपडे भरले. त्यांवर गुलाल अुधळला. वाजत गाजत ही विदेशी कपड्यांची प्रेतयात्रा मंडअीपासून निघाली व लकडी पुलाजवळील अेका शेतांत अुतरून आणि रचून त्यांची होळी करून पेटविली. होळी धडाडूं लागली. टिळकांनी व परांजप्यांनीं व्याख्यानें दिलीं. टिळकांनीं सुचविल्याप्रमाणें होळी करावयाचीच तर पोरकट दिसतां कामा नये, याची त्यानें प्रथमपासूनच खबरदारी घेतली.

विनायकानें विदेशी कपड्यांची होळी केली खरें; पण त्यामुळें त्याजवर कॉलेजच्या चालकांची अितराजी झाली. त्यावेळचे प्रिन्सिपॉल रँग्लर परांजपे यांनीं त्याला दहा रुपये दंडाची व कॉलेजचें वसतीगृह सोडण्याची शिक्षा फर्मांविली. विनायकानें त्याप्रमाणें वसतगिृह सोडलें आणि विद्यार्थ्यांनीं स्वतः वर्गणी करून निधि जमविला. त्यांतील दहा रुपयांचा दण्ड भरला व बाकीचा पैसा विनायकानें 'पैसा फंडा' स देअून टाकला.

विनायकास कॉलेज चालकांनीं दंडाची व वसतिगृहांतून हकाल-पट्टीची शिक्षा दिल्यानें टिळकांना संताप आला. त्याग व देशप्रेम यांतून निर्माण झालेल्या कॉलेजच्या चालकांनीं केवळ दीडदमडीच्या सरकारी दानाला बळी पडून स्वाभिमानी व तेजस्वी विद्यार्थ्याला ही शिक्षा देअून आपल्या अुज्ज्वल परंपरेस चालकांनीं पायाखालीं तुडविलें. सात्विक संतापाच्या भरांत केसरींतून त्यांनीं त्यांजवर खरमरीत टीका केली व स्पष्टपणें बजावलें, 'हे आमचे गुरुच नव्हेत.'

**कॉलेजमधील सहकारी —**

येथेंही नाशीकप्रमाणेंच विनायकाला नवीन व कार्यकुशल सहकारी लाभले. बाबा खापर्डे डेक्कन कॉलेजांत शिकत होते. आचार्य कालेलकरांशीही याचवेळीं त्याची मैत्री जडली. निरनिराळ्या कॉलेजांत त्याचं मित्रमंडळ विखुरलं होतं. त्या सर्वांनीं अेकत्र जमून विचार ठरविण्यासाठीं साप्ताहिक बैठकी सुरू केल्या. पर्वतीच्या मागील बाजूस टेकडी आहे, त्या घळींतून त्यांच्या गुप्त सभा व बैठकी भरूं लागल्या. कॉलेजांत बरीच धुंडाअी माजून राहिली. प्रत्येक क्षेत्राचा तो राजकीय दृष्ट्या फायदा करून घेअूं लागला. प्राध्यापक वर्गाकडून शाबासकी, क्वचित्प्रसंगीं 'कानपिचक्या' ही घेअूं लागला. हस्तलिखित मासिकांतून देशभक्तीपूर्ण लेख व काव्यें तो लिहूं लागला.

**जगांत काय चाललें होतें ? —**

पुण्यांत या घडामोडी चालू होत्या तेव्हां अेवढ्या मोठ्या अफाट जगांतही कांहींतरी उलथापालथ सुरू असलीच पाहिजे. तशांतच जगांतील कानाकोंपरा हुडकून काढणारी नि ओरड करणारीं वर्तमानपत्रं यांचा सुळसुळाट झालेला. बारीक सारीक गोष्टी देखील चोहोंकडे तात्काळ पसरत.

खुद्द हिंदुस्थानांतच अिंग्रजांनीं प्रजेला निःशस्त्र करून दुबळं केलं होतं, आमीष दाखवून भाळविलं होतं, लांचेनं स्वार्थांध बनविलं होतं, नवनवीन बंधनांनीं जखडून टाकलं होतं. विद्यार्थ्यांनीं राजकारणांत भाग घ्यावयाचा नाहीं. नव्हे नव्हे, अेखाद्या राष्ट्रीय पुढाऱ्याच्या सभेलाही हजर रहावयाचें नाहीं असा कायदा करून नवशिक्षितांच्या

महत्त्वाकांक्षांचा खुडा चालविला. होता. अिलबर्ट बील मागें घ्यावयाला लाअून न्यायालयांत देखील गोरा व काळा हा भेद अभंग व अभेद्य राखला होता. केट्टा बलुचिस्तानास जोडला होता. १८९५ मध्यें चित्रळ प्रकरण उपस्थित करून हिंदुस्थानच्या सरहद्दी बळकट केल्या होत्या व रशियाचा धोका शक्यतों कमी करण्याची आणि आपल्या हिंदुस्थानांतील साम्राज्यास 'स्थीरता' आणण्याची त्यांची कोशीस चालू होती. त्यांतच बंगालच्या फाळणीनें बंगाल्याच्या काळजावरच सुरी चालविणाऱ्या कर्झनची नेमणूक व्हाअीसरॉय म्हणून केली होती. राज्यकारभारांत होताहोअीतों सुशिक्षितांना प्रवेश द्यावयाचा नाहीं हें अिंग्रजांनीं आधींपासूनच ठरविलं होतं.

या सर्वांतून कांहींतरी आपल्यास मिळावें म्हणून चार सुशिक्षित मंडळींनीं 'अिंडियन नॅशनल कॉंग्रेस' स्थापन केली होती व तिचे राज्यकारभारांत अधिकार मिळविण्याचे सनदशीर प्रयत्न चालले होते. पण या मिळमिळींत भीक मागण्याला सरकार मुळींच भीक घालत नसल्यानें त्याला यश येत नव्हतें. अुलट प्रजेवर अत्याचार अधिक सुरू झाले होते. दडपशाहीचा वरवंटा सर्वत्र फिरूं लागला होता. त्यामुळें प्रजा संत्रस्त झालीच होती. त्यांतच कांहींसा आत्मविश्वास निर्माण व्हावा म्हणून पोषक अशाच घटनाही घडत होत्या.

ॲबिसिनियासारख्या छोट्या व निर्बल राष्ट्रानें अिटलीसारख्या बलाढ्य व शस्त्रसंपन्न राष्ट्राचा मोड केला. मागासलेले बोअर! पण त्यांनीं देखील अिंग्रजांविरुद्ध अुठावणी केली. त्यांत त्यांचा पराभव झाला खरें; पण त्यांनी टक्कर दिली हेंही तितकेंच खरें. चीनमध्यें

बॉक्सरी गुप्त संघटनेनें पेकिंगवर उघड उघड हल्ला चढविला. १९०२ मध्यें अिंग्रजांना आशियांतील अेका बुटक्या व छोट्या अशा जपान राष्ट्राशीं तह करावा लागला. रशियांत झारशाहीविरुद्ध जोराचा असंतोष माजला होता व झारशाही अुलथून पाडण्याचे यशस्वी गुप्त व अुघड कट व प्रयत्न चालू होते. यापूर्वी फ्रेंच लोकांनीं फ्रेंचांवर जुलूम करणारी—लुअीची जुलमी राजवट अुलथून टाकली होती. अेवढेंच नव्हे तर सर्वच्या सर्व लुअी कुटुंबाचा फडशा अुडविला होता. अमेरिकेनें तर ब्रिटिशांशीं झगडून स्वातंत्र्य संपादन केलेंच होतें. जी अमेरिका आज अेवढया अुच्च पदाला आली ती ब्रिटिशांची अेके-काळीं बटीक होती हें आज कुणाला खरेंसुद्धां वाटणार नाहीं.

अन् अशा घटना कां घडत होत्या? अेकमेकांत स्पर्धा माजून राहिलेलीं राष्ट्रें अशीं धुसफुसत असलेल्या छोट्या देशांना शस्त्रास्त्रांची व पैशांची मदत करून हाताशीं धरत.

**सशस्त्र क्रांतीकडे कल —**

मग आपणही अुठावणी केल्यास कोणी राष्ट्र मदत करील काय? आपल्याला शस्त्र मिळवितां येतील काय? आपण बऱ्याच मोठ्या प्रमाणांत अिंग्रजी सरकारविरुद्ध बंड अुभारूं शकूं काय? या व अशा प्रकारच्या अनेक विचारांनीं विनायकाच्या मनांत थैमान घातलं व त्याचं मन अुघड अुघड सशस्त्र क्रांतीकडे वळलं. सशस्त्र क्रांति म्हटल्यावर ती प्रकट करतां येत नाहीं. ती लपून छपूनच करावी लागते. यासाठीं त्यानें गुप्त संघटना स्थापन केल्या. या संघटनेचीं पाळंमुळं खोलवर रुजलीं होतीं. या संस्थेस 'अभिनव भारता'चें फार

मोठें भव्य नि अुदात्त स्वरूप प्राप्त झालें. पुढें पुढें विनायक लंडन मध्यें बॅरिस्टरीचा अभ्यास करीत असतां तेथें या अभिनव भारतांतील सदस्यांनीं देशभर क्रांतीचा अुठाव केला होता. परदेशांतून शस्त्रास्त्रांची आवक, जहरी वाङ्मयाचा प्रसार, अिंग्रज अधिकाऱ्यांचे खून, बॉम्बचे कारखाने यांच्या ज्वाला साऱ्या अिंग्रज देशाला चाटूं लागल्या होत्या त्यांच्या वेदना त्यांना अितक्या असह्य होअूं लागल्या कीं त्याचे पडसाद ब्रिटिश पार्लमेंटमध्यें वरचेवर अुमटूं लागले.

**शारिरीक व बौद्धिक विकास —**

अशा या धांवपळीच्या काळांत विनायकाची लेखणी आणि वाणी आपलं काम करतच होती. पूर्वीप्रमाणें भारदस्त ग्रंथांचें वाचनही चालूच होतें. या काळांत त्याचा शारिरीक नि बौद्धिक विकास चांगलाच झाला.

**पदवी परीक्षा —**

आतां विनायकाची बी. अे. ची परीक्षा जवळ येअून ठपली. बरो बरीचे मित्र व तो झटून अभ्यास करूं लागला. परीक्षा दोन महिन्यांत आली तरी अभ्यासास हात लागला नव्हता आणि आतांचा तर ह निर्वाणीचा व अब्रतीचा प्रश्न होता.

नसत्या फंदांत पडणारीं पोरं अभ्यासांत नेहमींच 'ढ' असतात तीं कधींच चांगल्या गुणांनीं पास होत नाहींत व पालकांचें नुकसान करीत असतात, असा लोकांत अेक प्रवाद निर्माण झाला होता तो खराही होता. तो डाग आपल्या सहवासांतील कोणाही विद्यार्थ्याला लागतां कामा नये यावर त्याचा फार कटाक्ष असे.

म्हणूनच त्यानें प्रसंगीं शाळा बुडवूनही अभ्यास केला व शेवटीं बी. अे.च्या परीक्षेंत यशही मिळविलें दरम्यानच्या काळांत त्यानें मुंबअीस जाअून अेल्. अेल्. बी. च्या परीक्षा दिल्या होत्या व त्यांतही तो यशस्वी झाला होता. यावेळीं त्याच्या संघटनेंत आज आपल्या मुंबअी प्रान्ताचे मुख्य प्रधान असलेले बाळासाहेब खेर सामील झाले होते.

**पुढें काय ?—**

बी. अे. झाल्यानंतर आतां पुढें काय, असा प्रश्न विनायकापुढें अुभा राहिला, पण तोही अकस्मात सुटला. लंडनमध्यें असलेल्या श्यामजी कृष्णवर्मांचें लो. टिळकांना अेक पत्र आलें. त्यांत त्यांनीं लिहिलं होतं कीं, 'आम्हीं परदेशी शिकावयास येणाऱ्या विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या द्यावयाच्या ठरविल्या आहेत. विद्यार्थी राष्ट्राभिमानी हवा. आपल्या माहितीच्या योग्य अशा विद्यार्थ्यांचीं नांवें कळवा.'

श्यामजींचे मित्र राणा यांनीं या तीन शिष्यवृत्त्या ठेवल्या होत्या. पैकीं अेक राणाप्रताप, दुसरी राष्ट्रीय मुसलमान विद्यार्थ्यासाठीं व तिसरी शिवाजी शिष्यवृत्ति.

टिळकांच्या शिफारसीनें विनायकाला शिवाजी शिष्यवृत्ति मिळाली. अेवढी शिष्यवृत्ति लंडनमध्यें राहून अभ्यास करण्यास अपुरी होती. म्हणून विनायक आपले सासरे भाअूसाहेब चिपळूणकरांस भेटला.

भाअूसाहेबांचं आपल्या जांवयावर प्रेम फार. अेवढ्या लहान वयांत त्याचें नांव सर्वतोमुखीं झालें होतें. वर्तमानपत्रांतून त्याचें लिखाण प्रसिद्ध होअूं लागलें होतें. मुंबअीच्या विहारी पत्रांतील त्याच्या लिखाणानें सर्व भारतभर त्याचं नांव दुमदुमूं लागलं होतं. अशा जांवया-

बद्दल त्यांना अभिमान कां न वाटावा? त्यांनीं अिंग्लंडच्या अित खर्चाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. आपला दुसराच मुलगा असं समजून त्यांनीं त्याला सहाय्य केलं. त्यावेळीं त्यांना काय वाटत असेल बरें?

**सुखस्वप्नाचें बुडबुडे**

आपला जावअी नाणावलेला बॅरिस्टर होअून येअील. खोऱ्यानें पैसा मिळवील. कदाचित जव्हारचा दिवाणही होअील आणि माझी मुलगी यमू सुखानं संसार करील. त्यांचा तो संसार डोळे भरून पाहतां पाहतां मला कोण धन्यता वाटेल! आपली यमू भाग्याची म्हणून तिला हा विनायक 'पति' म्हणून प्राप्त झाला.

पण त्यांना काय कल्पना कीं, यमूचं आयुष्य खडतर तपश्चर्येत, हालांत जाणार आहे तें? आतां विनायक परत येअील तो बॅरिस्टर होअून, जव्हारचा दिवाण म्हणून येणार नाहीं; तर तो एक 'भयंकर' राजकीय कैदी म्हणून येणार व जन्मभर तुरुंगांत खितपत पडणार आणि आपल्या यमूस अेकाकी योगिनी जीवन कंठावें लागणार याची त्यांना पुसट तरी कल्पना आली असेल कां?

## — लंडनमध्यें —

गोदावरीच्या काठावर जितक्या निर्भयतेनें स्वातंत्र्य वीर सावरकरांनीं भारतीय स्वातंत्र्याचा जयघोष केला तितक्याच निर्भयतेनें टेम्स नदीच्या कांठीही भर लंडनमध्यें त्यांनीं त्या स्वातंत्र्याचा डंका गाजविला.

वि. श्री. जोशी. बॅ. सावरकर १९०८ व १९३८.

पण त्यांना ( सावरकरांना ) सिव्हिल सव्हंट होण्याकरितां विलायतेला जावयाचें नव्हतें; तर तिकडे जाऊन हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मतप्रसाराचा अेक नवा अड्डा किंवा आखाडा हिंदी तरुणांमध्यें निर्माण करावयाचा होता !

— न. चिं. केळकर. प्रस्तावना ( सावरकर चरित्र. )

विनायकानें प्राथमिक शिक्षण भगूरला, दुय्यम शिक्षण नाशिकला नि अुच्च शिक्षण पुण्याला फर्ग्युसनमध्यें संपविलें. ज्या ज्या ठिकाणीं



**मॅडम कामा**

पॅरीसमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या क्रांतिकारकांच्या 'वंदेमातरम्' या पत्राच्या क्रांतिकारक संपादिका, सावरकरांच्या अभिनव भारताच्या प्रत्येक कार्यांत धडाडीनें पाऊल टाकणाऱ्या व जर्मनीमधील आंतरराष्ट्रीय सोशॅलिस्ट काँग्रेसमध्यें भारताच्या राष्ट्रध्वज अभिमानानें फडकविणाऱ्या व त्यास अभिवादन करण्यास सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींस हुकमी आवाजांत बजाविणाऱ्या पारशी विदुषी !

तो गेला तेथें तेथें त्यानें आपले मित्र जमविले व संघटित करून ठेवले. त्यानें जमविलेले मित्र हे कार्याच्या तळमळीनं भारलेले, देश-प्रेमानें अुचंबळलेले होते. विनायकाच्या गैरहजेरींत देखील त्यांनीं घेतलेल्या प्रतिज्ञेप्रमाणें भारतांत ब्रिटिशांविरुद्ध अेकच रान अुठविलें व त्यांना 'त्राही भगवान' करून सोडलें.

**लंडनला आला —**

ज्या मित्रांच्या सान्निध्यांत गेलीं कांहीं वर्षं आनंदांत आणि अल-ढालींत घालविलीं, ज्या मित्रांच्या सहाय्यानं 'राष्ट्रभक्त समूहा'चें बीज रुजविलें; राष्ट्रभक्तसमूहाला 'मित्रमेळ्या'च्या रोपट्याचें स्वरूप आणलें व ज्या मित्रांच्या सहाय्यानें त्या रोपटयाला 'अभिनव भारता'च्या विशाल वृक्षाचें स्वरूप दिलें, त्या मित्रांना त्या वृक्षाच्या जोपासनेसंबधीं योग्य त्या जबाबदारीच्या सूचना देअून व त्यांचा अश्रुपूर्ण नयनांनीं निरोप घेअून विनायक 'पर्शिया' बोटीनें १९०६ ला लंडनला येअून पोहोंचला.

**पं. श्यामजी कृष्णवर्मा, राणा आणि मॅडम कामा —**

विनायक लंडनला येण्यापूर्वींच पं. श्यामजी कृष्णवर्मांनी बुद्धिमान, अुत्साही व त्यागी तरुणांचें मण्डळ जमा केलें होतें. १९०५ सालीं अिंडयन होमरूल सोसायटी स्थापून तिच्या विद्यमानें अिंडियन सोशि-यालिस्ट मासिक सुरू केलें. त्याच सालीं लंडनमध्यें येणाऱ्या हिंदी राष्ट्रीय तरुण विद्यार्थ्यांची राहण्याची सोय व्हावी म्हणून अिंडिया हाअूस नांवाचें वसतीगृह स्थापन केलें. श्यामजींच्या सहकार्याला राणा

व मॅडम कामा आणि अितरही कांहीं हिंदी कार्यकर्ते धावून आले. राणांनीं हिंदी विद्यार्थ्यांसाठीं शिष्यवृत्त्या ठेवल्या तर श्रीमति कामानीं जर्मनीमध्यें जागतिक समाजवादी परिषदेमध्यें भारताचें राष्ट्रीय निशाण म्हणून सूर्यकमलांकित तिरंगीध्वज फडकाविला. त्यावेळेस श्रीमति कामांनीं ओजस्वी अुद्गार काढले कीं, ‘ हें पहा भारतीय स्वातंत्र्याचें निशाण हिंदी युवकांच्या हौतात्म्याच्या रक्तानें तें आधींच पवित्र झालेलें आहे. लोक हो ! अुठा आणि अभिनव भारताच्या या ध्वजाला प्रणाम करा ! ’ अमेरिका, जर्मनी, आयर्लंड, फ्रान्स वगैरे युरोपांतील प्रमुख राष्ट्रांतील प्रमुख वर्तमानपत्रांतून व मासिकांतून हिंदुस्थानविषयक लेख लिहून श्यामजींनीं व पॅरीसमधील आपल्या ‘ वंदेमातरम् ’ पत्रामधून ज्वलंत लेख लिहून कामानीं त्या राष्ट्रांचें लक्ष वेधलें होतें.

अेवढ्या सर्व अनुकूल परिस्थितीनें भुसभुशित झालेल्या जमिनींत विनायकाचें कार्याचें बीज पडतांच त्यास अंकूर फुटून थोडक्याच काळांत मोठ्या वृक्षाचें स्वरूप आलें असल्यास नवल कसचें ?

**हालचाल —**

विनायक लंडनला आला. त्याचे पहिले कांहीं दिवस स्वतःची व्यवस्था लावण्यांत गेले. सर्व व्यवस्था ठाकठीक झाल्यानन्तर त्यानें आपल्या आवडीच्या कार्यास सुरवात केली.

डोळे उघडे ठेअून तो सभोंवार घडणाऱ्या घटनांकडे पाहूं लागला. पार्लमेंटमध्यें होणारीं भारतमंत्री व सभासद यांचीं भारताविषयींचीं प्रश्नोत्तरें, तेथील प्रमुख वर्तमानपत्रांतून भारतांतील घटनांवरील होणारे

प्रखर हल्ले व ते परतवून लावण्यास विनायकानें केलेले प्रतिहल्ले यांचें सविस्तर विवेचन तो नियमितपणें काळ पत्रांतून प्रसिद्ध करूं लागला. त्याचीं तीं 'लंडनचीं बातमीपत्रें' वाचून अनेक तरुणांचें रक्त सळसळें.

**स्वतंत्र राष्ट्रांशीं संबंध—**

अिकडे लंडनचीं अितिवृत्तें विनायक भारतास सादर करत होता, तर तिकडे निरनिराळ्या प्रमुख राष्ट्रांतील प्रमुख वर्तमानपत्रांतून भारतांतील ब्रिटिशांच्या जुलमाचीं जळजळीत वर्णनें करीत होता. अेवढेंच नव्हे तर ही जुलमी राजवट नाहींशी करण्यासाठीं भारतांतील तरुण किती हाल सोशीत आहेत, कशीं दिव्यें करीत आहेत याचेंही हृदय पिळवटणारें वर्णन करून साऱ्यांचीं मनं हिंदुस्थानवर केंद्रित करीत होता. त्याच्या या मार्गाला व कार्याला बरेंच यश आलें. अितर युरोपीय राष्ट्रें हिंदुस्थानकडे आदराने पाहूं लागली. जर्मनी तर अुघड अुघड हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करूं लागलें. पुढें पुढें तर शस्त्रांची आणि पैशांची सढळ हातानें जर्मनीनें मदत केली. या क्रांतिकारकांनीं यावेळीं जे हिंदुस्थानविषयीं प्रेम जर्मनीमध्यें निर्माण केलें त्या प्रेमाचा परिणाम म्हणजेच सुभापबाबूना गेल्या महायुद्धांत मिळालेली जर्मनीची मुक्तहस्ते मदत होय.

**गुप्त मंडळ्या—**

केवळ व्याख्यानबाजी किंवा लेखनबाजी या साधनांनीं आपलं राष्ट्र स्वतंत्र होणार नाही. या फुसक्या साधनांनीं ब्रिटिशांवर काडिमात्र परिणाम होणार नाहीं. ब्रिटिशांना दहशत बसेल व कांहींतरी दरारा बसेल असें आपण करावयास पाहिजे. आणि आपण प्रत्यक्ष

कांहींतरी करीत आहोंत अशी खात्री पटली तरच परदेशस्थ राष्ट्रें आपल्यास मदत करतील, असें विनायकास वाटूं लागलें.

यासाठीं आपण काय करावें? त्याला प्रश्न पडला. पण त्याजजवळ त्याचें अुत्तर तयार होतेंच. महत्त्वाकांक्षी, धाडसी, त्यागी, देशभक्त तरुणांची संघटना तयार करण्यांत तो अपेक्षेबाहेर यशस्वी झाला होता. त्यानें या तरुणांस हाताशीं धरलें. पुन्हां साप्ताहिक बैठकी, गुप्त बैठकी, चर्चा, सभा, सम्मेलनें, भाषणें, अुत्सव या गोष्टी सुरू झाल्या.

यावेळीं लंडनच्या वास्तव्यांत त्यानें बऱ्याच धाडसाच्या गोष्टी केल्या. त्याचें प्रत्येक पाअूल अधिक विश्वासानें व द्रुतगतीनें पडूं लागलें.

हिंदुस्थानांत साधेल त्या मार्गानें व साधेल त्यावेळीं पिस्तुलें वगैरे साहित्य पाठविण्याचा त्यानें धुमधडाका सुरू केला. पुस्तके पोखरून त्यांत पिस्तुलें भरावीं व पोष्टानें हिंदुस्थानांत पाठवावीं, येणारा जाणारा अिसम गांठावा, त्याजजवळ कापडी बैठकीच्या लांकडी खुर्च्या द्याव्यात, त्या बैठकांतून पिस्तुलें लपवावींत व त्या खुर्च्या हिंदुस्थानला रवाना कराव्यात, अेखादेवेळेस आपल्या विश्वासांतील माणूसच शस्त्रास्त्रें घेअून भारताकडे धाडावा हा त्याचा अुपक्रम नेटानें चालू झाला व अतोनात यशस्वीही झाला. पुढें हिंदुस्थानांतील अभिनव भारताच्या सदस्यांच्या हातीं हीं पिस्तुलं येतांच त्यांनीं बड्या बड्या अिंग्रज अधिकाऱ्यांचा खून करण्याचा सपाटा लावला. अेकामागून अेक गोऱ्या नोकरांचे मुडदे पडूं लागले. त्यांच्या छातींत धडकी भरली. भारतांत फिरणें अगर दौरे काढणें त्यांना कठीण होअून बसलं.

अशा प्रकारें हिंदुस्थानांत विनायक आणि मंडळींकडून शस्त्रास्त्रं येतच होतीं. त्याचेच जोडीला विनायकानें महत्प्रयास घेऊन व अभ्यासून लिहिलेले मॅझिनी, १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध आदि ग्रंथ ब्रिटिश पोलिसांच्या, पोष्टल अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत धूळ फेकून बेमालूमपणें पाठवावींत व त्यांचा प्रसार करावा; यांतही त्याला विलक्षण यश मिळालें. त्यानें लिहिलेले ग्रंथ अितके ज्वलज्जहाल असत कीं जन्माआधींच त्यांवर सरकारची बंदी येअी.

अशा ज्वलज्जहाल वाङ्मयाचा व तडफदार मोहक वाणीचा हिंदी तरुणांवर भयंकर परिणाम होअून त्यांचें त्याजभोंवतीं अेक कडेंच जमलें.

**सेनापति बापट—**

याचवेळीं सेनापति बापटही पण मुंबअीहून आले होते. त्यांचाही विनायकाशीं परिचय होअून तेही विनायकाच्या तरुण गटांत सामील झाले. विनायकानें बापटांना बॉंबची विद्या शिकण्यासाठीं पॅरीसला पाठविलें. बापट पॅरीसला गेले व अेका रशियन तरुणीजवळ ती विद्या शिकलेही. बापट परत लंडनला आले. बॉंब्सच्या पुस्तिका छापल्या जाअूं लागल्या व त्याचा भारतांत प्रसार होअूं लागला.

अेकदां हा बॉंब्सचा कारभार अगदीं फुटण्याच्या बेतांत आला होता; पण विनायकाच्या प्रसंगावधानानें तो वांचला. त्याचें असें झालें. सर्वजण शेकोटीभोंवतीं बसले होते. जवळच प्रिक्रिप ॲसीडचे डाग पडलेले कागद पडले होते. बापटानीं ते अुचलले नि शेकोटींत टाकून दिले. झालें! खूप मोठा आवाज झाला. दैव बलवत्तर म्हणूनच विनायकानें कसेंबसें तें प्रकरण जिरविलें.



सेनापति बापट

बॉंबची विद्या हस्तगत होतांच ब्रिटिश पार्लमेंटवर तो टाकण्यास धांवणारे,
सावरकरांच्या अभिनव भारताचे अेकवेळ क्रांतिकारक सभासद असलेले,
भारतांत सर्वत्र बॉंब्सूचा प्रसार करणारे, म. गांधींच्या चळवळीं-
तही अहम्‌महिमकेनें भाग घेणारे, जनसेवा व देशसेवा प्राणा-
पलिकडे मानणारे, गांधी-वध अभियोगांत सारा महाराष्ट्र
प्रक्षुब्ध झाला असतां व सावरकरांचें केवळ नांवही
घेणें अशक्य झालें असतां 'अभियोगास'
न्याय सहाय्य निधीस अुघड अुघड दहा
रुपये देण्याचें धाडस करणारे पहि-
लेच न्यायप्रेमी व थोर अन्तः
करणाचे महाराष्ट्राचे देशप्रेमी
व लाडके सेनापति.

यानन्तर हिंदुस्थानांत बॉम्बचा प्रसार व्हावा म्हणून विनायकानें बापटांना भारतांत पाठविलें. या विद्येचा प्रसार भारतांत फार मोठ्या प्रमाणांत झाला. पुणें, नासीक, कोल्हापूर, बंगाल, मद्रास सर्वत्र बॉंबस्फोट होऊं लागले. ठिकठिकाणीं बॉंबचे छोट्या प्रमाणांत कारखाने उघडले गेले.

ही बॉंबची विद्या हस्तगत होतांच सरकारी अधिकाऱ्यांवर, गाड्यांवर बॉंब्स पडूं लागले. असाच अेक स्फोट मुझफरपूर येथें झाला. वास्तवीक हा बॉंब मुझफरपूरच्या मॅजिस्ट्रेटवर टाकावयाचा होता; परंतु टांगा मॅजिस्ट्रेटच्या घरापुढेंच थांबल्यानें गैरसमज होअून मॅजिस्ट्रेट अैवजीं त्या टांग्यांतील दोन युरोपियन स्त्रिया मात्र हकनाक प्राणास मुकल्या.

म्हणजे चोर सोडून संन्यासी बळी गेला. याबद्दल पुढें खुदीराम बसू पकडला गेला व फांशींही गेला. मात्र बसूला पकडणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचाही खून लवकरच झाला.

**‘ धिंग्रा प्रकरण ’ —**

विनायकाच्या चरित्रांत अनेक वीरांचीं चरित्रं सामावलीं आहेत. त्यांत मदनलालला बऱ्याच वरचं, किंबहुना पहिलंच मानाचं स्थान प्राप्त झालं आहे. मदनलाल हा अेका पंजाबी सिव्हिल अिंजिनिअरचा मुलगा ‘ आपण अुच्च शिक्षण घेण्यास अिंग्लंडला जावं ’ असं त्याला फार वाटे; पण त्याचा स्वभाव पडला हूड, त्यामुळें त्या गोष्टीस त्याला वडिलांची संमति मिळेना; तेव्हां त्यानें अिंग्लंडला जाणाऱ्या अेका बोटीवर आगलाव्याच्या हाताखालीं काम पत्करलें व तो लंडनला आला. तेथें त्यानें शिक्षणांत प्रथम दर्जाचें यश मिळविलें.

लंडनमध्यें आल्यावर मदनलालची विनायकाशीं ओळख झाली व तो वरचेवर भातभवनांत जाऊं लागला. शेवटीं तो अभिनव भारताचा सभासदही झाला.

मदनलाल अतिशय सोशीक होता. अेकदां त्यानें सर्वचेसर्व टांचणी कांही शर्यतीवरून तळहातांत अरापार टोंचून घेतली रक्ताचें कारंजें अुडूं लागलें तरी बेट्यानें हूं कीं चूं केलें नाहीं आणि 'आम्ही हिन्दी तरुणही सोशिकपणांत अितरांहून कमी नाहीं' हें पटवून दिलें. तसेंच दुसऱ्या अेका प्रसंगीं बॉम्बचें मिश्रण तापविलें जात होतें. ठराविक अुष्णतामानावर तें तापविलेंहि गेलें होतें. आतां तें नच अुतरलें तर साऱ्यांचे प्राण तर गेलेच असते. शिवाय सारें बिंग बाहेर पडून आजवरची सारी तपश्चर्या व्यर्थ गेली असती. मिश्रण अुतरायला तर हवें होतें. अुतरण्यास जवळपास चिमटा तर नव्हता. आतां करावें काय? सारे विचारांत पडले. पण हा पठ्ठा पुढें झाला. बहाद्दरानें तें अुकळतें मिश्रण दोन्ही हातांनीं धरून खालीं अुतरविलें. त्याच्या हाताचे पळकेच्या पळके निघाले.

मदनलाल जसा सोशिक, शूर व धाडसी होता, तसाच रंगेल व बेफिकीरही पण होता. अेका प्रसंगीं त्याच्या छचोरपणाबाबत त्याची विनायकानें चांगलीच कान अुघाडणी केली.

त्यावेळीं भारतभवनांत आंतील दालनांत सभासदांची गुप्त बैठक भरली होती अन् बाहेर रस्त्यालगतच्या खोलींत मदनलाल रंगेल गाण्याच्या 'रेकॉर्डस्' लावीत बसला होता. रस्त्यावर खोलीच्या

खिडकीपाशीं बेछूट पोरींचा घोळका जमला होता. गलबला वाढूं लागला. नि आंतील बैठकीला व्यत्यय येऊं लागला. विनायक बाहेर आला नि पहातो तो हे राजश्री ! विनायक थोडासा चिडूनच म्हणाला,

'मदनलाल ! कृतीच्या आणि हौतात्म्याच्या गोष्टी बोलतोस आणि त्या गोष्टी श्रेष्ठ म्हणून बैठकी नि चर्चा टाळतोस ! या पोरींचा घोळका नि या गाण्यांच्या ललकाऱ्या हींच काय तुझ्या कृतीचीं नि हौतात्म्याचीं लक्षणें !'

या अुद्गारांनीं मदनलाल अितका शरमला कीं, त्यानें चार दिवस विनायकाला तोंडही दाखविलें नाहीं; अन् त्यानन्तर अकस्मात विनायकापुढें येअून त्याला विचारिलें, 'खरंच कां हौतात्म्य गाजाविण्याची वेळ आली आहे ?'

विनायक म्हणाला, 'हुतात्मा मनानें खंबीर व सिद्ध झालेला असेल तर, त्यांत प्रायः हेंही गर्भित असतें कीं, हौतात्म्य गाजविण्याची वेळ प्राप्त झाली आहे.'

विनायकाशीं झालेल्या या भाषणानन्तर मदनलालांत विलक्षण बदल झाला. त्यानें आपलें मूळचें वास्तव्य बदललें व मिसेस मेरी हॅरीसच्या घरीं वास्तव्य ठोकलें. हिंदी विद्यार्थ्यांनीं विनायक प्रभृतींच्या भारतभवनांत न अडकतां त्यांना आपल्या जाळ्यांत ओढण्यासाठीं म्हणून जी संस्था तेथील कांहीं ब्रिटिश व हिन्दी लोकांनी काढली. त्या नॅशनल अिंडियन असोशिअेशनचा तो असोशियेट मेंबर बनला व विनायकाच्या घोळक्यांतील अेक मेंदरू आपल्या कळपांत आल्या-



मदनलाल धिंग्रा

मृत्यूच्या मांडीवरही आओीच्या मांडीवर लोळत असल्याचें सौख्य अुप-
भोगीत असलेले, निर्विकार मनानें तुरुंगांत कंगवा, आरसा आदि
सौंदर्य–प्रसाधक साधनांची मागणी करणारे, पिस्तुलाचा भयप्रद
अुपयोग करूनही नाडी नेहमीप्रमाणेंच ठीक चालणारे व
पकडले असतांही ' अहो तो पलिकडचा गॉगल जरा देतां
कां ? ' म्हणून विचारणारे, तो: हातीं येतांच अैटीनें
डोळ्यास लावणारे व पोलिसांनीं दडपला असतांही
साऱ्या जगास हादरविणारा जबाब–चॅलेंज देअून
अजरामर ठरलेले भारताचे अभिनव भारतांतील
हुतात्मा ते हे मदनलाल !

बद्दल त्यांनाही अेकप्रकारचा विजयी अभिमान वाटूं लागला. पण बेट्यांना मदनलालच्या पोटांतलं काय कळणार ?

मदनलालांत झालेला हा बदल भारतभवनांतील अितर सभासदांना मुळींच पटला नाहीं. त्यांनीं अेकसारखा लकडा लावला कीं, ' मदनलाल फिरला, मदनलाल फितूर झाला, सबब त्याला आपल्या संस्थेच्या सभासदांच्या यादींतून कमी करावें. '

यावेळीं विनायकापुढें मोठाच पेंच अुभा राहिला. मदनलालचे सर्व मनोव्यवहार त्याला माहीत होते; पण ते त्यास अुघड करतां येत नव्हते. बरं अिकडे या तिघांचें गुफ्तगू काय झालें तें सभासदांना जर ठाअूक नाहीं तर मदनलालचे मनोव्यापार त्यांना कळणार तरी कसे ? अशी त्याची दोरावरची सर्कस चालू होती. कसेंबसें त्यानें सभासदांचें समाधान केलें कीं, आपण आणखी कांहीं दिवस थांबून काय घडतें तें पाहूं.

**आणि काय घडलें !—**

आणि थोड्या दिवस थांबल्यानन्तर त्यांना काय दिसून आलें ? मदनलाल फितुर झाला आहे असें कां त्यांना दिसून आलें ? त्यांच्या संस्थेच त्याचें सभासदत्व कां त्यांना रद्द करावें लागलें ? नाहीं. अुलट संस्थेच्या प्रत्येक सभासदाला मदनलालची कार्ति गावी असेंच वाटूं लागलें. असें त्यानें काय केलें बरें ?

हरएक प्रकारच्या हिकमती लढवून त्यानें पिस्तुलाचा परवाना काढला. नॅशनल अिंडियन असोसिअेशनच्या त्री त्चिटणासांच्या सहा-

त्यानें बड्या धेंडांच्या ओळखी करून घेतल्या अन् अेका समारंभ प्रसंगीं त्यानें कर्झन वायली व दुसरा अेक पारशी डॉक्टर यांचा खून केला.

थोड्याच क्षणांत त्याला पकडण्यांत आलें. त्यावेळीं डॉक्टरनें त्याची नाडी व छाती तपासली. डॉक्टरांची छाती धडधडत होती. परंतु मदनलालची नाडी नेहमीप्रमाणेंच शांत चालू होती. कोठडींत असतां त्यानें कंगवा, आरसा आदि साधनांची मागणी केली होती.

अशा या वीर पुरुषास १७ ऑगस्ट १९०९ ला फांशी दिलें.

**मदनलालचा जबाब—**

मदनलालनें कर्झन वायलीचा खून केल्यानें आंग्ल जनतेस धक्का बसला नसेल त्याच्या शतपटीनें त्याच्या जबानीनें साऱ्या जगास बसला. धिंग्रानें आपल्या जबानींत सांगितलें, 'अिंग्रज लोकांनी चालविलेलें अमानुष ढोंग, त्यांनीं चालविलेला तमाशा व विटंबना आणि ते घेत असलेले भारतीयांचे पद्धतशीर खून, या कृत्यानींच मी हा खून करण्यास प्रवृत्त झालों. जित आणि जेते यांपैकीं आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याप्रित्यर्थ जितांनीं जेत्याचा खून केल्यास तो खून वा गुन्हा होत नाहीं.

तुम्ही मला फांशीं द्या, खुशाल फांशीं द्या. परमेश्वराच्या न्यायालयांत मी निर्दोषी आहे.'

**माय गॉड ! सावरकर !! सावरकर !!!—**

वास्तविक मदनलालनं केलेलं कृत्य 'देशा'साठीं केलेलं होतं. त्यांत त्याचा वैयक्तिक स्वार्थ मुळींच नव्हता. अर्थातच त्या कृत्याचा

निषेध करण्याची आवश्यकता नव्हती. निदान भारतीयांनीं तरी निषेध करण्याजोगें तें कृत्य खास नव्हतें. पण कांहीं शिष्ट व महंत भारतीय राजकारण्यांना हें कृत्य मानवलें नाहीं व त्यांनीं त्याचा निषेध करण्यासाठीं अेक सभा भरवली. तेथें व्याख्यात्यांनीं त्याच्या निषेधार्थी भाषणें केलीं व निषेधपर ठराव मांडला. त्या सभेचे अध्यक्ष आगाखान होते. त्यांनीं 'सर्वानुमतें पास ना?' असें नाममात्र विचारून, मतें न अजमावतांच 'सर्वानुमतें पास' असें जाहीर केलें. त्या सभेस विनायकही हजर होता. ताडकन तो अुठून अुभा राहिला नि म्हणाला, 'नाहीं! ठरावाला विरोधी मतेंही पण आहेत.' तापलेला रस कानांत ओतावा त्याप्रमाणें साऱ्या श्रोत्यांची अवस्था झाली. त्या सर्वांचें लक्ष त्या तेजस्वी तरुणाकडे गेलें. जो तो आपापसांत कुजबुजूं लागला. 'कोण बरें हा वीर पुरुष असावा?' अेवढया प्रचंड सभेमध्यें विरोध करावयास ठाकणाऱ्या त्या तेजस्वी विनायकाविषयीं प्रत्येकालाच अुत्सुकता लागून राहिली व त्याचें नांव जाणून घेण्याची जिज्ञासा अुत्पन्न झाली.

पण ज्यावेळीं त्यांना त्याचं नांव कळून चुकलं तेव्हां सभेंत जी कांहीं धांदल अुडाली ती अवर्णनीयच. केवळ 'सावरकर' या नांवाची धास्ती अिंग्लंडला किती बसली होती याचं तें अेक अुत्कृष्ट अुदाहरणच आहे किंबहुना महाराष्ट्राची ती परंपरा आहे. मोगलांच्या स्त्रिया मुलांना गप्प बसविण्यासाठीं 'संभाजी'चा धाक घालीत. संताजी-धनाजी तर मोगलांच्या घोड्यांना पाण्यांतसुद्धां दिसत व क्षणभर पाणी पिण्यासही ते थबकत. बंगालमध्यें महाराष्ट्रियांची अितकी धडक-

भरलेली असे कीं त्यांनीं त्यासाठीं मराठा खंदक खोदला आणि आजही आपल्या स्वातंत्र्यांतील सरकारला सर्वत्र मराठी वर्तमानपत्रेंच भेडसावीत आहेत.

असो. त्यावेळीं त्या तरुणाचं नांव 'सावरकर' आहे असें कळलें मात्र, सर्वांच्याच हृदयांत धडकी भरली. आतां हा तरुण काय भल-ताच प्रसंग निर्माण करील काय, असेंच ज्याला त्याला वाटूं लागलें. आंग्लस्त्रिया रडूं लागल्या. कोणी खुर्ची खालीं, बाकाखालीं सांपडेल त्या ठिकाणीं दडून बसूं लागले. कोणी जीव घेऊन सैरावैरा पळूं लागलें.

असा तेथें अेकच कोलाहल माजून राहिला. सभेचं पर्यवसान शेवटीं धक्काबुक्कींत झालं व विनायकाच्या डोळ्यास जबर दुखापत झाली.

**हेरखात्यांत प्रवेश —**

विनायक व त्याचे साथीदार आणि अितर क्रांतिकारक या प्रचंड अुलाढाली करत असतां ब्रिटिश सरकार कांहीं झोंपा घेत बसल नव्हतें. अगर ब्रिटिश वर्तमानपत्रें अगदींच नादान बनलीं नव्हतीं त्याच्या तर डोळ्याला डोळा लागत नसे. सतत डोळ्यांत तेल घालून ते सर्वत्र लक्ष पुरवत. लंडन टाअिम्ससारख्या वर्तमानपत्रानं तर विनायक व त्याची प्रभावळ आणि हिंदुस्थानांत प्रत्यही घडत असलेला राजकीय क्षोभ यांवर टीकेची झोड अुठविली होती. ब्रिटिश सरकारच्या दुबळ्या धोरणावर कडक हल्ले चढविले होते व कांहींही करून या भारतीय क्रांतिकारक चळवळी दडपल्याच पाहिजेत असें सुचविलें होतें.

खुद्द लंडनमध्यें आपल्याच बांधवांकडून टीकेचें शेलापागोटें बहाल मिळूं लागल्यावर सरकारनें सर्वत्र हेरांचें जाळें पसरविलें. भारतभवना-

वरही पाळत ठेवली. खुद्द भारतभवनांतही अेका हेरानें ठाण मांडलें. पण विनायक कांहीं कच्च्या गुरुचा चेला नव्हता. त्यानें त्यांच्या डोळ्यांत त्यांचींच बोटें खुपसलीं. भारतभवनांत ठाण मांडून बसलेल्या हेराला मोठ्या चातुर्यानें फितविलें व सरकारचे सर्व बेत हाणून पाडले. त्याचप्रमाणें भारतीय तरुणांवर देखरेख ठेवण्यासाठीं ब्रिटिशसरकारनें अेक हेरखातें उघडलें होतें. त्यावर देखरेख ठेवण्यासाठीं अेका हिंदी माणसाची 'प्रमुख' म्हणून नेमणूक केली होती. पण तोच मुळीं विनायकाचा हस्तक होता. त्यामुळें सरकारला विनायकाची हालचाल कळण्याअैवजी विनायकालाच सरकारच्या सर्व हालचालींची वित्तं-बातमी कळे.

### अिकडे भारतांत—

अशीं ब्रिटिशांना खडे चारणारीं कृत्यं खुद्द त्यांच्याच राजधानींत चाललीं असतां अिकडे भारतांत काय चाललें होतें? भारतांतील क्रांतिकारकही नेटानें कार्य करीत होते. भारतीय क्रांतिकारक आतां परमोच्च बिंदूवर अुभे होते. त्यांचीं पावलें आतां विनाशाच्या खोल दरीकडे पडूं लागलीं होतीं व लवकरच ते त्या कड्यावरून खालीं खोल दरींत कोसळणार होते.

विनायकाचे बंधू बाबा यांना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. बाबांच्या गुप्त कागदपत्रही संग्रहीं बाळगण्याच्या व गळ्याला तात लागली असतांही ते कोठें आहेत हें न सांगण्याच्या अशा क्षुल्लकशा भासणाऱ्या चुकीचे घोर परिणाम लवकरच भोगावे लागणार होते.

**पारध्यानें जाळें पसरलें —**

नाशीकचा कलेक्टर जॅक्सन अेकदां किर्लोस्कर कंपनीचें शारदा नाटक पहाण्यास आला होता. गंधर्वांचें त्यांतील शारदेचें काम पाहून तो व सर्व नाटकगृह मोहून गेलें होतें. गंधर्वांचें गाणें रंगलें होतें. आणि हा मोका साधून अनंत कान्हेरे या क्रांतिकारकानें जॅक्सनचा पिस्तुलानें खून केला. येथेंच भारतीय क्रांतिकारकांच्या पराभवाचा पाया रचला गेला.

या खुनाबद्दल कान्हेरे, कर्वे, देशपांडे या त्रिवर्गांना फांशीं दिलें. या जॅक्सन खून खटल्यांत नवीनच गोष्टी अुघडकीस आल्या व या सर्व हालचालीमागें जबरदस्त असा कोणाचा तरी हातही असावा असा सरकारला संशय आला.

जॅक्सनचा खून प्रत्यक्षपणें नाशकांत झाला असला तरी त्याचा खरा सूत्रधार लंडनमध्यें आहे. त्याला पकडावा कसा व हिंदुस्थानांतील न्यायालयामार्फत शिक्षा ठोठावावी कशी, याची हिंदुस्थान सरकारला विवंचना लागून राहिली.

मध्यंतरी बाबांनीं दडवून ठेवलेली सभासदांच्या नांवांची यादी व अितर कांही भक्कम पुरावा पोलिसांच्या हातीं लागला. देशांत सर्वत्र मोठ्या प्रमाणावर झडत्या व धरपकड होअून, या सर्व प्रकारचीं मुळं खोलवर रुजलीं असून या सर्वांचीं सूत्रं सावरकर लंडनमध्यें राहून हलवीत आहेत अशी सरकारची पूर्ण खात्री पटली. तसा पुरावाही प्राप्त झाला व तशा अर्थाचा खलिता ब्रिटिश सरकारकडे रवानाही

झाला. पारध्यानें जाळें पसरून ठेवलें व तो शिकारीची वाट पाहूं लागला.

**अखेर पारध गवसली —**

हें जॅक्सन प्रकरण पूर्णपणें क्रांतिकारकांच्या अंगाशीं आलं. तिकडे लंडनमध्यें विनायकाच्या विरुद्ध सरकारच्या हालचाली चालूच होत्या. मध्यंतरी झालेल्या हालचाली, धिंग्रा निषेधप्रकरणावेळीं झालेली जखम, खाण्याची आबाळ या सर्वांचा परिणाम म्हणून विनायक आजारी पडला व त्यानें फ्रान्समध्यें ब्रायटनला प्रयाण केलें. येथेंच त्याला समुद्रकिनारीं 'सागरा प्राण तळमळला' हें सुप्रसिद्ध काव्य स्फुरलें.

भारतभवन ब्रिटिशांच्या वाढत्या रोषामुळें बंद करावें लागलें. पाल-बाबूंच्या निवासस्थानामध्यें सुद्धां राहणं धोक्याचं वाटूं लागलं. अेवढंच नव्हे तर अशक्य होअून बसलं. त्याला राहण्याला घर मिळेना व त्याची 'शय्याभूमितलं दिशोऽपि वसनं' अशी केविलवाणी स्थिति झाली. तेव्हां कांहीं दिवस तरी स्थानत्याग अवश्य होता.

पण हा स्थानत्याग त्याला फार दिवस लाभला नाहीं. हिंदुस्थानांत शेंकडों क्रांतिकारक पकडले गेले. अनेकांना फांसावर लटकावलें. बाबांना जन्मठेप झाली. त्यांची अंदमानांत रवानगी झाली. श्वशुरांची मिळकत जप्त झाली व या सर्वांस कारण आपण, केवळ आपण व आपणच. असें असूनही आपणच अशा सुरक्षित ठिकाणीं राहणं त्याच्या मनाला रुचेना व त्यानें फिरून लंडनला जाण्याचें ठरविलें.

विनायकाच्या लंडनला जाण्याला मॅडम कामा, पं. श्यामजी कृष्णवर्मा, राणाजी या सर्वांनीं कसून विरोध केला. पण त्यानें जुमानलें नाहीं.

' ज्या लोकांनीं संसारावर निखारे ठेऊन आपल्या सर्वस्वाचा होम केला आणि बालपणापासून आपलें पुढारीपण मान्य केलें अशा लोकांना संकटांत सांपडलेलें पाहून त्याचें अन्तःकरण द्रवलें, त्याच्या मनाची शांति ढांसळली आणि आपले पुढारीपण सिद्ध करण्यासाठीं तो तडक लंडनला येऊन दाखल झाला. '

लंडनला येतांच व्हिक्टोरिया स्टेशनवर स्कॉटलंड यार्डच्या गुप्त पोलिसांनीं दि. १३ मार्च १९१० रोजीं रात्रीं त्यास वॉरंट दाखवून कैद केलं व अखेर भारताचा सिंह जाळ्यांत अडकला आणि पारध्यास शिकार ( पारध ) गवसली.

**सोडविण्याचा प्रयत्न—**

विनायकाला अटक झाली व ब्रिक्स्टनच्या तुरुंगांत डांबण्यांत आलें. सावरकर बचाव समितीतर्फे त्याच्या सोडवणुकीचे कायदेशीर प्रयत्न झाले व त्याजबरोबर त्याच्या धाडसी सहकाऱ्यांनीं त्यास तुरुंगांतून सोडवून नेण्याचे प्रयत्न केले; पण दुर्दैवानें त्यांतील अेकही सफल झाला नाहीं.

ज्या वेळीं त्याचे मित्रांना त्यास भेटण्याची परवानगी मिळाली त्यावेळीं त्यांपैकीं कोणातरी अेका मित्राचा पोशाख करून त्यानें निघून जावें व मित्रानें तेथें रहावें असें ठरलें. त्यावेळीं त्यांजसमोर

संभाजीचा अितिहास होता. पण प्रकृतिभिन्नतेमुळें तो प्रयत्न त्यांना अमलांत आणतां आला नाहीं. दुसरा प्रयत्न आयरिश तरुणांच्या सहाय्यानें करण्यांत आला. खटला चालू असतां विनायकास अेका गाडींतून कोर्टांत नेत असत. अेकदां त्या गाडीवरच त्यांनीं हल्ला केला. परन्तु सरकारला या बेताची आगाअूच कुणकुण लागल्यानें त्या दिवशीं पोलिसांनीं ती गाडी कोर्टाकडे मोकळीच नेली. त्यामुळें क्रांतिकारकांच्या हातीं विनायक लागला नाहीं व क्रांतिकारकांचा तोही प्रयत्न हुकला. तेव्हां सनदशीर प्रयत्न जोरानें सुरू झाले.

# - कारागारांत -

आजपर्यंत शक्य तितकें अधिक काम करण्याची मी पराकाष्ठा केलेली आहे. आतां मला अधिकांत अधिक दारुण दुःख सहन करण्याची पराकाष्ठा करूं द्या.

सावरकर जीवन चरित्र

हिंदुस्थानचा क्रांतिसिंह अिंग्रजांच्या जाळ्यांत अडकला. विनायक अिंग्रजांचा कैदी बनला. त्यानन्तर थोड्याच दिवसांत त्याजवर खटला भरण्यांत आला नि त्याच्या सुनावणीस सुरवातही झाली.

खटला सुरू असतांच सरकारला दिसून आलं कीं, विनायकाची मित्रमंडळी ब-याच अुलाढाली करीत आहे. मोठमोठें नामांकित वकील देअून विनायकाची बाजू भक्कम करूं पहात आहेत. आणि न जाणो अिंग्लंड हें लोकशाही प्रधान राष्ट्र आहे. आरोपींचा अेखादा वकील कांहींतरी विलक्षण मुद्दा अुपस्थित करील नि हातची पारध सहजा-

सहजी निघून जाओल. यापेक्षां कांहींतरी युक्ति योजून आरोपीची चौकशी येथें न करतां हिंदुस्थानमध्येंच करावी. हिंदुस्थान हें साम्राज्यांतर्गत राष्ट्र आहे. तेथील न्यायालयें आपलींच आहेत. तेथें आपण हवी तितकी कठोर शिक्षा ठोठावूं. याचें भाकीत लाला हरदयाळांनीही पुढील प्रमाणेंच केलें होतें–' कदाचित तिकडे हिंदुस्थानांत बचावासाठीं वकील–बॅरिस्टर देण्याची योजना होओल; पण चौकशी होओल ती शुद्ध पोरखेळाच्या स्वरूपाची होईल.'

आणि हें जाणूनच सरकारी वकीलानें हा मुद्दा उपस्थित केला. व न्यायालयानें ' आरोपीला त्याच्या देशांतच चौकशी होणं हें अधिक फायद्याचं होओल ' असा निकाल दिला.

**तुरुंगांतून हलविलें —**

अर्थात न्यायालयाचीच सम्मति मिळाल्यावर ब्रिटिश सरकार थाबतें थोडेंच! त्यानें त्यास हिंदुस्थानांत नेण्याची जय्यत तयारी केली. त्याला ज्या ' मोरिया ' बोटीवरून न्यावयाचें ती बोट मध्यंतरी थांबणार कीं नाहीं याची वाच्यता सरकारनें मुळींच होऊं दिली नाहीं. त्याला माहीतच होतें कीं, त्याचा मित्रगण विनायकास हरप्रयत्नें सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे.

पण विनायक कांहीं बोळ्यानें दूध पीत नव्हता. त्यानें ऋषिजी ऊर्फ व्ही. व्ही. अस्. अय्यर, मॅडम कामा आदि सहकाऱ्यांना तुरुंगांतून गुप्त पत्रें लिहून ' मार्सेलिस बंदरावर जय्यत तयारीनिशीं सज्ज रहा ' असा आदेश पाठविला आणि त्याप्रमाणें झालेंही. पण उशीरा.



**ऋषिजी**

श्री. व्ही. व्ही. अेस् अय्यर ! खरें नांव व्यंकट सुब्रह्मण्य अय्यर ! प्रथम चैनी, अहमन्य पण पुढें सावरकरांचें 'ब्रिटिश राज्यपद्धतीनें आपल्यावर अुपकार केले आहेत काय ?' या व्याख्यानानतर सावरकरांचें क्रांतिकार्यांतील अुजवे हात बनले. भारतभवनांत ठाण मांडून बसलेल्या हेरालाच चतुराअीनें आपल्या जाळ्यांत अडकविलें. सावरकरांच्या अटकेनंतर त्यांच्या सुटकेसाठीं अनेक धाडसाचे प्रयत्न केले. ब्रिटिश हेरांना सहजासहजीं चकविलें व चमकाविलें. धिंग्रा निषेध सभेच्यावेळीं सावरकरांना जखम होतांच जखम करणाऱ्यावर चवताळून पिस्तूल रोखले. ते हे सावरकरांचे ऋषितुल्य व बंधुतुल्य नि सावरकरांच्या अनुपस्थितींत अभिनव भारताची जबाबदारी पत्करणारे विश्वासू सहकारी !

विनायकाला १-७-१० रोजीं मोरिया बोटीवर चढविलें. बोट चालू झाली. विनायकाचे विचारही चालू झाले. त्यानें विचार केला ' आपण कैदी बनलों. शिवाजीही कैदी बनला होता. पण त्यानें औरंगजेबाच्या डोळ्यांत धूळ फेंकली व त्याच्या हातावर तुरी देऊन मोठ्या बदोबस्तांतूनही निसटला. त्या शिवछत्रपतीच्या महाराष्ट्रांतलें आपण. आपणही महाराष्ट्राचें तेज दाखवूंया व शत्रूला पटवूंया कीं, महाराष्ट्र मेला नाहीं, तो अजून जिवंत आहे. ज्या महाराष्ट्रांत हिंदुपत-पादशाही स्थापणारा शिवाजी झाला, अटकेवर ध्वज फडकाविणारा राघोबा झाला, साऱ्या भारताला दरारा बसविणारा बाजीराव झाला, दिल्लीचें तख्त फोडणारा सदाशीवराव भाऊ झाला तो महाराष्ट्र मरेल कसा?

विनायकाच्या मनांत असा विचार आला मात्र; लगेच त्या दृष्टीनें तो संधि पाहूं लागला. बोट बिस्केच्या उपसागरांत शिरली. वादळी वारे वाहूं लागले. बोट हेलकावूं लागली. बिस्केचा उपसागर गेला. आतां बोट मार्सेलिस बंदरांत शिरली; तरीही विनायकाला संधि मिळाली नाहीं. होतां होतां मार्सेलिस बंदर आलें. बंदरांत बोट थांबणार नाहीं असाच सर्वांचा समज करून दिला होता आणि कदाचित थांबलीही नसती. पण बोटीच्या अेंजिनांत बिघाड झाला नि बोट थांबली.

हीच खरी वेळ होती आणि विनायकानें ती साधलीही. त्यानें पहारेकऱ्यांस 'संडास'मध्यें नेण्यास सांगितलें. पहारेकऱ्यानें त्यास संडास-मध्यें नेलें. आंतील कैदी काय करीत आहे हें दिसावें म्हणून मोठ्या खुबीनें संडासांतील कांचांची रचना केली होती. चाणाक्ष विनायकानें हें तेव्हांच ताडलें व कांहींतरी निमित्तानें त्यानें पहारेकऱ्यास तेथून दूर

घालविलें व तेवढया मुदतींत अंगावरील कपड्यानें ते आरसे झांकून टाकले व संडासमधील पोर्टहोलमधून त्यानें समुद्रांत उडी घेतली. तें पोर्टहोल बरेंच लहान असल्यानें विनायकाचें सारें अंग खरचटलें व रक्ताळलें; पण सागरानें त्यास अलगत झेललें व मार्सेलिसच्या धक्क्याजवळ नेऊन सोडलें.

## फ्रेंच हद्दीवर

धक्क्याजवळ येतांच विनायकानें तो उंचच्या उंच कडा चढण्यास प्रारंभ केला. पण थोडा वर जातो न जातो तोंच तो खालीं पाण्यांत कोसळला. सिंहगड चढत असतां तानाजीची यशवंती घोरपड परतली. 'यशवंतीनें' अपशकून केला. पण अेवढ्यानें 'तानाजी' डगमगला नाहीं. त्यानें फिरून प्रयत्न केला. विनायकही पुन्हां प्रयत्न करून तो तट चढला नि फ्रेंच हद्दीला लागला.

जमिनीवर येतांच त्यानें पोलिसास हाका मारण्यास सुरवात केली. तो स्वतः धावूं लागला. त्याला फ्रेंचांच्या न्यायालयांत जायचं होतं. आपले सहकारी जवळपास तेथेंच कोठे आहेत कां हें पहावयाचें होतें. पोहण्याचा, त्यांतच तट चढण्याचा शीण आलेला, अंग खरचटलेलें, भिकाऱ्यासारखाच नव्हे तर मवाल्यासारखा भासणारा तो महाराष्ट्रीय वीर समोरून बसेस् येत असतां, मागून बसेस् जात असत पहात होता. त्यांत तो चढतां तर केव्हांच न्यायालयांत वा आपल्या मित्रांत पोंचतां. पण त्याजजवळ त्यावेळीं अेक दिडकीही नव्हती. त्याचे सहकारीही तेथें हजर नव्हते आणि याचा परिणाम केवढा घोर झाला !

**पुन्हां कैद —**

विनायकानें अेवढा मोठा सांवळा गोंधळ केला तेव्हां बोटीवरही अेकच गडबड अुसळली. 'कैदी पळाला, कैदी पळाला, सावरकर पळाला' अशा आरोळ्या निघूं लागल्या. बोटींवरील प्रवाशांपैकीं कोणी खेद, कोणी त्वेष, कोणी राग, कोणी आश्चर्य वा कोणी आनंदही दर्शवीत होते.

बोटीवरील अधिकारीही त्याचा पाठलाग करूं लागले. विनायक मध्यंतरीं चढतांना खालीं न कोसळता, अगर त्याजजवळ अेखादी दिडकी वा पेनी असती, अथवा त्याचे बंधुतुल्य व्ही व्ही. अेस् अय्यर प्रभृति सहकारी त्याचवेळीं जवळपास कोठें असते, तर तो त्यांच्या हातास मुळींच लागला नसता. कदाचित् त्याचें आयुष्यही निराळें बनलें असतें. पण विधिघटना कोणाला टाळतां आली आहे कां ?

शेवटीं पाठलाग करणाऱ्या आधिकाऱ्यांनीं विनायकाला गांठलेंच. 'आतां आपला निभाव लागणार नाहीं' असें पाहतांच जवळ असलेल्या फ्रेंच पोलिसाच्या तो स्वाधीन झाला. पण फ्रेंच पोलीस पैशाला भाळला आणि लांच घेअून त्यानें विनायकास ब्रिटिशांच्या ताब्यांत परत दिलें.

विनायक परत कैदी म्हणून बोटीवर आला. आतां त्याजवर कडक बंदोबस्त ठेवण्यांत आला. पहारेकरी त्याला पावलोंपावलीं डिवचूं व हिणवूं लागले; पण करतो काय ? पिंजऱ्यांत डांबलेल्या सिंहासारखी त्याची अवस्था झाली होती.

**हेगच्या न्यायालयाचें बाहुलें—**

लांच देऊन विनायकाला ब्रिटिश पोलिसांनीं परत घेतलं खरं; पण त्यानन्तर साऱ्या युरोपभर जो हलकल्लोळ माजला त्याला तोंड देणं हें कांहीं सोपं काम नव्हतं.

विनायक 'फ्रेंचां'च्या 'जमिनी' वर उतरला होता, या गोष्टीचा त्याच्या मित्रांनीं भरपूर फायदा करून घ्यायचं ठरविलं. राष्ट्राराष्ट्रांचे अेकमेकांशीं वागतांना कांहीं विशिष्ट नियम ठरलेले आहेत व तीं बंधनें प्रत्येक राष्ट्रानें पाळावयाचीं असतात. यांनाच आंतरराष्ट्रीय कायदा म्हणतात. याच कायद्यांतील अेक कलम असें कीं, परकीय राष्ट्राचा कैदी पळाला व दुसऱ्या राष्ट्राच्या हद्दींत प्रवेशिला तर त्या कैद्यावरील मूळ राष्ट्राचा अधिकार नाहींसा होतो व त्यावर नवीन सरकारचा अधिकार चालू होतो.

'या कलमाला धरून ब्रिटिशांनीं ताब्यांत घेतलेला कैदी परत फ्रेंचांच्या ताब्यांत द्यावा. नाहींतर तो आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग ठरेल' असें वर्तमानपत्रांतून सर्व दिशांकडून हल्ले सुरू झाले. प्रथम फ्रेंच व ब्रिटिश सरकार त्याची दखलच घेअीनात. पण पुढें या लिखाणांत अितकी तीव्रता निर्माण झाली कीं, ब्रिटिश सरकारला हेगच्या न्यायालयांत आरोपीच्या पिंजऱ्यांत अुभें रहावें लागले. अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संघर्षाच्या कटकटी कांहीं अितर राष्ट्रांच्या प्रतिनिधीस न्यायाधीश नेमून सोडवावयाच्या असतात. नुकताच अिराणमधील तेलाचा प्रश्न 'ब्रिटिशांनीं' 'हेगच्या' आंतरराष्ट्रीय न्यायालयापुढें नेला होता. पण जोंवर राष्ट्राराष्ट्रांत समबलत्व नाहीं किंवा जोंवर बल-

वान राष्ट्राच्या पंजाखालील राष्ट्रांच्या प्रतिनिधींची न्यायाधीश म्हणून नेमणूक होत आहे तोंवर तरी 'हेग' च्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडून न्याय्य न्याय मिळणं शक्य नाहीं. येथेंही असेंच झालें. हेग न्यायालयानं ब्रिटिशांना अनुकूल असाच निकाल दिला.

**भारतांत खटला चालूं झाला—**

तिकडे युरोपांत आंतरराष्ट्रीय खळबळ माजून राहिली होती. जिकडे तिकडे हिंदुस्थान व सावरकर हेंच प्रकरण गाजलें होतें. कोणी प्रौढी मिरवितात कीं, भारताला आंतरराष्ट्रीय महत्त्व आजच केवळ प्राप्त झालें आहे. पण ही समजूत मुळांतच भ्रामक आहे. आज हिंदुस्थान स्वतंत्र आहे. भारताची लोकसंख्या अफाट आहे. तेव्हां पाश्चिमात्य व जगांतील अितर राष्ट्रांना हिंदुस्थानकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. आजची जागतिक परिस्थितीच अशी आहे कीं, त्यामुळें लहान लहान राष्ट्रांनाही आंतरराष्ट्रीय महत्व प्राप्त होत आहे. तेवढ्यासाठीं कोणी शेखी मिरवूं नये कीं, 'माझ्यामुळं या राष्ट्राला महत्पद प्राप्त झालें व जागतिक महत्त्व आलें! आज अिराणही साऱ्या जगाच्या तोंडीं आहे. अिजिप्त आहे. चीन आहे. मलाया देखील जागतिक महत्त्व प्राप्त झालेला देश आहे. गेल्या महायुद्धांत नेस्तनाबूद झालेलीं जपान, जर्मन ही राष्ट्रेंही पुनरपि नव्या जगाच्या रजतपटावर चमकूं पहात आहेत. पण भारताला याही पूर्वीं 'सावरकरांनीं आंतरराष्ट्रीय महत्त्व आणून दिलं होतं.' त्यावेळीं आपला देश स्वतंत्र नव्हता. देशांत सार्वत्रिक अुठावणी झाली नव्हती. आजच्यासारखें ब्रिटिनचें आसन डळमळीत झालें नव्हतें. जगांत पहिल्या प्रतीचें व सामर्थ्यसंपन्न असें तें राष्ट त्यावेळीं होतें.

आणि त्यावेळींच विनायकानें लंडनमध्यें राहून, ब्रिटिश सरकारवर मात करून, पेंचावर प्रतिपेंच टाकून व मार्सेलिस बंदरांत 'खवळलेल्या सागरामध्यें—बोटीवरील अधिकाऱ्यांकडून गोळ्यांचा वर्षाव होत असूनही—अुडी घेअून (आणि तेंही मोठ्या कडक बंदोबस्तांत असतां व कैदी असतां,) भारताचा डंका त्रिखंड दुमदुमत ठेवला होता.

अशा प्रकारें हेग प्रकरण चालू असतांच त्या न्यायालयाच्या निर्णयाची वाटही न पाहतां हिंदुस्थान सरकारनें विनायकावर खटला भरला व चालूंही झाला. अर्थात हरदयाळनीं म्हटल्याप्रमाणें येथील न्यायालयीन चौकशी म्हणजे शुद्ध पोरखेळच ठरली. न्यायालयीन सर्व दिखाअू सोपस्कार झाले. विनायकानें या खटल्यांत स्वत:ची बाजू मांडण्याचं नाकारलं. त्याची मदार फ्रेंचांवर होती. आपलें रक्षण फ्रान्स करील. कारण त्या राष्ट्राच्या अितिहासांत **स्वातंत्र्य, समता व बंधुता** या तत्त्वत्रयींची परंपरा प्रस्थापित झाली होती.

न्यायालयानें निकाल देतांना सांगितलें, 'अिंग्लंडांत जाण्यापूर्वींचें आरोपीचें चरित्र व आरोपीनें अिंग्लंडांत असतांना केलेली कृत्यें हीं पाहतां आरोपीनें पाठविलेलीं पिस्तुलें, सरकारी अधिकाऱ्यांचे खून करण्यासाठींच पाठविलीं होतीं व आरोपीनें धाडलेल्या पत्रकांतून असे खून करण्याचा अुपदेश करण्यांत आला होता हें सिद्ध होतें. यासाठीं आम्हीं आरोपीस जन्मठेपेची शिक्षा सांगतों. त्याचप्रमाणें दुसऱ्या खटल्यांतील पुरावा पाहतां, आरोपीनें जॅक्सनच्या खुनाला मदत केली आहे, असें सिद्ध होतें. याही आरोपासाठीं आरोपीस दुसऱ्या जन्म-

ठेपेची शिक्षा आम्हीं सांगत आहोंत. या दोनही शिक्षा अेकाचवेळीं भोगावयाच्या आहेत व आरोपीची सर्व मालमत्ता जप्त व्हावयाची आहे.'

झालें ! भारतांतील खटल्याचा निकाल लागला व विनायक दोन जन्मठेपी झालेला भयंकर कैदी बनला. अशा भयंकर कैद्यासाठीं फ्रान्सनें आपला हेका चालवूं नये असा हेग न्यायालयानें निकाल दिला व फ्रान्सच्या दुर्बळ अिभ्रतीचा काडीइतकाही अुपयोग न होता विनायकाला अंदमानला काळ्या पाण्याची शिक्षा भोगण्याला पाठविण्याचें सरकारनें मुक्रर केलें.

---

# — अंदमानांत —

'शौर्याची शर्थ करून विश्वासरावानें अल्पवयांतच समरांगणीं आपला चिमुकला देह ठेवला. त्याच समरांगणाच्या घुमश्चक्रींत त्याचा पितृबंधू सदाशिवरावभाऊ अल्पवयांतच त्या भाऊ-गर्दींत नाहींसा झाला. श्री ज्ञानेश्वरानीं आपलं अिप्सित कार्य अल्पवयांतच संपवून आपली अवतारसमाप्ती केली; आणि विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं देखील आपल्या तेजस्वी बुद्धीची अुज्ज्वल ध्वजा फडकावून अिहलोकींची यात्रा अल्पवयांतच संपविली. थोरल्या माधवरावांनीं पराक्रमांची दीर्घ मालिका गुंफून आपला देह ठेवला, तोही अल्पवयांतच. त्याच अल्पवयांत हा स्वातंत्र्यवीर आपलें अफाट कर्तृत्व नि अजोड शूरत्व जगाला दर्शवून, त्या कर्तृत्वानें नि शूरत्वानें जगाचे डोळे दिपवून, अेखाद्या कर्मयोग्याप्रमाणें अंदमानच्या काळ्या पाण्यावर, श्रीरामाप्रमाणें केवळ चौदाच वर्षे नव्हे तर आयुष्याचीं पन्नास

वर्षे वनवास भोगण्यासाठीं स्वकर्तव्य पालनाच्या विशाल आनंदांत निघून गेला.

— भा. द. खेर

न्यायालयानें विनायकाला दोन जन्मठेपेची व असेल नसेल त्या मालमत्तेच्या जप्तीची शिक्षा दिली. न्यायालयीन निकालानन्तर तुरुंगांत असतां अेके दिवशीं त्याची प्रियपत्नी त्यास भेटावयास आली.

आपले पति आतां अंदमानावर जाणार. ५० वर्षे तेथें शिक्षा भोगणार. तेथील यमयातनांतून ते परत येतील कां, या विचारांनीं तिचे डोळे पाण्यानें भरून गेले. बिचारीचा सारा संसारच अैन तारुण्यांत अुजाड बनला. पतीशीं चार शब्द प्रेमळपणें बोलण्याचें सुखसुद्धां आतां आपल्याला लाभणार नाहीं. स्त्रियांचा धर्म जो पतिसेवा त्याला तर तिला आतां जवळ जवळ कायमचेंच मुकावें लागणार. त्यावेळीं तिच्या हृदयांत कोण कालवाकालव झाली असेल? पण ती एका शूर देशभक्ताची वीर पत्नी होती. तिनें आपलें अन्तःकरण दगडासारखें घट्ट केलें व येअील त्या प्रसंगास तोंड देण्यास योगिनीप्रमाणें सिद्ध झाली.

या बिकट प्रसंगीं त्या वीरपत्नीचं साजेलशा शब्दांतच विनायकनं सांत्वन केल. तो म्हणाला,

'तुम्हीं वीरपत्नी आहांत. सुशील, सुविद्य तशाच सुविचारी आहांत. विचार करा. चार भिंतीआडच्या जगांत राहून चारदोन मुलांबाळांतच मनुष्याच्या आयुष्याची अितिश्री आहे काय? असा संसार कावळे चिमण्याही करतात. समंजसपणा धरा व भोंवतालचा विचार

करा. कदाचित आपलीताटातूट झाल्यानेंच अितर हजारों घरांतून प्रेमाचें संगीत निर्माण होअूं लागेल. सोन्याचा धूर निघूं लागेल.'

या समयोचित व वीरोचित सांत्वनानें तिला पुढील भकास काळ कंठण्यास थोडा तरी धीर मिळाला.

**अंदमानकडे रवाना—**

हिंदुस्थानांतील विनायकाचा कारावास संपला. १–७–११ रोजीं मद्रास बंदरांत 'महाराजा' बोटीवर त्याला चढविलें. महाराजा बोट चालू झाली. कंसानें देवकीच्या मांडिवरील तान्हुल्यास जितक्या कठोरतेनें हिसकून घेतलें तितक्याच कठोरतेनें, अगर त्याहीपेक्षां अक्रूरानें कृष्णास यशोदामातेपासून कर्तव्यबुद्धीनें दूर नेलें. तद्वत 'महाराजा' बोटीनें अनिच्छेनें भारताच्या या लेंकराला दूर नेलें व अेका भयानक व रुक्ष प्रदेशांत आणून सोडलें, ही अुपमाच अधिक सार्थ होईल.

४·७-११ रोजीं 'महाराजा' बोट अंदमानला लागली व त्याच दिवसापासून त्याचें अंदमानांतील 'भयंकर कैद्या'चें जीवनास सुरुवात झाली.

**अंदमानची स्थिति—**

विनायकानें आपलें बालपण 'भगूरा'स संपविलें. विद्यार्थीदशा नाशीक व पुण्यास संपविली. क्रांतिकारक आयुष्य लंडनमध्यें घालविलें. आणि आतां पुढील पन्नास वर्षें त्याला अंदमानांत काढावयाचीं होतीं. अंदमानांत जातेवेळीं त्याचें वय अवघें २७ होतें. म्हणजे त्यानें तारुण्यांत पदार्पण करून अवघीं ३ वर्षें झालीं होतीं. आतां पूर्वीप्रमाणें त्याची शैशवावस्था, बाल्यावस्था राहिली नव्हती. म्हणून येथून पुढें

त्यास ‘विनायक’ या अेकेरी नांवानें संबोधणें चूक होईल. यावेळीं जगांत तो ‘विनायक’ या नांवानें ओळखला जात नव्हता. तर ‘सावरकर’ हें त्याचें नांव जगभर निनादून राहिलें होतें. म्हणून आपणही त्याच नांवानें त्यास संबोधणें अधिक चांगलें नाहीं का?

सावरकर अंदमानांत येण्यापूर्वीं अंदमानाची स्थिति बरीच असंतोषाची झाली होती. सुरुवाती सुरुवातीच्या कैद्यांना मिळत असलेल्या सवलती रद्दबातल झाल्या होत्या. पठाण कैद्यांना ते गुन्हेगार असूनही केवळ आडदांड पठाण म्हणून अितर कैद्यांवर देखरेख ठेवण्याचे अधिकार प्राप्त झाले होते. ते हे पठाण व अितर अधिकारी या बंदिवानांवर अनन्वित जुलूम करूं लागले. अमानुष कामें करावयास लावून बंदिवानांचें रक्त शोषणाचें काम राजरोसपणें या बड्या जळवांकडून चालू होतें. यामुळें बंदिवान व अधिकारी यांच्यांत वारंवार खटके अुडत. पण अधिकाऱ्यांच्या हातांत सत्ता असल्यानें कैद्यांच्या धुसफुशीचा फारसा उपयोग होत नसे. उलट अशा असंतुष्टतेमुळें वरिष्ठांची अितराजी मात्र होत असे.

सावरकर अंदमानांत आले नि ही जबरदस्ती बंद होत आली कारण त्यांचा घालमेली व अुठाठेवी स्वभाव येथेंही स्वस्थ बसूं देत नव्हता. येथेंहीं त्यांनीं कैद्यांत अेकमेकांविषयीं आपुलकी, स्वत्व स्वाभिमान व प्रेम निर्माण केलें. त्यांच्यांत संघटना करून प्रचंड बळ संपादिलें व अधिकाऱ्यांस नमविलें. संप, अन्नत्याग यासारखीं तेजस्वी हत्यारें अुपसून जुलमी अधिकाऱ्यांना ‘सळो की पळो’ करून सोडलें,



**बाबाराव सावरकर**

आणि हे बाबाराव सावरकर ! स्वा. सावरकरांचे थोरले बंधू ! स्वतःच्या जीवनाचा 'स्वातंत्र्य' लढ्यांत पूर्णपणें होम करून देशास 'वीर विनायका'चें फळ प्राप्त करून दिलें. आज सजविलेलें स्वातंत्र्याचें मन्दिर आपण मनसोक्त पहात आहोत. स्वा. सावरकरांसारखे अनेक संगमरवरी पत्थर या स्वातंत्र्य मन्दिराच्या भिंतींत आपण पहात आहोंत; पण या स्वातंत्र्य मन्दिराचा पाया बाबाराव सावरकरांसारख्या प्रसिद्धीविन्मुख पण कर्तव्यतत्पर पत्थरांवर अुभारला आहे. त्यांना आपण प्रथम वन्दन करूया !

अंदमानांतील कैद्यांना धर्मचिन्हें अंगावर वापरूं देण्यास मनाअी असे. अेका पंजाबी ब्राह्मण तरुणानें स्वतः बलिदान केलें व त्यामुळें धर्म-चिन्हांवरील बंदी अुठवावी लागली. तुरुंगांत खितपत पडलेल्या कैद्यांना खावयास वऱ्यापैकीं सुद्धां अन्न मिळत नसे. तें सुधारावें म्हणून अनेक बंदिवानांनीं अुपवास करावयास आरंभ केला. नानी गोपाळ हा तर कोवळा तरूण; पण त्यानें ७२ दिवस अुपवास केला. त्यांतही कैद्यांनीं यश मिळविलें व अन्नांत सुधारणा झाली.

**शिक्षांचें स्वरूप—**

सावरकर अंदमानांत आल्यानंतर त्यांनाही अितर कैद्यांप्रमाणें शारीरिक कष्टाचीं कामें अंगमेहनतीनें करावीं लागलीं. तीं नारळांचीं चासलात लावणें, त्यांच्या शेंड्या व केशर सोडविणें, तें केशर व शेंड्या कुटून काथ्याच्या दोऱ्या वळणें, आंतील खोबऱ्याचीं भकलं घाण्यांत घालणें, घाणा ओढून त्यांतून तेल गाळणें आणि चुकून कुठें गुप्त पत्र अगर कोरा कागद सांपडला तरीही त्यास टांगलेल्या हलकडींत अडकवून लोंबकळवणें व सर्व शरीर रक्तलांछित करणें, हीं सारीं कामें सावरकरांनीं केलीं व या साऱ्या शिक्षा त्यांनीं निमूटपणें सोसल्या.

मात्र यांतूनही कांहीं कैदी नंदगोपालासारखे निघत. कामांत व्यवस्थित टाळाटाळ करीत व योग्य तीं अुत्तरें देअून अधिकाऱ्यांवर मात करीत. त्यांना चूप बसवीत. कांहीं कैदी अुघड अुघड अधिकाऱ्यांचा पाणअुतारा करीत.

कांहींना अंदमानांतील हाल अितके जाणवत कीं, त्यांना जगणें-

सुद्धां असह्य होओी. अिंदुभूषणसारखे कैदी तर आत्महत्या करीत. अुल्हासकरासारख्या कैद्यांना वेड लागे, बाबाराव सावरकरांसारख्या कैद्यांना क्षयाचा त्रास होओी.

अशा प्रकारच्या रानटी शिक्षांचा सावरकरांच्या शरिरावर फार अनिष्ट परिणाम झाला. दिवसेंदिवस त्यांची प्रकृति क्षीण होअूं लागली. अितर अनेक व्याधींचा किरकोळ त्रास होअूं लागला. क्षयाचीं पूर्व-चिन्हें दिसूं लागलीं. वजन घटत घटत ९२ पौंडांवर येअून ठेपलें. दरम्यानच्या काळांत सावरकरांच्या मनांत अनेक वार आत्महत्येचे विचार चमकून गेले. पण विचारावर विवेकानें मात केली व तसें कांहीं अभद्र घडून आलें नाहीं.

अशा स्थितींत दिवस कंठीत असतांही त्यांच्या नेहमींच्या गोष्टी चालूच होत्या. अंदमानांत नवीन येणाऱ्या कैद्यांकडून भारताविषयीं नवीन गोष्टींचें ज्ञान घेणं चालूच होतं. बेडयांच्या खुळखुळऱ्या आवाजावर सांकेतिक लिपी बसविलेली होती. गळ्यांतील डी तिकिटांचा संदेशवाहक बिल्ल्याप्रमाणें अुपयोग केला होता. लिहिण्यास कारागृहाच्या नियमाप्रमाणें कागद मिळत नसे, तर तुरुंगाच्या भिंतींच्या विटांवर कोरून ठेवीत. स्वतः मुखोद्गत करीत. लवकरच शिक्षा संपून बाहेर पडणार असणाऱ्या बंदिवानांकडून पाठ करवून घेत. किंवा अनेक हिकमतीनें कागद मिळवून त्यावर आपलें काव्य अुतरवीत आणि मग त्याचा भारतांत प्रसार होओी. ज्या काव्यानं सावरकरांना अभिजात कवि अशी मान्यता मिळवून दिली तें 'कमला' हें काव्य याच अंधार कोठडींत जन्माला आलें.

**हिंदुत्वाचा पाया—**

यक्षपत्नी व यक्ष आपापले विरह दिवस जसे मोठ्या कष्टानं मोजीत घालवीत, तद्वत सावरकर आपल्या भारतमातेच्या वियोगाचे अंदमानांतील दिवस घालवीत होते. या वास्तव्यांत त्यांना दिसून आलं कीं, आपला हिंदू समाज विस्कळीत आहे. आपल्याच बांधवां-विषयीं तो अुदासीन आहे. खुद्द अंदमानांतच पठाणांनीं पद्धतशीर मुस्लिमीकरण चालविलें होतें. अशा धर्मांतरित कैद्यांशीं हिंदू कैदी फटकून वागत. यामुळें अंदमानांतील हिंदू कैद्यांची संख्या दिवसेंदिवस घटूं लागली तर मुसलमानी कैद्यांची वाढूं लागली. हिंदूधर्मावरील हा घाला सावरकरांनीं जाणला व त्यांत जातीनें लक्ष घालून व प्रसंगीं अितर हिंदू कैद्यांचा रोष पत्करूनही हें पठाणीकरण हाणून पाडलें. येथूनच त्यांचें लक्ष हिंदुत्वाकडे, निद्रिस्त हिंदुत्वाकडे गेलें. रत्नागिरीस सभोंवार पाहिलें कीं, हिंदूंवर आजपर्यंत अनेक हल्ले झाले आहेत. अद्यापिहि हिंदूंवर अत्याचार होत आहेत व पुढेंही जलम नि अना-चार चालूच रहाणार. या सर्व घडामोडींचा त्यांनीं अभ्यास केला व त्यांची खात्री पटली कीं, मुसलमान हिंदुत्वावर घाला घालून स्वतःचें राष्ट्र हिंदुस्थानांत स्थापूं पहात आहेत. शून्यांतून ते पाकिस्तान निर्मूं पहात आहेत. त्यास शह द्यायचा असेल तर हिंदूंनीं संघटित झालं पाहिजे, हिंदू म्हणूनच जगलं पाहिजे व हिंदू म्हणूनच मेलं पाहिजे.

**लष्करीकरणाची मुहूर्तमेढ—**

सावरकरांच्या आयुष्यांत 'हिंदुत्वाचा' पाया अंदमानच्या लहानशा कोठडींत घातला गेला व त्यांनीं अहिंदूशीं हिंदूंनीं वागतांना पुढील

प्रमाणें वागावें असा अिषारा दिला. तो कांहीं काल परवाचा झालेला यांचा कायापालट नव्हे. त्यांनीं बजावलें, ' अहिंदू येतील तर त्यांचे-सह, न येतील तर त्यांचेवांचून, व विरोध करतील तर त्या विरोधास अुच्छेदून हिंदू आपलं न्याय्य स्वातंत्र्य मिळवतीलच मिळवतील. '

जशी सावरकरांची ' हिंदुत्वाची ' भूमिका पूर्वीचीच आहे. त्याच प्रमाणें ' लष्करी ' करणाची भूमिकाही त्यांनीं पूर्वीच स्वीकारली आहे. तीही कांही गेल्या महायुद्धात सोयीप्रमाणें स्वीकारलेली व हिंदुस्थाना-वरील साहेबाची पकड घट्ट व्हावी म्हणून केलेली ' रिक्रूटभरती 'ची आरोळी नव्हे. कारण अंदमानातच सावरकरांच्या ' सैनिकीकरणा 'ची मुहूर्तमेढ रोवली गेली. १४ सालचं युद्ध जर्मनीगट विरुद्ध अिंग्लडगट असें चालू होत जर्मन जहाज अंदमानाभोंवतीं घिरट्या घालत होतं. सावरकर प्रभृति राजबंदींना त्यांना पळवून न्यायचं होतं. लाला हर-दयाळ अेकवेळ सावरकरांचे विश्वासु सहकारी होते. त्यानीं अमेरिकेंत ' गदग ' पार्टी स्थापन केली होती. जर्मनीनें आपल्या पार्टीस शस्त्रांची व अर्थाची मदत करावी अशी त्यांची खटपट चालू होती. आणि त्यास यशही आलें. पण ब्रिटिशांचें सुदैव व भारताचें दुर्दैव म्हणून ' गदग ' पार्टीस यश आलें नाहीं. व शेवटीं जर्मनीही पराभवाच्या खोल दरींत कोसळला.

युद्धांत जर्मनीचा पराभव होणार हें दूरदर्शीपणानें जाणूनच अिकडे भारतांत लो. टिळकांनीं ' सैनिकीकरणा 'चा धडाडीनें पुरस्कार चाल-विला होता. लोकमान्य यावेळीं कांहीं सरकारचे कैदी नव्हते. अगर यांना स्वतःची सुटका करून घ्यावयाची नव्हती. अथवा स्वतःचा

स्वार्थही त्यांना साधावयाचा नव्हता किंवा ब्रिटिशांची पकडही हिंदुस्थानभोंवतीं घट्ट करावयाची नव्हती. मग त्यांनीं सैनिकीकरणाचें अगर विरोधी पक्ष सावरकरांच्या सैनिकीकरण धोरणाची टरेबाजी उडवीत असतां वापरणाऱ्या उपहासगर्भ रिक्रूटभरतीचें धोरण कां स्वीकारलें? उलट त्यांना देश स्वतंत्र करावयाचा होता व ते हें निश्चित जाणून होते कीं 'आल्या संधीचा आपण अवश्य फायदा घेतला पाहिजे. १८५७ नंतर भारताला निःशस्त्र करून ब्रिटिशांनीं गोगलगाय बनविलें आहे. साध्या चाकूनंही भारतीय तरुण अर्धमेला होत आहे. अन् हें युद्ध आलें नसतें तर अद्यापही त्याची तीच स्थिति झाली असती. दैवानें खैर केली नी म्हणूनच युद्धांत भारती-यांना प्रत्यक्ष प्रवेश मिळाला. त्यांनीं आतां शिकस्त केली पाहिजे. सर्व सैनिकी क्षेत्रें व्यापलीं पाहिजेत नि लढाऊ बनलं पाहिजे; तरच आपल्या राष्ट्राचा स्वातंत्र्य लढ्यांत व त्या नंतर स्वातंत्र्य मंदिरास चिरस्थायी स्वरुप देण्यास निभाव लागेल. एरवी नाहीं.

सैनिकीकरणाचा अंदमानांतून प्रचार करतांना सावरकरांचीही हीच विचारप्रणाली होती. अगदीं अलिकडच्या काळांतही हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदावरून त्यांनीं हेंच मत प्रतिपादन केलें व आजही ते याच मताचा पाठपुरावा करीत आहेत. त्यांचें निश्चित मत हें आहे कीं, **कोणत्याही राष्ट्राचें स्वातंत्र्य व अभ्रत हीं त्या राष्ट्रांत सज्ज असलेल्या सैनिकी सामर्थ्यावर अवलंबून आहेत.**

**साक्षरता प्रसार—**

हिंदुत्व आणि सैनिकीकरण यांबरोबरच सावरकरांनीं आणखीहि

कांहीं राष्ट्राच्या हिताचीं कामं केलीं. त्यांपैकींच साक्षरताप्रसार हेंही अेक होय.

अंदमानांत येणारे सर्वच कैदी कांहीं शिकलेले नसत. त्यामुळें त्यांना सुशिक्षितांत अुत्पन्न झालेलें देशप्रेम, स्वातंत्र्य, नीति व अनीति यांची कांहींच कल्पना नसे. भयंकर स्वरूपाचे खाजगी हेऱ्यादाऱ्याचे गुन्हे करून कांहीं कैदी अंदमानांत येत. सावरकरांनीं या सर्वांना हाताशीं धरलें. त्यांना लिहायवाचायला शिकविलें. पूर्वीं जो कैद्यांचा कर्दनकाळ म्हणून गाजलेला तुरुंगाधिकारी बारी होता तो अतिशय जुलमी होता. तो यावेळीं बदलला होता व त्याचाच कोणी नातलग तुरुंगाधिकारी झाला होता. या अधिकाऱ्यानें त्यांच्या पुढील कार्यांत कांहींच अडथळा आणला नाहीं. आणि यावेळीं कैद्यांतही मोठी अेकजूट झाली होती. त्याची थोडीशी चुणूक अधिकारी वर्गाला दिसून आली होती. २० सालीं जेव्हां लोकमान्य टिळक वारले तेव्हां तुरुंगांतील सर्व कैद्यांनीं अुपवास केला व सुतकदीन पाळला. या त्यांच्या संघटनसामर्थ्यामुळें अधिकारीवर्ग बिचकूं लागला होता.

**बढती व सुटका—**

अधिकारीवर्ग कैद्यांना भिअूं लागला. येथपर्यंत सावरकरांनीं मजल ठोकली. आतांपर्यंत अंदमानांतील अधिकारीवर्ग फर्मावील त्या शिक्षा भोगाव्यात, जुलमी शिक्षा व वाअीट अन्न यांविरुद्ध कैद्यांत चेतना अुत्पन्न करावी, संप,अन्न सत्याग्रह घडवून अधिकारीवर्गावर दडपण आणावं व कैदीवर्गांत आत्मविश्वास निर्माण करावा, धर्मांतरितांची शुद्धि करावी व अशिक्षितांना सुशिक्षित करून सोडावें अशा प्रकारचीं

अनेक कार्यें त्यांनीं केलीं होतीं व शिक्षेंतील अनेक दिवस संपविलेही होते. तुरुंगाच्या नियमाप्रमाणें कैद्यांस ज्या सवलती असत त्या मिळण्यासाठीं सावरकरांनीं हिंदुस्थान सरकारकडे अनेक अर्ज केले होते पण कशाचीच दाद लागली नव्हती. शेवटी त्यांस तेल गुदामावरील अधिकारी केलें व अशा रितीनें त्यांस बढती मिळाली.

**अंदमानांतून परत भारताकडे —**

गुंतागुंत झालेल्या दोऱ्याची अेक गांठ अुकलावी म्हणजे दुसऱ्या गांठी सहजासहजीं अुकलूं लागतात; त्याप्रमाणें सावरकरांना बढतीचें सख मिळालें व त्यानंतर अंदमानांतून बाहेर पडण्याचें सुखही लवकरच प्राप्त झालें.

भारतांतील भारतवासियांनी केलेल्या खटपटीस यश आलें व १९२१ सालीं सावरकरांना अंदमानांतून हलविण्यांत आले. अंदमानची ती कोठडी सोडतेवेळीं त्यांना मनस्वी भडभडून आलें. सहजच आहे. कृष्णाची जन्मभूमी जरी मथुरा असली तरी त्याचं सारं बाळपण यशोदेच्या कुशींत, नंदाच्या घरीं व गोपालांच्या संगतींत गेलं. अक्रूराबरोबर त्यांना सोडून जात असतां सारं गोकूळ दुःखी झाल्यास नवल नाहीं. तसेंच कृष्णाचे डोळेही पाणावल्यास आश्चर्य कसलें? जवळ जवळ ११ वर्षे त्या भूमीनं आपल्या मांडीवर त्यांना खेळविलं कुरवाळिलं, संभाळिलं. अनेक झगड्यांशीं झगडे देअून स्वतःला बढती प्राप्त करून घेतली. अभिजात कवि म्हणून ज्या काव्यानें त्यांचें नांव मराठी वाङ्मयांत अजरामर करून ठेवलें तें 'कमला' काव्य व अितरही अनेक ग्रंथ येथीलच चार भिंतीच्या आंतील

खुराड्यांत जन्म पावले ती भूमी सोडणं – आणि तेंही मातेसमान असलेल्या येसूवहिनींच्या दुःखद निधनानंतर – साहजीकच सावर-करांच्या जिवावर आलें. त्यावेळीं त्यांच्या मनःचक्षूंपुढें येसू वहिनींची करुण पण तेजस्वी मूर्ती तरळूं लागली.

लहान वयांत येसूवहिनींचे पति गणेशपंत अर्फ बाबा अंदमानांत गेलेले! प्राणापलिकडे जतन केलेले विनायक भावोजीही अंदमानांतच बाबांना सोबत करण्यास गेलेले! घरीं केवळ धाकटा दीर व विनायक भावोजींची साध्वी पत्नी यमुना यांच्या सान्निध्यांत पतिराजाचें आणि भावोजींचें स्मरण चाललेलें! कुडींतील सारे प्राण एकवटून आणून डोळ्यांत सांठविलेलें आणि ती नजर–ती दिव्य नजर हजारों मैल दूर असलेल्या व कोठडीच्या आंत कोंडलेल्या व साखळदंडांनीं जखडलेल्या, हलकड्यांत अडकविलेल्या नी तेलाचा घाणा ओढीत असलेल्या, छिलका कुटत असलेल्या नि काथ्याच्या दोऱ्या वळत असलेल्या त्या बंधुद्वयांकडे लागलेली! तिकडे सावरकर बंधूंच्या हातांतून रक्ताचे थेंब झिरपत असत तर इकडे यांचे डोळ्यांतून अश्रूंच्या धारा ओघळत!

अशाही स्थितींत आपणांस दर्शन घडावं म्हणून येसू वहिनींनीं आपले प्राण कुडींत जतन करून ठेविले. धाकट्या दिरानें त्यांची अंदमानांत भेट घेतां यावी म्हणून सरकारदरबारीं शिकस्त केली; पण फत्तराहूनही कठीण हृदय असलेल्या सरकारनें त्यांना परवानगी दिली नाहीं तेव्हां शेवटीं केवळ भेटीच्या आशेनें आसुसलेला, तगलेला तो जीव 'पतिराजां'चा हंबरडा फोडीत व 'भावोजीं'चा टाहो फोडीत निघून गेला होता.

ती वहिनीची वत्सल मूर्ति पुन्हां आपणास दिसणार नाहीं हें विचार मनांत येऊन त्यांचं हृदय सुन्न झालं होतं. नकोच तें भारतांत जाणं असेंही क्षणभर त्यांना वाटलं. पण खुद्द सरकारनेंच त्यांना व त्यांच्या बंधूंना—गणेशपंतांना—बाबांना अंदमानातून हालवायचं ठरविलं होतं. सरकारच्या अिच्छेपुढं कोण काय बोलणार ? अखेरीस त्यांचें अंदमान सुटलें, कायमचें सुटलें.

अंदमान सोडते वेळीं अंदमानांतील सावरकरांच्या बंदिवान सहकाऱ्यांनीं, मित्रांनीं अश्रुपूर्ण नेत्रांनीं त्यांचा निरोप घेतला व सरकारी हुकूम धाब्यावर बसवूनही अेका बंदिवान जमादारानें त्यांच्या गळ्यांत चांफ्याची पुष्पमाला घातली.

आणि मग सावरकर 'महाराजा' बोटीनें भारतास परत आले. अक्रूरानं कृष्णास नेतांना सुरक्षित परत आणून देण्याचं गोकुळ वासियांना व नंदाच्या यशोदेला अभिवचन दिलें होतें. 'महाराजा' बोटीनंही भारताचा हा कान्हा भारतास परत आणून दिला.

सावरकर अंदमानांतून परत आले तरी त्यांचा कारावास सुटला नव्हता. पण हाही काल गेला. येथीलही तीन वर्षांची कारावासाची मुदत संपली. त्यांचे शारिरीक हाल संपले. त्यांच्या अुलाढाली संपल्या. त्यांचा हिंदुत्वाचा अवतार पुढें चालू झाला नि १९२४ सालीं सावरकरांची सशर्त मुक्तता झाली.

दोन जन्मठेपी झालेला हा कैदी सुटेल व परत आपल्याला पहावयास मिळेल असें कुणाच्या स्वप्नांतही आलें नसेल—

पण कालाच्या अुदरांत काय दडलंय तें कुणाला समजायचं ?

कांहीं अटींवर कां होओीना, पण त्यांची सुटका झाली व ते आपल्या निवासस्थानीं रवाना झाले. आपण त्यांचें शुभ चिंतन चिंतूंया व त्यांना आपणांत परत आणून सोडणाऱ्या कालाचीही स्तुती गाअूं या.

' कालाय तस्मै नमः '

## — अध्यक्षपदावरून —

राष्ट्रस्वतंत्रता ध्येयं यथा साध्यंच साधनम्
अभ्युत्थानाय हिंदुनामयं पक्षः प्रवर्तितः ॥

जोंपर्यंत मुसल्मानपक्ष काँग्रेसला आपणाकडे वेगानें खेंचून घेत आहे, तोंपर्यंत हिंदुसभेच्याद्वारें काँग्रेसच्या या गतीला विरोध करण्यासाठीं आपण या पक्षांत मिळालों असून राष्ट्रोद्धाराच्या खऱ्या झगड्यांतून काँग्रेसच्या बरोबर खांद्यास खांदा लावून लढूं. अणुमात्राही मागें सरणार नाहीं.

—वीर सावरकर

स्वा. सावरकरांनीं हिंदुसभेच्या अध्यक्षपदाचें स्वरूपच बदलून टाकलें. अध्यक्षपदानें ते मोठे झाले नाहींत; तर उलट त्यांच्या योगें अध्यक्षपद मोठें झालें, आणि तसें प्रभावी संग्राहक नि जागरूक नेतृत्व दुसऱ्या कोणाचें नसल्यामुळें

त्यांनाच हिंदुराष्ट्रानें कानपूरला अेक मतानें सहाव्यांदा अध्यक्ष-स्थानीं निवडले.

ग. वि. केतकर ( सह्याद्री, जून ४३ )

सावरकरांची तुरुंगांतून कायमची मुक्तता झाली, पण त्यांजवर कांहीं अटी लादल्या. ' राजकारणापासून दूर रहावयाचें व केवळ रत्नागिरी जिल्ह्यांतच हिंडावयाचें ' याच त्या अटी होत.

या नजरकैदेच्या मुदतींतही सावरकर स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं आपलं तन, मन, धन सामाजिक कार्यासाठीं वेंचलं. आपलं सर्वस्व ' हिंदुत्वा'च्या चरणीं वाहिलं. हिंदुत्वाला कीड लावणारीं जातीयतेचीं, धार्मिक भोळेपणाचीं, बुवाबाजीचीं व अनिष्ट रूढींचीं बांडगुळं त्यानीं जाळून टाकण्याची कोशीस केली. झुणकाभार सहभोजन, औद्योगिक कार्य, मंदिर प्रवेश, जलप्रवेश, भाषाशुद्धि, लिपिशुद्धि आदि कार्यें त्यांनीं नेटानें केलीं. अेका धनिकाचे सहाय्यानें त्यांनीं रत्नागिरीस सर्वांस खुलें असें ' पतित पावन ' मंदिर बांधलें.

याचवेळीं सावरकर रत्नागिरी हिंदूसभेच्या कार्यकारी मंडळाचें सदस्य होते. महासभा अजून राजकारणांत अुतरली नव्हती. सावरकर बंधु त्रिवर्गांनीं मोठ्या धाडसानं हिंदूसमाज सुधारण्याचं व जागृत करण्याचं काम सुरू केलं. ' श्रद्धानंद ' मधून नियमियपणें ते हिंदूसंस्कृतीचा पुरस्कार व प्रचार करीत.

**पूर्ण मुक्तता—**

आणि काय चमत्कार ! हीही स्थानबद्धता संपून गेली. १९३७ साल आलें. कूपर मंत्रिमंडळ आस्तित्वांत आलें. त्यांतील अेक मंत्री

श्री जम्नादास मेथा' यांनीं विशेष खटपट करून गव्हर्नर लॉर्ड ब्रॅबोर्नेना सावरकरांची बिनशर्त सुटका करणेस भाग पाडलं आणि २७ वर्षांच्या प्रदीर्घ काळानन्तर सावरकर पूर्णपणे स्वतंत्र झाले.

सावरकरांची संपूर्ण मुक्तता होतांच त्यांनीं मुंबईस वास्तव्य करण्याचं टरविलं नि ते मुंबईकर बनले.

### वैचारिक मंथन

राजकीय निर्बंधांतून सावरकरांची पूर्णपणें मुक्तता झाली. प्रत्येक पक्षियांना वाटूं लागलं होतं; सावरकरांनीं आपल्या पक्षाला येऊन मिळावं. त्यावेळीं कॉंग्रेसपक्ष देशांतील प्रमुख पक्ष म्हणून मानला जात होता. म. गांधी, सुभाषचंद्र बोस, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाअी पटेल अशा अव्वल दर्जाच्या लोकाग्रणींचें कॉंग्रेसला नेतृत्व लाभलें होतें. सावरकरांची मुक्तता होतांच त्यांनी आपल्या वसति-स्थानावर कॉंग्रेसचा तिरंगी ध्वजही उभारला होता. सुभाषबाबूंनींही त्यांना कॉंग्रेसमध्यें येण्याविषयीं विचारणा केली होती म्हणतात.

कॉंग्रेसखेरीज दुसरा पक्षही हिंदुस्थानांत होता व तो म्हणजे हिंदु-महासभा. यावेळीं हिंदुमहासभेला राजकीय महत्त्व मुळींच प्राप्त झालें नव्हते. ती अेक केवळ सांस्कृतिक विचार करणारी संस्था अेवढंच तिला महत्त्व होतं. पं. मदनमोहन मालवीय, लाला लजपतराय, तात्यासाहेब केळकर, डॉ. शंकराचार्य कुर्तकोटीं, विजय राघवाचा-रियर असे प्रमुख पुढारी या वेळपर्यंत महासभेला लाभले होते. महा-सभेच्या शैशवावस्थेंत तर कॉंग्रेसच्या अधिवेशनाला जोडूनच व कॉंग्रे-सच्या मंडपांतच आधिवेशन भरत असे व तींमधीलच पुढारी तिचे

अध्यक्ष होत. १९२७ सालीं तर म. गांधी महासभेचे चिटणीस म्हणून होते, असा अेके ठिकाणीं अुल्लेख आढळतो. म्हणजे कॉंग्रेसशीं तसा महासभेचा संघर्ष मुळींच नव्हता.

पण रत्नागिरी तुरुंगांतून सावरकर सुटले त्याच वेळीं कॉंग्रेसचीं पावलं मुसल्मानांचा अनुनय करण्याकडं वेगानं पडूं लागलीं होतीं. त्या आधीं खिलाफतीची चळवळ झालीच होती. ‘या खिलाफतीं-तूनच मलबारमधील आफत निर्माण झाली होती. या खिलाफतीनेंच मोपल्यांच्या बंडास जन्म दिला व तेथील हिंदूंचीं तेथील मुसल्मानांनीं सरसहा कत्तल केली. अबला व असहाय्य स्त्रियांवर अनेक पाशवी अत्याचार केले व लहान लहान अर्भकांचीं तर चराचर कंठनाळें चिरलीं. तरीही कॉंग्रेस स्वस्थच होती. तरीही कॉंग्रेस खिलाफतीच्या चळवळीस हातभार लावाच म्हणत होती; आणि अिकडे मुंबअी व अितर शहरांतूनही मुसल्मान हिंदूंवर हल्ले चढवीतच होते. बाटवा-बाटवीचे तर प्रस्थ राजरोस चालूं होतें. अल्पसंख्य असतील त्या प्रदेशांत ते अल्पसंख्य म्हणून व बहुसंख्य असतील तेथें बहुसंख्य म्हणून त्यांना सवलती हव्याच होत्या. या सवलती पदरांत पाडून घेण्यासाठीं जीनांच्या नेतृत्वाखालीं मुस्लीम लीगही मार्ग आक्रमूं लागली होती. लोकांत नैराश्य असल्यामुळें व कॉंग्रेसनें लोकांना भारलें असल्यामुळें बहुसंख्याकत्वाच्या सबबीवर सिंध हा मुंबअीपासून विलग करण्यांत आला होता व त्याचवेळीं आमच्या कॉंग्रेस नेत्यांनीं स्वतःच्या हातांनींच अशा रीतीनें पाकिस्तानचा पाया अुभारला होता. त्यास अनुसरूनच जीनांनीं स्वतंत्र पाकिस्तानची मागणी केली होती.

प्रत्येक कार्यांत मुस्लिमांची ही अडचण होऊन बसली. पाकिस्तान दिल्याशिवाय ते पुढें पाऊल टाकण्यास तयारही होईनात व काँग्रेस तिचा अनुनय करण्याचेंही सोडून देईना. त्यामुळें ते जास्तच शेफारले. ते करतील त्या मागण्या काँग्रेसनें मान्य केल्या तरी त्यांचा आपला हात पुढेंच. शेवटीं तर महात्माजींनीं त्यांना 'कोरा चेक' दिला. तरीही त्यांचें समाधान होईना. डोंगर महंमदाकडे येत नाहीं तर महंमदानें डोंगराकडे गेलें पाहिजे, असे काँग्रेस नेते बजावूं लागले.

**पूर्ण विचारान्तीं—**

पण सावरकरांनीं जाणलें कीं हा डोंगर साधा डोंगर नाहीं. स्वतः तो अेकाच जागी स्थिर नाहीं. त्याला पंख आहेत नि त्यामुळें त्याला अुडतां येतं नि महंमद जसजसा त्याजकडे जाअूं लागला, तसतसा हा डोंगरही मागें मागें सरकूं लागला. या शर्यतींत डोंगराचें समाधान होण्याची मुळींच शक्यता नाहीं. अुलट डोंगर जसजसा मागें सरकत आहे व महंमद त्याचे मागें मागें धांवत आहे तों शेवटीं महंमद कोणत्यातरी दरींत कोसळून त्याच्या या चिंधड्या अुडणारच. हें समजून आपण वेळींच सावध झालें पाहिजे. मुसलमानांचे हिंदूंवर अत्याचार होत आहेत ते, ते हिंदू म्हणून होत आहेत. प्रत्यक्ष हिंदूंनीं कितीही नाकारलें तरी 'तूं हिंदू आहेस म्हणून तुझा कांटा काढला पाहिजे' अशा हिरीरीनेंच ते हिंदूंशीं मुकाबला देत आहेत.

पण मुसलमान हिंदूंवर अुघड अुघड हल्ले कां करूं शकत होते? त्यांचं शस्त्रबळ हिंदूंपेक्षां जास्त होतं कां? त्यांचं संख्याबळ हिंदूंपेक्षां

जालं होतं कां ? त्याचं कारण अेकच होतं. हिंदु विस्कळित झाले होते. हिंदुंना हिंदुंविषयींच प्रेम व विश्वास वाटत नव्हता. अेकवेळ हिंदू आले नाहींत तरी चालेल; पण मुसलमानांनीं आपल्याशीं हात-मिळवणी केलीच पाहिजे. त्याशिवाय देश स्वतंत्र होअूंच शकणार नाहीं. अशी आपल्या हिंदुनेत्यांनीं स्वतःची समजूत करून घेतली होती.

**आणि कॉंग्रेसमध्यें—**

ती ही फुटीर वृत्तीच हिंदूंचा व हिंदू संस्कृतीचा नायनाट करीत आहे, हें सावरकरांनीं अुघड्या डोळ्यांनीं पाहिलं होतं व कॉंग्रेस मुस्लिमांच्या अनुनयानें हिंदुत्वाचा सौदा करत आहे हें त्यानीं जाणलं होतं. त्यानीं हेंही जाणलं होतं कीं, आज कॉंग्रेसमध्यें शिरून या गोष्टीला पायबंद घालतां येणें अशक्यच आहे. आणि आपल्या बाजूस लोकमत घेणंहि अशक्य आहे. अुलट आपलीच अुचलबांगडी व्हावयाची आणि ही कल्पना तर पुढें संपूर्णपणें खरीही ठरली आहे. खरे—नरिमन यांची हकालपट्टी झालीच, महात्माजींचा पराभव करूनही त्रिपुरा कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या व जनतेच्या कंठांतील प्राण म्हणून स्थान मिळालेल्या सुभाषचंद्रांना कॉंग्रेस सोडावी लागली. अितकेंच नाहीं तर स्वतःच्या मायदेशालाहि परागंदा व्हावें लागलें. जयप्रकाशादि समाजवादी कॉंग्रेसभक्तांना कॉंग्रेसला रामराम ठोकावा लागला आणि आज अेकवेळ जे कॉंग्रेसचे अध्यक्ष होते, गेल्याच वर्षी अध्यक्ष पदासाठीं अुभे राहिले होते व कदाचित् सरदारजींचा टंडनना पाठिंबा नसता तर अध्यक्षही झाले असते, त्याच कृपलानींना आपल्या सहकाऱ्यांसह कॉंग्रेसमधून बाहेर पडावें लागलें आहे. आणि

यांतच भर म्हणून की काय आजचे स्वतंत्र भारताचे पंतप्रधान नेहरूंनीं क्रॉमवेली हुकुमशाहीनें टंडनजींची अध्यक्षपदावरून हकालपट्टी करून स्वतःच अध्यक्षपदाची खुर्ची बळकावून अितिहासाची पुनरावृत्ती होते ती ही अशी, असें पुन्हां अेकदां सिद्ध केलें. आणि सावरकर अगर त्यांच्याच मताचे अितर हे जर कॉंग्रेसमध्यें शिरले असते तर त्यांना याहून दुसरें फळ मिळालें असतें असें म्हणवत नाहीं.

या सर्व गोष्टी व त्यांचे भावी परिणाम आणि देशाचे वारे कोणत्या दिशेनें वहात आहे तें सावरकरांनीं दूरदर्शीपणानें जाणलें. म्हणूनच त्यांना द्रष्टे म्हणावयाचें व म्हणूनच ते कॉंग्रेसमध्यें गेले नाहींत.

**महासभेचे अध्यक्ष झाले—**

हिंदुस्थानचें कोटकल्याण व स्वातंत्र्य अवलंबून असेल तर हिंदूंवरच, हें जाणून त्यांनीं हिंदु कार्य धडाडीनें चालविलें. आणि यामुळेंच त्यांना १९३७ साली कर्णावती (अहमदाबाद) येथें भरलेल्या अखिल भारतीय हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला व सुरवातीस वर्णन केल्याप्रमाणें हा मान पुढें सतत सहा वर्षे त्यांना मिळत राहिला.

**अध्यक्ष झाल्यानंतर—**

सावरकर हिंदुमहासभेचे अध्यक्ष झाले आणि महासभेस अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झालें. प्रथम दर्जाच्या श्रेणीला ती लवकरच येअून ठेपली नि वयानें व ज्ञानानें ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कॉंग्रेसशी ती स्पर्धा करूं लागली. राजकीय पेंचप्रसंग सोडवितांना कॉंग्रेसच्या बरोबरच महासभेचें मत राजकर्त्यांना विचारांत घ्यावें लागूं लागलें. आजवर व्हॉअिसरॉय गांधी व जीना यांनाच भेटत असत पण आतां

व्हॉअिसरॉयना हिंदूंचा प्रतिनिधी या नात्यानें सावरकरांचाही सल्ला ध्यावा लागूं लागला. गेल्या महायुद्धकाळीं क्रिप्ससाहेब कांहीं निरवानिरव व देवाणघेवाण करण्याच्या अुद्देशानें हिंदुस्थानांत आले. वाटाघाटींसाठीं त्यांनीं कॉंग्रेसच्या प्रतिनिधींना भेटीस बोलाविलें. त्याचप्रमाणें महासभतर्फे सावरकर व डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी यांनाही भेटीस बोलाविलें. म्हणजे गांधी-जीनांप्रमाणें सावरकरांना पाचारण करणें ही अेक राजकारणांत अत्यावश्यक गोष्ट होअून बसली. क्रिप्स् शिष्टाअीचेवेळीं त्यांतील धोक्याचीं स्थळें सावरकरांनीं तेव्हांच जाणलीं व ती योजना त्यांनीं फेटाळून लावली. मागाहून कॉंग्रेसनेंही ती योजना धुडकावली. हिंदुस्थानांत असंतोष भडकला आहे. त्याचें ज्ञान व्यवस्थित व्हावें म्हणून प्रे. रुझवेल्टनीं आपले वैयक्तिक प्रतिनिधी फिलिप्स यांस हिंदुस्थानांत पाठविलें. त्यावेळीं गांधी—जीनाप्रमाणेंच सावरकरांना त्यांनीं त्यांच्या बंगल्यावर भेट दिली. त्यावेळचें सावरकरांचें ' की घेतलें व्रत न हे अम्ही अंधतेने, लब्धप्रकाश अितिहास प्रकाशनानें, तें दिव्य दाहक म्हणोनि असावयाचें, बुद्धयाच वाण धरिले करीं हें सतीचें ' असे अितिहाससिद्ध विवेचन अैकून फिलिप्सनीं तोंडांत बोटें घातलीं अशा प्रकारें सर्व देशांत कॉंग्रेस—महासभा—लीग असे तीन पक्ष प्रबळ म्हणून गणले जाअूं लागले. स्थानिक ग्रामपंचायतीच्या निवडणुकींतील अुमेदवारापासून तों मध्यवर्ती निवडणुकींतील अुमेदवारापर्यंत सारे महासभेचे अुमेदवार निवडून येअूं लागले.

अेवढें घवघवीत यश महासभेला सावरकरांनीं अवघ्या सहा वर्षांत प्राप्त करून दिलें. कॉंग्रेससारख्या बलिष्ट पक्षाचा कठोर व प्राण-

घातक हल्ला होत असूनहि त्यांनीं हें प्रचंड यश प्राप्त करून दिलें. गांधीं–नेहरू जनतेच्या गळ्यांतील ताईत बनले असतां, त्याना देवतातुल्य स्थान प्राप्त झालें असतां व ते करतील ती पूर्व अशी वस्तुस्थिति असतांही त्यानीं काँग्रेसवर हा प्रचंड विजय मिळविला तो कांहीं केवळ सहजासहजीं अगर त्यांच्या अेकवेळच्या पूर्वपुण्याअीनें नव्हे; तर हिंदुराष्ट्र व्हावें ही तळमळ यामुळें. प्रकृति प्रतिकूल असतांही त्यानीं चिकाटीनें व धडाडीनें कार्याशीं अेकनिष्ट राहून काढलेले दौरे व अेवढ्या वृद्धापकाळांतही देशाविषयीं हृदयांत सांठविलेलं प्रेम यांमुळेंच त्यांना त्यांच्या या कार्यांत अलौकिक असं यश संपादितां आलं.

आधींच प्रकृतीचें अस्वास्थ्य. तशांत वृद्धापकाळाची झुळूक यामुळें ते सतत आजारी असतच; पण तरीही त्यानीं स्वीकारलेल्या कार्यांत रतिमात्र कुचारपणा केला नाहीं. सतत अविश्रांत दौरे काढले. काश्मीर-पासून कन्याकुमारीपर्यंत सारा हिंदुस्थान त्यांनीं धुंडाळला. त्यांच्या अितके तुफानी धांवते दौरे त्या काळांत कोणाही पुढाऱ्यानें काढले नाहींत. त्यानीं आपल्या प्रकृतीची पूर्ण हेळसांड केली. त्यामुळें प्रकृती पूर्ण ढांसळली. पाय अधू झाले आणि शारिरिक व्यंगावर टीका करणारे पशूयोनींतील नीच टीकाकार त्यांच्या पायाच्या अधूपणावरही कठोर टीका करूं लागले. तरीही त्यानीं दौरे सोडले नाहीत. चालत्या खुर्चीत बसून व धांपा टाकूनही कां होअीना, पण त्यानीं आपलीं व्याख्यानें चालूच ठेवलीं होतीं.

अशी तोळामासा प्रकृति असूनही भागानगरच्या (हैदराबादच्या)

बंधूंची व भगिनींची त्यांनीं आर्त किंकाळी ऐकली व त्यांच्या सहाय्यास ते धांवून गेले. भागानगरच्या निजामी राज्यांत हिंदूंवर क्रूरपणें अत्याचार होऊं लागले म्हणून निःशस्त्र प्रतिकाराचें रणशिंग महासभेनें फुंकलें. आर्यसमाज, राष्ट्रीय स्वयसेवक संघ ( वैयक्तिक जबाबदारीवर ) महासभेच्या हातांत हात घालून, खांद्यास खांदा भिडवून तुरुंगांत गेले. तुरुंगांतील कैद्यांवर लाठीमार वगैरे अमानुष अत्याचार, वंदेमातरम् घोषणांबद्दल फटके आदि कठोर शिक्षा होऊं लागल्या तरी सत्याग्रहींची रीघ कमी झाली नाहीं आणि शेवटीं महासभा त्या सत्याग्रहांत विजयी ठरली निजाम नमला व हिंदूंना कांहीं अधिकार त्यानें दिले. त्यावेळेस सावरकर स्वतंत्र भारताचें प्रधान नव्हते, अथवा त्याजजवळ आधुनिक शस्त्रास्त्रं नव्हतीं कीं चतुरंग सेनादलही नव्हतं.

तसाच भागलपूरचा लढा. तोही त्यांनीं यशस्वीपणें व मुत्सद्देगिरीनें लढविला. महासभेचें अधिवेशन भागलपूरला भरावयाचें ठरलें. पण सरकारनें त्याजवर बंदी घातली. तेथेंही सावरकर धडाडीनें पुढें झाले आणि सरकारी बंदी मोडूनही अधिवेशन भरविण्याचा त्यांनीं आदेश महासभावाद्यांना दिला. भागलपूरला स्वयंसेवकांचे जथेच्या जथे रवाना होऊं लागले. खुद्द त्या अधिवेशनाचे अध्यक्ष सावरकर भागलपूरला निघाले. पण सरकारी शिपायानें मध्येंच भागलपूरच्या अलिकडे त्यांस अटक केली व सहा दिवसांची कारावासाची शिक्षा दिली.

पण ज्या ठिकाणीं भागलपूरला अधिवेशन भरणार होतें त्या स्थळीं कोणी ऐका स्वयंसेवकानें हिमतीनें शिरून महासभेचा ध्वज रोंवलाच.

आणि याही लढ्यांत सावरकर यशस्वी झाले. अशा प्रकारें त्यांनीं

हिंदूंत विलक्षण जागृति केली. त्यांच्या स्वत्वाची त्यांस जाणीव करून दिली मुसलमानांचे पाशवी अत्याचारांस व सरकारच्या पक्षपाती धोरणास आळा घातला.

अशी त्यांची अलौकिक तळमळ, धडपड व देशप्रेम या अजोड गुणांनींच त्यांनीं कॉंग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसण्याचा महासभेला मान मिळवून दिला.

**मग अपयश कां ?**

अेवढें हेवा वाटण्याजोगें यश कमावलें असूनही पुढें महासभेस दैन्यावस्था कां प्राप्त झाली ? सावरकरांच्या वेळचें महत्त्व महासभेस पुढें कां राहिलें नाहीं ? त्यांचें नेतृत्वच दोषी होतें काय ? महासभेस ही जी दूरावस्था निर्माण वा प्राप्त झाली त्याला जबाबदार सावरकर होते काय ?

सावरकरांच्याकडे दोष द्यावयाचाच तर रुपयांतील दोन आणे दोष त्यांना देता येअील. त्यांचें सर्व आयुष्य अंदमानसारख्या कारागारांत गेल्यानें व तेथें अनंत यातना भोगाव्या लागल्यानें ते प्रकृतीनें अशक्त बनले व महासभेला त्यांच्या प्रभावी नेतृत्वास लवकरच मुकावें लागलें. नुकतीच कुठें ती बाळसं धरूं लागली होती. सावरकरांच्या हाताला धरून थोडी धिटाअीनं पावलं टाकूं लागली होती. पण त्यांच्या नेतृत्वाअभावीं अेकाअेकीं तिची पोरक्या पोरासारखी अवस्था झाली.

दुसरें असें, त्यांच्या आयुष्यांत झगडेच फार असल्यानें व अधिकाऱ्यांचा ताठरपणा नमविण्यासाठीं कडकपणा धारण करावा लागल्यानें, तसेंच त्यांचं बरंचसं आयुष्य अंदमानसारख्या दूरच्या प्रदेशांत,

जिथं बंदिवानांखेरीज दुसरा मनुष्यच नाहीं अशा ठिकाणी गेल्यानें त्यांचा स्वभावच असा बेफिकीर, अेकलकोंडा बनला व त्यांनीं आयुष्यांत 'वरं जनाहितध्येयं केवला न जनस्तुतिः'. असें कठोर सतीचं वाण स्वीकारलं.

यामुळें जनतेच्या मनांत शिरावं कसं, तिला आपलीशी करावी कशी, प्रसंगीं आपल्या तत्वांना मुरड घालावी कशी व जनतेच्या कलानं घेअून तिला आपलीं तत्वं मान्य करायला लावावीं कशीं हें त्यांना व्यवस्थितपणें साधूं शकलें नाहीं. आअी अगर बाप मुलाचं कल्याण व्हावं म्हणूनच झटतात खरे. बाप अुठल्यासुटल्या धाकानं, कठोर शब्दानं अगर दंडुक्यानं मुलास वजावतो, 'ह्यांतच तुझं हीत आहे. या मार्गानंच तूं जावंस. दुसरा मार्ग चुकीचा आहे. अैकणार नाहींस तर तुला मला कठोर शिक्षा करावी लागेल; पण तुला अैकणं भाग पडेल. मला तुझं हीत पहायचंय. केवळ तुला गोंजारायचं नाहीं.' आणि आअी! आअी आपल्या मधुर व प्रेमळ शब्दांनीं मुलाचं हृदय काबीज करते व सहजतेनें त्यास चांगल्याचे धडे देअूं शकते. ती म्हणते:— 'बाळ! असं काय वरं वेड्यासारखं करावं? प्रभु रामचंद्रानं असं केलं होतं कां? कृष्णानं? शिवाजीनं आणि आपल्या टिळकांनीं तरी? अशानं लोकं तुला नांव नाहींत कां ठेवणार? तूं चांगला वागला नाहींस तर तुलाच नाहीं कां वरं त्रास होणार! लोक तुला वेडा म्हणतील, चोर म्हणतील. त्यापासून तुझ्या आअीवडिलांना त्रास पोंचेल. आवडेल कां तुला?' सावरकरांचें हृदय पित्यासारखें कठोर होतें. त्यांतच मातेच्या ममतेचा थोडासा ओलावा हवा होता.

पण तसें नव्हतें म्हणून स्वतः ते होते; तेव्हां त्यांचं प्रभावी व्यक्तिमत्व, अविश्रांत धडपड यानें दिपून जाऊन बरेच कार्यकर्ते महासभेस मिळाले. पण ते दूर होतांच हे कार्यकर्ते अगदींच दुर्बळ झाले व महासभेची केविलवाणी स्थिति झाली. महात्माजींच्या प्रभावळींत पंडित जवाहरलाल, सरदार वल्लभभाओी असे प्रचंड व्यक्तिमत्वाचे कार्यकर्ते निर्माण झाले. पण कारणें कांहीं असोत, असें प्रचंड व्यक्तिमत्व ज्यास प्राप्त झालें आहे असा अकही कार्यकर्ता सावरकरांच्या महासभा प्रभावळींत निर्माण झाला नाहीं. नाहीं म्हणावयास श्यामाप्रसादांकडे बोट दाखविता येअील तेवढेच.

पण याला कारण केवळ सावरकरच असावे कां? वर म्हटलेंच आहे. द्यावयाचाच दोष तर सावरकरांना दोन आणे द्यावा; पण अरलेला १४ आणे हा आम्हां महासभावादी म्हणविणाऱ्या लोकांवर, आमच्या मत्सरग्रस्त व अंधानुकरणवादी वृत्तीवर व आमच्या कमालीच्या शांतपणावादावर आहे.

ज्यावेळीं सावरकरांच्या हातीं महासभेचीं सूत्रें आलीं त्यावेळीं आपली महाराष्ट्रीय जनता महात्माजींच्या कच्छपीं पूर्णपणें लागली होती. तिला स्वतःचें मत मुळीं राहिलंच नव्हतं व 'अेक वर्षांत स्वराज्य; सत्यमेव जयते; अहिंसा परमोधर्मः; तुम्हीं आम्हीं सारे भाओी' या मत्रानें भारली होती. अशा प्रकारें अेकदां भारली गेलेली जनता परत भानावर आणणें सुतराम् अशक्य होतं.

तसंच आजवर झालेल्या पुढाऱ्यांनीं, मान्यवर पुढाऱ्यांनीं जनता नाराज होअील अस कांहीं प्रतिपादन केलं नव्हतं वा भारतवासियांतील

कोणाही तद्देशीय बहुसंख्याकांचा रोष स्वतःवर ओढवून घेतला नव्हता, व ज्यांनीं अशा प्रकारें जनतेच्या भावनांशीं झगडा देण्याचा प्रयत्न केला त्यांची त्याकाळीं जनतेनं दैना उडविली. आगरकरांची जिवंत-पणीं प्रेतयात्रा काढली. म. फुल्यांवर दगडफेक केली. भारतीय संतांची तर कोण विटंबना केली. नि म्हणून तर आपल्यांत म्हणतातही ' सजीव तोंवरि लत्ता देती, मरतां घेती खांद्यावरती, अफाटा सन्मान ' असा आमच्या जनतेचा खाक्या आहे. सावरकरांच्या कठोर वाणीनें व लेखणीनें त्यांना स्वतःच्या जमातींतच अनेक शत्रु निर्माण झाले. अस्पृश्यता निवारणाचा हिरीरीनं पुरस्कार केल्यानें व अितरही प्रगतिपर गोष्टींचा पुरस्कार केल्यानें पुराणमतवादी सनातनवर्ग त्यांच्यावर चिडून राहिला. ' लेखण्या मोडा तरवारी घ्या ' या कटुसत्य उद्घोषानें ' साहित्यिक ' त्यांजवर धुसफुसूं लागले. लिपिशुद्धि व भाषाशुद्धि या चळवळीमुळें कांहीं व्याकरणवीर व कांहीं भाषावीर त्यांजवर तडकूं लागले. गांधी—नेहरूंसारख्या जनतेच्या गळ्यांतील ताअितांवर टीका करीत राहिल्यानें अखिल भारतीय जनतेचा क्रोधाग्नी त्यांजभोंवतीं भडकूं लागला होता. विरोधक अेकजुटीनें सावरकरांवर तुटून पडत होते. त्यांजजवळ पैसा, मनुष्य व वृत्तपत्र यांचें अचाट बळ होतें. आजच्या-सारखे समाजवादी फुटीर, शे. का. प. फुटीर, प्रजापक्ष फुटीर, पुरोगामी फुटीर असा आजचा फुटीरपणाचा फायदा त्यावेळीं घेतां येत नव्हता. खेड्यापाड्यांतून आमच्या सुशिक्षित विरोधकांनीं खेडुतांना खोटेंनाटें बोल काढून अितकें चिथवून भडकाविलें होतें कीं, व्यक्तिशः सावरकर तेथें जाते तर जिवंत हातीं लागते ना. टिळककालीं व त्या आधीं

'स्वराज्या' चा अुच्चार करणं जितकं धोक्याचं होअून बसलं होतं त्याहून शतपटीनं अधिक धोक्याचं कॉंग्रेसविरुद्ध बोलणं होतं. कारण ब्रिटिशांविरुद्ध झगडत असतां केवळ 'सरकार व कांहीं चारदोन त्याचे पित्ते' यांचीच काय ती दहशत होती. परंतु कॉंग्रेसविरुद्ध शब्द काढणं म्हणजे जनतेशीं झुंज देणं होत. आणि जनतेनंच न्यायदान हातीं घेतल्यावर जनता किती कठोरपणें निर्णय देते हें समंजस टीकाकारांना आतां नव्यानं सांगायला नको. जे सावरकरांच्या नेतृत्वाला नांवं ठेवितात व दोषी ठरवितात त्यांनीं विचार करावा कीं, त्यावेळचा संघटित विरोध आज आहे कां? अेखादं शेंबडं पोरही अुठतं नि कॉंग्रेसची नालस्ती करतं. ही स्थिति त्याकाळीं होती कां? आणि अेकंदरीत आमचें महाराष्ट्रीयच स्वत्व विसरले नव्हते कां? महात्माजींच्या प्रभावशाली नेतृत्वांत तरी असा अेकतरी महाराष्ट्रीय वीर पुरुष तयार झाला आहे कां की जो पटेलांची व नेहरूंचीं बरोबरी करूं शकेल? सावरकरांच्या नेतृत्वास दोष देतांना स्वतःच्या नालायकीवर पांघरूण घालणं हाच अेकमेव हेतु आम्हां त्यांचे अभिमानी म्हणविणाऱ्या टीकाकरांचा असतो. किंवा हल्लीच्या विमनस्क परिस्थितीनें किंकर्तव्यमूढ झाल्यानें केवळ सावरकरांच्या नेतृत्वावरच साऱ्या दोषांचं खापर फोडून 'काय करावें, सावरकरांचें नेतृत्वच दोषी होतें हो,' म्हणून आपण नामनिराळेच होण्याचा विचार असतो.

दोषी सावरकरांचं नेतृत्व नव्हतं तर त्यामागें जे आम्हीं नालायक अुभे राहिलों तें आमचें अनुयायित्व दोषी होतं. धनी शहाणा असला तरी गडी मूर्ख असेल तर तेथें काय धनी रडेल?

दुर्दैवानें सावरकरांना असेच अनुयायी भेटले कीं, जे गांधींपासून मुळांतच फटकून राहिले. आणि नंतर त्यांच्या स्वतःच्या सामर्थ्यावर महासभा फुलवली. पण त्यांची प्रकृती पूर्णपणें ढांसळली व त्यांनीं अध्यक्षपदाचा राजिमामा दिला. वरील अनुयायांना पुढें मिळावें तसें प्रभावी नेतृत्व मिळूं शकलें नाहीं. अनुयायांच्या निष्ठेस तळमळ, चिकाटी, त्याग करण्याची तयारी व कष्ट घेण्याची हुषारी यांचा त्यांना पाठिंबा मिळाला नाहीं नि सावरकरांच्या कारकिर्दीत खुद्द तेच झटत होते म्हणुन झटणारे कार्यकर्ते त्यांचेनंतर अेकमेकांत लठ्ठालठ्ठी मात्र करूं लागले. कार्याचें नांवानें रड सुरूं झाली; अेवढेंच नव्हे तर लागोपाठ सहाही वर्षें सावरकरच अध्यक्ष झाले नि कानामागून येअून तिखट झाले म्हणून मनांतून रुष्ट झालेले व मत्सराग्नीनें भडकलेले जेष्ट व श्रेष्ठ कार्यकर्ते व त्यांचे पित्ते महासभेंतील दुय्यम कार्यकर्ते (तेही महाराष्ट्रीयच) मत्सरग्रस्त होअून त्यांचें नांवें जळफळूं लागले व त्यांच्या मताचा विपर्यास करून आपल्या वर्तमानपत्रातून बेफामपणें भरकटूं लागले. माझा असा दावा आहे कीं, सावरकरांनीं श्रमानें दिलेली ही कीर्ति मातीमोल करण्यास कारणीभूत कोण असेल तर हे असले महासभेंतील मत्सरग्रस्त व स्वार्थलोलुप गटबाज कार्यकर्ते! मला त्यांना म्हणायचंय, 'सावरकरांचं नेतृत्व दोषी होतं व म्हणून तुम्हीं मागं पडला म्हणता; पण त्यावेळीं निदान सावरकर अेकाकी बलिष्ट कॉंग्रेसशीं झुंजत होते. आज तुमच्या हातीं नेतृत्व आलें आहे व

काँग्रेसचीं छकलं छकलं अुडालीं आहेत व तुमचा विरोधकच आज खिळखिळा झाला आहे. असं असूनही सावरकरांच्या वेळचीच नव्हे तर निदान त्या आधींची तरी प्रतिष्ठा कां मिळवितां येअीना?

पण सावरकरांचा 'द्वेष' यांखेरीज त्यांजजवळ दुसरें अुत्तरच नाहीं. आणि यांतच पराभवाचीं मुळं साठविलेलीं आहेत. तशांतच पुढें गांधीवध झाला नि सरकारनें त्याचा महासभेशीं बादरायण संबंध जोडल्यानें तिची होती तेवढीही पत नाहींशी झाली नि महासभेला देशाच्या वाळवंटांत वैराण भटकावें लागलें.

# — गांधीवधानन्तर —

'महायुद्धांत ब्रिटन दुबळें होईल तेव्हां झाडावरून फळ पडावें तसें स्वराज्य तुमच्यावर पडणार आहे, त्यांत अिस्लामी जातीयता बिघाड करील, तो टाळणे यावर आपलें मुख्य लक्ष असलें पाहिजे. 'छोडो हिंदुस्थान'ची चळवळ पुकारणारांचें लक्ष स्वराज्यांतील सत्ता आपल्या पक्षाच्या हातीं कसेंही करून यावी यावर आहे.'

सावरकर १९४२

'ब्रिटनला अपरिहार्य गोष्टींतून अुदारपणाचें श्रेय काढण्याची अिच्छा होती. मुस्लीमलीगला पाकिस्तान हिसकून घेण्याची अिच्छा होती. कॉंग्रेसला स्वराज्यांतील सत्तेचा मक्ता घेण्याची घाअी होती. या तिन्ही पक्षांचा लग्गा साधला, पण या लगीन घाअींत भारताच्या हजारों जीवांची हत्या, सर्वनाश,

अबलांच्या अिज्जतीचे धिंडवडे यांच्याकडे तिघांचेही दुर्लक्षच होते.'

केसरी 'आम्हांस काय वाटतें?' ४-१२-५१

१८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धानंतर भारतीयांनीं ब्रिटिश अधिसत्तेशीं ज्या टकरा दिल्या व ब्रिटिश अमलाला ज्या धडका मारल्या त्यामुळें भारताचा स्वातंत्र्यकाळ समीप आला होता. तशांतच युरोपांत दोन महायुद्धें झालीं व त्यांत जरी ब्रिटिशांचा जय झाला तरी अेकंदरीत तें राष्ट्र दुर्बळच होत गेलें. दुसऱ्या महायुद्धानंतर तर तें राष्ट्र अितकें कमजोर बनलें कीं, स्वतःच्या चिमुकल्या अिंग्लंडचें रक्षण करतां येअील कीं नाहीं ही विवंचना त्याला पडली. आर्थिक बाबतींत तें राष्ट्र पूर्णपणें अमेरिकेच्या आहारीं गेलें महायुद्धांत अणूचीं कागदपत्रें वगैरे सर्व गुप्त माहिती अमेरिकेला पूर्णपणें देअून टाकल्यानें त्या बाबतींत तें राष्ट्र पूर्ण कंगाल बनलें. अिकडे रशियाची पोलादी मूठ त्या राष्ट्राच्या मानेभोंवतीं आवळूं लागली. अेकंदरीत सर्वच क्षेत्रांत अिंग्लंडचा बोज्या वाजला नि निदान राष्ट्र सोडावयाचें तर मोठेपणा घेअून कां सोडूं नये असा पोक्त विचार करून ब्रिटिश सरकारनें आपल्या साम्राज्यांतील कांहीं प्रबल राष्ट्रांना स्वातंत्र्य देण्याचें ठरविलें; पण तें देतांनाही तें राष्ट्र कमजोर व्हावें म्हणून कांहीं मेखाही मारण्याचें ठरविलें.

नि त्यास अनुसरूनच १५ ऑगस्ट १९४७ रोजीं भारतास स्वातंत्र्य देण्यांत आलें. पण याच स्वातंत्र्याबरोबर जेथें कांहीं शें

वर्षांपूर्वी मुसलमानांचा पत्ताही नव्हता तेथें त्यांचें स्वतंत्र राज्य निर्माण केलें. भारताची फाळणी केली. शून्यांतून पाकिस्तान निर्माण झालें.

हें पाकिस्तान निर्माण होऊं नये म्हणून सावरकरांनीं अखेरपर्यंत देह, वाणी आणि लेखणी तनानें, मनानें आणि धनानें झिजवली. भारताची फाळणी मान्य करणारे आज म्हणत आहेत कीं, ही जातीयवादी (सावरकरवादी) मंडळीच पाकिस्तान निर्माण होणेस कारण आहेत. पण अितिहास आंधळा, बहिरा वा मुका असत नाहीं. जोंवर चलती होती तोंवर फाळणीचें पाप दुसऱ्याच्या माथीं मारणाऱ्या व स्वातंत्र्याचें पुण्य स्वतःच्या पदरीं बांधणाऱ्या या सोज्वळ मंडळींनीं अितिहासाचा विपर्यास केला व तो त्यावेळेस जनतेला खराही वाटला. काँग्रेसवाद्यांच्या विपर्यस्त प्रचाराच्या वाद्यांच्या गजरांत, धुमधडाक्यांत 'स्वातंत्र्यवीर सावरकरा'-सारख्या अप्रियतेच्या चितेवर चढविण्यांत आलेल्या सतीच्या पाकिस्तान विरोधाच्या किंकाळ्या अैकूं येणार कोणाला? पण आज तीच जनता अुघड अुघड म्हणत आहे, 'फाळणी काँग्रेसनं केली व ती नेहरू-पटेल आदि मंडळींनीं विरोधकांच्या विरोधास डावलून अंधारांत केली. आजच्या अितिहासावरील या व्यक्तींचं दडपण पूर्णपणें कमी होतांच २०-२५ अगर ५० वर्षांनन्तरचा अितिहास नमूद करेल, 'भारताची फाळणी नेहरू-पटेलांनीं केली. भारताची छकलं नेहरू-पटेलांनीं केलीं. त्यास काँग्रेसमधील अेकाच व्यक्तीनं म्हणजे टंडनजींनीं कसून विरोध केला. पण महात्माजींनीं आपला शब्द खर्च केला. फाळणीस मान्यता मिळाली व मगच देश दुभंगला. सावरकरादि मंडळींनीं फाळणी केली नाहीं. शेवटपर्यंत ते प्राणपणानें त्याशीं लढले परंतु त्यांचें सामर्थ्य

तोंकडे पडलें म्हणून अपयश आलें.' आजचा किंवा भावी अितिहास अन्याय्य बनणार नाहीं. शिवकालीन अितिहास तर्कानें वा जुन्या संशयित कागदपत्रांनीं परंपराविरुद्ध खरा मानावा लागतो. पण आज दोनही बाजू 'रेकॉर्ड'ला तयार आहेत. अितिहासकाराला अितिहास लिहितांना दोहोंचाही विचार करूनच तो लिहावा लागेल. पक्षपाती अितिहास चालू जमान्यांत निरंतर टिकणार नाहीं.

**पाकिस्तान निर्मितीनंतर**

सुरुवातीस वर्णन केल्याप्रमाणें कॉंग्रेसची अधिकार स्वीकाराची घाअी, मुसलमानांची पाकिस्तानासंबंधीं तीव्रता आणि ब्रिटिशांची डोअीजड साम्राज्यपसारा आवरण्याची अपरिहार्यता यांचे बरोबर बेचक्यांत त्यावेळचे व्हाअीसरॉय मॉअुंटबॅटन यांनीं घेरलें व भारतीय नेत्यांनीं खंडित भारताचें स्वातंत्र्य स्वीकारलें आणि कॉंग्रेसनें भारतीय सत्ता आपले हातीं घेतली. पं. जवाहरलाल नेहरू स्वतंत्र भारताचे पंतप्रधान झाले. सरदार पटेल भारताचे अुपपंतप्रधान झाले. गांधीजी 'न धरीं शस्त्र करीं मी गोष्टी सांगेन युक्तिच्या चार' या कृष्ण नीतीनें भारत सरकारला सल्ला देअूं लागले.

भारतीय नेत्यांनीं दर्शविल्याप्रमाणें पाकिस्ताननें जन्मापासूनच भारताशीं मित्रत्व न पत्करतां शत्रुत्व पत्करल व त्यावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानांत हिंदूंच्या कत्तली झाल्या. स्त्रियांची बिटंबना झाली. सर्व मालमत्ता, घरदार, जमिनजुमला सरकारजमा झाली नि भारतांत निर्वासितांचा तांडाच्या तांडा येअूं लागला. पाकिस्तानांत

ते हिंदू म्हणून त्यांचे हाल कुत्रें खाईना व अिकडे भारतांत निर्वासित म्हणून त्यांची दैना थांबेना व मृदुंगाप्रमाणें दोहोंकडूनही त्या बिचाऱ्यांना थपडा बसूं लागल्या.

रहायला घर नाहीं. ल्यायला वस्त्र नाहीं. खायला अन्न नाहीं अशीं निर्वासितांचीं केविलवाणी स्थिति झाली. तेव्हां दिसतील त्या कुलपबंद घरांतून व देवळांतून नि मशिदींतून ते राहूं लागले. हीं घरें पाकिस्तानांत गेलेल्या मुसलमानांचीं होतीं. हा निर्वासितांचा घोर अनाचार मौलाना आझादादि 'राष्ट्रीय' मुसलमानांना पाहवेना. त्यांनीं गांधींभोंवतीं धरणें धरलें नि शेवटी महात्माजींनीं प्राणांतिक अुपोषण सुरू केलें. महत्माजींचे प्राण वांचावेत म्हणून भारत सरकारनें गांधीजींच्या सातही मागण्या मान्य केल्या आणि त्या अन्वयें मुसलमानांचीं बेवारशीं घरं पुन्हां मोहोरबंद केलीं, मशिदींतून निर्वासितांना हुसकून लावलें, पाकिस्तानला त्याचे ५५ कोटि रुपये देण्यास भाग पाडलें. भारत सरकारनें ही रक्कम पाकिस्तानला देण्याचें स्थगित कां केलें होतें याचें खुद्द पं. नेहरुनींच पत्रकारांपुढें निवेदन केलें होतें की, 'पाकिस्तानला ५५ कोटि रुपये आणि दारूगोळा भारतानें पुरविला तर काश्मिरांतील हत्याकांड पुढें चालविण्याला आपणच सहाय्य केल्यासारखें होअील. यासाठीं सरकारनें तें द्रव्य आणि दारूगोळा द्यावयाचें स्थगित केलें. आहे.' असें असूनही गांधीजींच्या प्राणाची ढाल पुढें करून राष्ट्रीय मुसलमानांनीं सातही मागण्या स्वतःच्या पदरांत पाडून घेतल्या. वास्तविक मुसलमानांवर अत्याचार अपवादादाखल कोठेंतरी होत होते; ते ही तुरळक आणि प्रथम मुसलमानांनीं

आगळिक केली म्हणूनच. पण तेही 'बॉंब' वर्षावाच्या धमकीनें नेहरूंनीं मोडून टाकले होते.

अशा प्रकारें परधर्माविषयी आदर म्हणजे स्वधर्माविषयीं द्वेष, कुत्तर ओढ असें समीकरण गृहीत धरल्यानें व कॉंग्रेसचें धोरण म्हणजे घरच्या म्हातारीचे काळ बनल्यानें भारत सरकार व महात्मा गांधी यांबद्दल जनतेंत असंतोष वाढूं लागला. महात्माजींचें जीवनही धोक्यांत येऊं लागलें व अखेर ३० जानेवारी १९४८ रोजी सायंप्रार्थनेस जात असतां त्या वाढत्या असंतोषाग्नींत महात्माजीचा बळीही पडला.

**गांधी खून खटला—**

महात्माजींचा वध नथुराम गोडसे या असंतोषी व क्रोधाग्नी भडकलेल्या तरुणानें केला. नथुरामचें हें कृत्य चांगलें कीं वाईट, त्याच्या या कृत्यानें भारताचा कांहीं फायदा झाला की तोटा, याचें विवेचन भावी अितिहासकारच करतील. अितक्या खोल पाण्यांत शिरण्याचें आपणांस कांहींच कारण नाहीं. आपणास विचार करावयाचा तो फक्त अेवढाच कीं, यांत सावरकरांचें अंग होतें काय?

आतांपर्यंतच्या विवेचनावरून सावरकरांविषयीं मनात द्वंद्व निर्माण घालूं लागेल हें खरें आहे. सावरकर व सावरकरांची संघटना यांनीं लंडनच्या वास्तव्यांत व त्यापूर्वीच्या भारताच्या वास्तव्यांत शस्त्रें वापरलीं, पिस्तुलें, बंदुका यांचा सरसहा अुपयोग केला, बॉंब्सचेही सर्वत्र स्फोट अुडविले, अिंग्रज अधिकाऱ्यांचे खूनही पाडले; साहजीकच भासूं लागते अशा अनेक अुलाढाली केलेला मनुष्य पुढें निवळेल हें शक्य नाही.

पण आपण क्रांतिकार्य कां स्वीकारलें याचें सावरकरांनीं सांगितलेलें कारण पडताळलें, आयर्लंडचा क्रांतिकारक डी व्हॅलेरा व आफ्रिकेचा जनरल स्मॅटस् यांचे क्रांतिकार्योत्तर आयुष्य न्याहाळलें, सेनापति बापट, बॅ. असफअली आदि त्यावेळीं अभिनव भारताचे सभासद होते हें विचारांत घेतलें आणि सावरकरांचे गुरु शिवरामपंत परांजपे हे पुढें अहिंसा परमोधर्मःचे उपासक बनले याचा विचार केला तर आपणांला सहजच पटेल कीं अेकदां क्रांतिकारक असलेला मनुष्य नेहमींच क्रांतिकारक राहीलच असें छातीठोकपणें सांगतां येणार नाहीं. रावसाहेब पटवर्धन यांनी अेका व्याख्यानप्रसंगीं हेंच सांगितलें होतें कीं, 'कालचे क्रांतिकारक आज व आजचे क्रांतिकारक अुद्यां मवाळ होतात.'

आणि याचेंच प्रत्यंतर सावरकर अंदमानांतून बाहेर पडल्यानंतर त्यानीं केलेल्या सनदशीर कार्यांत दिसून येतें. स्वातंत्र्य वीर सावरकर हिंदुमहासभेचे अध्यक्ष होते तोंवर म. गांधी वध सारखी घटना होअू शकली नाहीं पण सनदशीर मार्गानें चाललेल्या कॉंग्रेसच्या झेंड्या-खालील देशभक्तांकडून मात्र चिमण अष्टेकरांसारख्या कोंवळ्या मुलांचे खून झाले, रेल्वेगाड्या अुलथवल्या, सरकारी खजीने लुटले गेले, स्टेशनें जाळलीं गेली; अेवढच नव्हे तर कांहींचे प्राणही धोक्यांत आणले गेले या गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत.

अेकदां गव्हर्नर लॉअीड जॉर्ज व सावरकर यांची भेट झाली असतां सावरकरांनीं क्रांतिकारकांचें हृदय अुकलून दाखविलें त्यावेळीं ते म्हणाले होते–' जेव्हां कोणत्याही शांत किंवा वैध मार्गानें आमच्या

राष्ट्राच्या राजकीय आकांक्षा पूर्ण होण्याचा संभव असलेला आढळेना तेव्हां क्रांतिकारक आडमार्गाच्या आणि भीषण रानांतून वाट काढीत जाणें आम्हांस भाग पडलें. जर सध्यां दिलेल्या सुधारणेनें राष्ट्राच्या प्रगतीची व विकासाची शक्यता दिसत असेल तर आम्हीही आमच्या क्रांतिकारक चळवळींतही प्रतियोगी तत्वाप्रमाणें शांत आणि वैध मार्गाचे अवलंबन करूं.'

आणखीही अेके ठिकाणीं या विषयीं सावरकरांनीं लिहिले आहे कीं, 'जेथें सत्याचे प्रतिपादनास प्रतिबंध असेल, तेथेंच गुप्त संस्था अपरिहार्य म्हणून न्याय्य होत. जेथें राष्ट्रसंस्थेच्या विकासास व नैसर्गिक अुत्क्रांतीला बलात्कार बांध ठेवीत नसेल, तेथेंच क्रांतीचा आघात न्याय्य आहे. राज्यघटनेच्या सौम्य मार्गानें लोकांना आपलें मत जेथें स्थापन करतां येतें, अशा अिंग्लंड, फ्रान्सप्रभृति देशांतून शांतिचे वैध (सनदशीर) प्रयत्न सोडून क्रांतिकारक चळवळी कोणी करील तर तो मात्र आततायीपणा होअील. अशा शांतीचा व राज्यघटनेचा वैध मार्ग आमच्या देशांत शक्य होताच आम्ही गुप्त व सशस्त्र प्रतिरोध आनंदानें सोडू. हिंदुस्थानास शांतिमार्गानें स्वातंत्र्य मिळविण्याची अुत्कट अिच्छा आहे. परंतु तुमचा बलात्कार तें अशक्य करतो म्हणून आम्हीं बलानेंच बलात्कार हाणूं पाहतो.

'सनद नसतां सनदशीर चळवळीचे बोलणें म्हणजे थट्टा करण्यासारखें हास्यास्पद कृत्य होय; परंतु राष्ट्रसंवर्धन करणारी घटना प्राप्त होत असल्यास कृतीचीं भाषा बोलणें अधिक थट्टास्पद नव्हे अधिक दोषास्पद आहे.'

हिंदुस्थान पारतंत्र्यांत असतेवेळीं काढलेले हे सावकरांचे अुद्गार आहेत. त्यावेळीं जर ते अितक्या संयमानें बोलत होते व वागत होते तर स्वातंत्र्य प्राप्त होतांच व सनदशीर घटनेची शिडी प्राप्त होतांच ती लाथाडण्याचा आततायीपणा ते करतील व गांधीवधासारख्या कृत्यांत ते सहभागी होतील असा मनाशीं ग्रह करून घेणें हें त्यांच्या विषयीं मुळांतच मनांतून द्वेष भडकला आहे हें अुघड करण्यासारखं आहे.

पण तें कांहीं असो. महात्माजींचा वध करण्यांत अनेकांचा हात असावा असा सरकारला संशय आला व त्याप्रमाणें धरपकडहीं सुरू झाली. या खुनांत सावरकरांचें अंग असावें असाही सरकारनें तर्क बांधला व सावरकर आणि अितर ८ आरोपी अशा ९ आरोपींवर गांधी खुनाच्या व खुनास मदत करण्याच्या आरोपाखालीं खटला भरला व तो लाल किल्ल्यांत न्यायमूर्ती आत्माचरण यांच्या विशेष न्यायालया-खालीं १४ जून १९४८ पासून सुरू झाला. सरकातर्फे श्री. सी. के. दफ्तरी हे काम पहात होते व सावरकरांतर्फे, भोपटकर, जमनादास, बॅ. पी. आर. दास आणि बचाव समिती काम पहात होती. सरकारी वकील दफ्तरी यांनीं प्रथम भाषण केलें. दि. २४ पासून साक्ष नोंद-णीला सुरुवात झाली. सुमारे ८४ दिवस तें काम चालून फिर्यादी पक्षाच्या १४३ साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. साक्ष नोंदणींत सुमारें ६९६ टाअीप फुलस्केप पानें भरलीं असून माफीच्या साक्षीदाराचें—बडगेचें—निवेदन ७९ पानें आहे. नथूरामचें ९३ पानें व सावरकरांचें ५७ पानें आहे.

फिर्यादी पक्षानें ११८ कागदपत्रें सादर केलीं. प्रत्येक प्रश्न व

याचें अुत्तर हिंदुस्थानी, मराठी, तेलगू यांत अनुवादित केलीं जात होतीं.

**सावरकरांवर आरोप—**

सरकारनें निश्चित पुरावा नसतां संशयानें सावरकरांना खटल्यांत गोंवलें. सरकारी वकिलानीं सावरकरांवरील आरोपपत्र वाचून दाखविलें. ते म्हणाले, 'शेवटचे आरोपी वि. दा. सावरकर अेका विशिष्ट विचारप्रणालीच्या संप्रदायाचे पुढारी असून हिंदूमहासभेचे ते अध्यक्ष होते. त्यांचें धोरण व विचार सर्वांस विदित असून गेले कित्येक दिवस गोडसे व आपटे या आरोपींवर त्यांचें फार वजन होतें. आपले अेकमेव मार्गदर्शक व 'गुरु' म्हणूनच ते सावरकर यांना समजत असत असें म्हटल्यास तें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. सावरकर यांच्या आशिर्वादानेंच 'अग्रणी' निघाला. त्या पत्राला आर्थिक सहाय्यही त्यांचें होतें. आरोपींचें ते 'थोर दैवत' होते. त्यांचा फोटो प्रत्येक अग्रणीच्या मुखपृष्टावर छापलेला असे. मुंबअींतील दादर येथील निवासस्थानीं गोडसे व आपटे त्यांची वारंवार भेट घेत असत. पुढें काय घडणार आहे, याची पुरेपूर माहिती त्यांना होती; अितकेंच नव्हे तर त्यांच्या संमतीविना अशा धाडसाला आरोपीनीं हातच घातला नसता असें सिद्ध करण्यास सबळ पुरावा आहे.'

'हिंदुराष्ट्र दलाची स्थापना सावरकर यांच्या प्रेरणेनें—संमतीनें झाली. त्यांची कित्येक पुस्तकें हीं देशांतील अेका विशिष्ट विचार-सरणीच्या सांप्रदायांत पाठ्यपुस्तकांसारखीं वाचलीं जात व गोडसे, आपटे, परचुरे हे त्याचा प्रचार करीत. गोडसे, आपटे, करकरे

यांच्याशीं सावरकर यांचा घनिष्ट संबंध होता. जेव्हां जेव्हां ते मुंबऋी-बाहेर पडत त्या त्या वेळीं आपटे व गोडसे त्यांच्याबरोबर असत व त्यांच्याबरोबर रहात. दि. १४ जानेवारीला आपटे व गोडसे यांनीं दादर येथील निवसस्थानीं सावरकर यांची शेवटची भेट घेतली. त्यानंतर ४ दिवसांनीं ते दिल्लीकडे रवाना झाले.'

सरकारी वकिलाच्या भाषणानंतर अनेक साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. सावरकरांवरील आरोपांचा ज्यांवर डोलारा अुभारला होता तीं माफीचा साक्षीदार बडगे याचीं विधानें महत्वाचीं पण फुसकीं आणि अैकीव होतीं. तीं विधानें महत्त्वाचीं म्हणावयाचें कारण या फुसक्या विधानांवरच सरकारनें सावरकरांवर आरोप लादले होते. बडगे आपल्या माफीच्या साक्षींत म्हणाला होता, 'मला आपट्यानें सांगितलें कीं, 'तात्यारावांनीं गांधीजी, पंडीत जवाहरलाल नेहरू आणि सुऱ्हावर्दी यांचा निकाल लावून टाकण्याचें ठरविलें आहे. गांधीजींचीं शंभर वर्षे भरलीं; तेव्हां आपण आपल्या कार्यांत निश्चित यशस्वी होणार याबद्दल शंका नाहीं असें भाकीत केलें आहे.'

बडग्याचे साक्षीनंतर कु. शांता मोडकची साक्ष झाली. तिनें आपल्या साक्षींत सांगितलें कीं, तिनें त्यांना स्वतःच्या मोटारींतून सावरकर सदनावर सोडलें. यानंतर प्रो. जैन, मोरारजी देसाअी यांच्याही साक्षी झाल्या; पण त्याही बडगेप्रमाणेंच अैकीव माहितीवर आधारलेल्या.

**बॅ. पी. आर. दासांचें बचावाचें भाषण—**

साक्षीदारांची तपासणी, फेरतपासणी आदि फापटपसारा आवरतांच

सावरकरांचे वचावाचे वकील बॅ. दास बचावाचें भाषण करूं लागले. ते म्हणाले.

'सावरकरांच्या पुरतेंच बोलायचें तर कट होता कीं नाहीं याबद्दल शंका घेण्यास जागा आहे. आणि असलाच तरी त्यांत सावरकरांचें अंग होतें वा नाहीं यांबद्दलची शंका घेण्यास जागा आहे.'

'बडग्याची अँकीत्र साक्ष केवळ अग्राह्यच नव्हे तर सवर्स्वी विसंगत आहे. कु. शांता मोडकनें आपटे गोडसेला आपल्या मोटारींत घेऊन सावरकर सदनाच्या वाटेवर सोडलें यावरून ते नक्की सदनांत गेलेच होते असें सिद्ध होत नाहीं.'

'शिवाय सावरकरांच्या दर्जाची व्यक्ती महात्मा गांधींसारख्या व्यक्तीचा खून करण्याच्या कामीं सहभागी होईल, ही गोष्टच अशक्य दिसते. तत्वप्रणालीच्या बावतींत मूलभूत मतभेद असूनही गांधीजींचा सावरकरांच्या बाबतीत विश्वास व सद्भाव होता. महासभेनें नेहरू सरकारला पाठिंबा दिलाच पाहिजे ही गोष्ट खुद्द सावरकरांनींही बऱ्याच वेळां सांगितलेली आहे. सावरकरांच्या मनांत गांधीजींच्याविषयीं द्वेष होता हें दाखविण्याजोगा क्षुल्लकही पुरावा फिर्यादी पक्ष सावरकरांच्या असंख्य भाषणांतून व कागदपत्रांतून काढून दाखवूं शकलेला नाहीं. म्हणून सावरकरांचें कटांत अंग असेल हें विश्वासार्हच नाहीं.'

'शिवाय प्रत्यक्ष राजकीय जीवनाच्या धकाधकींतून अंग काढून घेऊन स्वस्थपणें आयुष्य घालवीत राहिलेली श्री. सावरकरांसारखी व्यक्ति कटांत भाग घेईल, हें म्हणणेंच विचित्र दिसतें.'

'सावरकरांच्या बाबतींत आपण काय निर्णय द्याल याबद्दल मला तिमात्र शंका वाटत नाहीं. परंतु केवळ 'निर्दोषी' एवढें म्हणून सावरकरांचें समाधान होणार नाहीं. त्यांच्या चारित्र्याला यत्किंचितही कलंक लागणार नाही असा निर्णय आपण त्यांचे बाबत देणें जरूर आहे.'

**स्वातंत्र्य वीर. सावरकरांची जबानी—**

प्रस्तुत खून खटला 'सावरकरांचें भवितव्य' व अितिहासांतील त्यांचें स्थान ठरविणार होता. 'या खटल्यांत जर ते दोषी ठरले असते तर त्यांच्या आजवरच्या देशकार्यास काळिमा फासला जाणार होता. जी अवस्था 'सूर्याजी पिसाळाची' झाली, जी दशा 'कलुषा कबजीची' झाली, जी स्थिति 'बाळाजीपंत नातू'ची झाली त्याच मालिकेंत 'सूर्याजी पिसाळ' नसूनही, 'कलुषा कबजी' नसूनही 'बाळाजी-पंत नातू' नसूनही सावरकर हे कायमचें गोंवले गेले असते. आणि अुभ्या आयुष्यांत 'कीर्तीची हांव' धरली नसली तरी 'अपकीर्तीचा कलंकही' त्यांनीं अपेक्षिला नव्हता. निदान कीर्तीच्या अुद्यानांत विहरतां आलं नाहीं, लोकप्रियतेच्या हिंदोल्यावर हिंदोलतां आलं नाहीं, तरी दुष्कीर्तीच्या नरकांत लोळत पडावें अशी अिच्छा ही कांहीं सावरकरांनीं खासच केली नव्हती. पण आज प्रत्यक्षांतच तो प्रसंग घडू पहात होता. सहाजीकच त्यांच्या डोळ्यांत पाणी तरळलं नि गालांवर ओघळू लागलं. अेका अिंग्लिश वर्तमानपत्रानं या पवित्र जलांतच सावरकरांचं 'निर्दोषत्व' प्रतिबिंबित झालं आहे. असं लिहिलं. सावर-करांनीं आपली जबानी दिली. त्यावेळीं त्यांनी सांगितलं—

'आपल्या स्वराज्याला धोक्याच्या पक्षकलहापासून व यादवी-पासून वांचविण्यासाठीं क्रांतीमय प्रवृत्तीला सनदशीरपणाचें वळण देणें आवश्यक असल्यानें हिंदुमहासभा व कॉंग्रेस या दोन संघटना अेका महान आघाडीवर अुभ्या रहाव्यात व मध्यसरकारचे हात मजबूत व्हावेत, अशीच माझी अिच्छा होती. या अिच्छेनुसारच मीं नवीन राष्ट्रध्वज स्वीकारला व आपल्या निवासस्थानीं तो फडकाविला. आजारी असतांही दिल्लीस सर्व पक्ष हिंदु परिषदेला गेलों व मध्य सरकारला पाठिंबा देणारा प्रस्ताव संमत केला. डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी यांची नेमणूक याच कारणासाठीं आम्हांस मान्य होती.'

'हिंदुस्थानची फाळणी होअूं नये याकरितां मीं शक्य ती चळवळ केली. पण १९४७ मध्यें आपल्या मातृभूमीचें अखेर विच्छेदन झालेंच! पाकिस्तान जन्माला आलें खरें, पण हिंदुस्थानचा अेक मोठा प्रदेश परकियांच्या मगरमिठींतून मुक्त झाला. **माझ्या देशाला स्वातंत्र्य मिळालेलें पाहण्यास मीं जगलों याचीच मला धन्यता वाटली.**'

'आसिंधु सिंधुपर्यंत आमच्या मातृभूमीचें अैक्य परत घडवून आणण्याची आकांक्षा आम्हीं सोडली नव्हती. परंतु ती आकांक्षा पूर्ण होण्यासाठीं सुद्धां जें मिळालें आहे त्याचें जतन करणें आवश्यक असल्यानें मध्यसरकार मजबूत करणें हें आपलें परमकर्तव्य आहे असेंच मीं जनतेच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. आजच्या नेतृत्वांत जर कांहीं बदल घडवून आणावयाचा असेल तर तो सनदशीर मार्गानेंच घडवून आणला पाहिजे असें मीं प्रतिपादिलें आहे.

'यावरून फिर्यादी पक्षाचीही खात्री पटेल कीं, माझ्या विरुद्ध करण्यांत आलेल्या आरोपापैकीं अेकही गुन्हा मी केलेला नाहीं किंवा तसा गुन्हा करण्याचें मला कांहीं कारणही नाहीं. फिर्यादी पक्षानें माझ्यावर ज्या कटाचा किंवा कटाच्या संगनमताचा जो आरोप केला आहे त्यांत माझें मुळीच अंग नव्हतें हें मीं निक्षून सांगतो. अशा प्रकारच्या गुन्ह्याच्या योजनेची मला कसलीही माहिती नव्हती. मीं पूर्णपणें निर्दोषी आहे. मी सादर केलेल्या सर्व कारणांचा साकल्यानें विचार करून माझ्या चारित्र्यावर कसल्याही प्रकारचा शिंतोडा न अुडवितां न्यायमूर्तींनीं माझी तावडतोब मुक्तता करावी, अशी न्यायालयाला माझी विनति आहे.'

कैफीयत वाचण्यास सावरकरांना अेक तास वीस मिनिटें लागलीं. आपल्या जबानींतील देशविच्छेदनाबाबतचा भाग ते वाचूं लागतांच सावरकरांच्या भावना अितक्या अुचंबळून आल्या कीं, त्यांच्या डोळ्यांवाटे अक्षरशः घळघळा अश्रुधारा वाहूं लागल्या. 'मातृभूमीच्या राजकीय स्वातंत्र्य संग्रामांतील अेक सैनिक या नात्यानें मीही सतत ५० वर्षे लढलों असून माझ्या पिढीच्या कोणत्याही लोकसेवकांअितकाच देह दंड मी सोसला आहे व स्वार्थत्याग केला आहे.' अशीं वाक्यें अुच्चारतांना तर त्यांचा कंठ दाटूनच आला. हातरुमालांनीं गालांवर ओघळलेलीं आंसवें टिपून ते पुढें म्हणाले, 'अखेर स्वातंत्र्यसंग्रामांत विजय प्राप्त होअून स्वतंत्र व सार्वभौम हिंदी संघराज्य जन्माला आलें.' वरील अुद्गारांच्या वेळीं सावरकरांच्या भावनाशीं सारें न्यायालय अेकरूप झाल्यानें कांहीं काळ न्यायालयांत गंभीर शांततेचें वातावरण निर्माण झालें होतें.

**निकाल व सुटका—**

न्यायालयापुढें सावरकरांबाबत आलेला कपोलकल्पित व नाटकी पुरावा, स्वत: स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं न्यायालयांत दिलेली बिनतोड जबानी आणि स्वातंत्र्यवीरांचा बचाव करणाऱ्या बॅ. दासांचें निश्चयी, ठाम भाषण यांवरून सावरकरांविषयीं निकाल काय लागेल तें ठरलें होतें. न्यायमूर्तींनीं 'स्वातंत्र्यवीर सावरकर पूर्णपणें निर्दोषी आहेत.' असाच निकाल दिला. निकाल सांगतांना न्यायमूर्ती म्हणाले,

'माफीच्या साक्षीदारानें दिलेल्या साक्षीवरून सावरकरांच्या बाबतींत कोणताही निर्णय करणें बरोबर होणार नाहीं.

'दि. २० जानेवारीला व दि. ३० जानेवारी १९४८ ला दिल्ली येथें जे गुन्हे घडले त्यांत सावरकर यांचा कांहीं हात होता अशी कल्पना करण्याचेंही कारण नाहीं.'

'सावरकर यांच्यासंबंधीं जो पुरावा आला आहे त्यावरून नथुराम गोडसे व आपटे हे सावरकर सदनापुढें उतरून सावरकर यांना भेटावयास गेले हें कोणत्याही रीतीनें सिद्ध होत नाहीं. सावरकर सदनांत सावरकरच रहात होते असें नाहीं. तेथें भिडे व दामले हेही होते. २७ जानेवारी १९४८ ला कोट्टीयन याच्या साक्षीप्रमाणें गोडसे, आपटे व बडगे हे शिवाजी पार्कमध्यें गेले एवढें सिद्ध होतें. परंतु हा पुरावा माफीच्या साक्षीदारानें सावरकर यांनीं गोडसे व आपटे यांना कांहीं सांगितलें व तें माफीच्या साक्षीदारानें ऐकलें असें शाबीत करूं शकत नाहीं.'

'माफीच्या साक्षीदारानें आपल्या साक्षींत सांगितलें आहे कीं, 'यशस्वी होऊन या' असें गोडसे व आपटे यांना सावरकर म्हणाले, पण जो पुरावा दाखल झाला आहे त्यावरून सावरकर आणि नथूराम गोडसे व आपटे यांच्या दरम्यान वरील वाक्य उच्चारण्यापूर्वी कोणतें भाषण झालें हें शाबीत होत नाहीं. म्हणून जें वाक्य सावरकर यांनीं त्या दोघांना उद्देशून म्हटलें तें महात्मा गांधींच्या खून करण्याच्या कटा-बाबत होतें असें समजण्याला कांहीं कारण नाहीं.'

'म्हणून मीं सावरकरांना त्यांच्यावरील आरोपांतून संपूर्ण मुक्त करीत आहे. सावरकर पूर्णपणें निर्दोषी आहेत.'

**गळलेले दुवे—**

सरकारी वकिलांचें आरोपपत्र, सावरकर संबंधित साक्षीदारांच्या साक्षी, सावरकरांच्या वकिलांचें भाषण, स्वातंत्र्यवीर सावरकरांचें बचावाचें भाषण आणि न्यायमूर्ती आत्माचरण यांचें सावरकरांबद्दलचें निकालपत्र वाचूनही वाचकांस प्रश्न पडेल कीं सरकारी वकिलांनीं सावरकरांवर आरोप लादतेवेळीं ज्या ज्या गोष्टी सांगितल्या त्या सर्वांचं निराकरण एवढ्यानेंच होणार नाहीं. उदाहरणेंच घ्यावयाचीं तर पुढीलप्रमाणें घेता येतील.

(१) गोडसे व आपटे यांजवर सावरकरांचें फार वजन होतें.

(२) गोडसे व आपटे सावरकर यांना आपले 'गुरु' व 'मार्गदर्शक' मानत.

(३) गोडसे व आपटे यांच्या 'अग्रणी'स सावरकरांचा आशीर्वाद होता. त्यास त्यांनीं १५००० रुपयांची आर्थिक मदत केली होती.

( ४ ) अग्रणीवर प्रतिदिनीं सावरकरांचा फोटो छापलेला असे.

( ५ ) आरोपींचा सावरकरांशीं घनिष्ट संबंध होता.

या सर्व गृहीत कृत्यांच्या पत्त्यांचा बंगला सावरकरांनीं आपल्या निवेदनांत स्पष्टीकरणाच्या वाऱ्यानें कोसळून लावला आहे. वास्तविक सावरकरांची सर्वच जबानी येथें द्यावयास हवी होती. कारण ती हृदयास पीळ पाडणारी, डोळ्यांतून अश्रू झिरपविणारी, वाक्यावाक्यागणिक विद्वत्तेचे, मुत्सद्दीपणाचें, बिनतोड कोटिक्रमाचें व हजरजबाबीपणाचें तेज प्रगट करणारी आहे. त्यांत जणूं सावरकरांनीं आपलं हृदयच ओतलं आहे नि ते ओरडून सांगत आहे, 'मी निर्दोष आहे, संपूर्ण निर्दोष आहे, मी निष्कलंक आहे.' पण ही जबानी अति विस्तृत असल्याकारणानें संपूर्ण देतां येत नाहीं. तरीही अत्यंत आवश्यक अशा प्रश्नांचा खुलासा करणं अगत्याचं असल्यानं सावकरांचा तेवढा बचाव घेणं जरूर आहे.

सावरकर यांनीं खुलासा करतांना सांगितलें.–'न्यायालयापुढें आलेल्या पुराव्यावरून हें सिद्ध होतें कीं, आपटे व गोडसे हे बुद्धीचे गुलाम नव्हते. त्यांच्या मनास पटेल तेंच ते करत असत. कोणा एका व्यक्तीच्या सांगण्यास ते मान देऊन करत असत असें त्यांच्या बाबतींत 'असने' विद्वत्त्व वा कर्तृत्व नव्हतें. आणि याचेंच प्रत्यंतर म्हणजे बार्शीच्या अधिवेशनांत ते भोपटकरांच्यावर सुरा घेऊन धांवले तें व मीं स्वातंत्र्य दिनादिवशीं राष्ट्रध्वज माझे निवासस्थानावर फडकविला त्याबद्दल त्यांचा तीव्र असंतोष झाला हीं होत.'

आपटे व गोडसे सावरकरांना 'गुरु' 'मार्गदर्शक' अथवा 'थोर दैवत' मानत हा कांहीं सावरकांचा दोष वा अपराध नव्हे. आजही असे अनेक महाभाग आहेत कीं, ते अेखाद्या व्यक्तीस पूज्य वा दैवत मानतात. पण कार्य मात्र स्वतःच्या जबाबदारीवरच करतात. कालीमातेला 'दैवत' समजणारे बंगाली 'काली'स बळी देतात याला जबाबदार कोण 'कालीमाता' धरावयाची काय? 'बुद्धा'स गुरु व दैवत मानणाऱ्या चिनी नि जपान्यांनीं जी घोर हत्या केली, रक्ताचे पाट वाहविले, पराकियांवर अत्याचार केले, खाण्यामध्येंहीं मांसाहार वापरला त्यास जबाबदार कोणास 'बुद्धास' धरावयाचें? अथवा संभाजीच्या 'दुर्वर्तना'बद्दल शिवाजीच्या व्यक्तिमत्वास बळी द्यावयाचें? किंवा बलसाडच्या फेरमतमोजणींत मतपत्रिका फाडण्याची जी निंद्य कारवाअी झाली तिला 'मोरारजींचीच' फूस होती असें म्हणावयाचें? याबद्दल सावरकर म्हणतात 'गांधींना गुरुस्थानीं व देवस्थानीं मानणाऱ्या त्यांच्या अनेक अनुयायांनीं ४२ च्या लढ्यांत त्यांच्या नांवाचा जयजयकार करून डाके घातले. कित्येक खून केले. सर्वत्र असंतोष माजविला. म्हणून त्याबद्दल गांधींना दोषी ठरवून ब्रिटिश सरकारनें त्यांजवर खटला भरला कां? तसेंच अग्रणीवर माझा फोटो आपटे-गोडसे छापीत म्हणून त्यांच्या धोरणास मीं जबाबदार कसा? टिळकांचा फोटो केसरीवर असतो म्हणून आजच्या केसरींतील प्रत्येक वाक्याला टिळकच जबाबदार आहेत असें समजण्याअितपत हें हास्यास्पद आहे. दुसरें असें, मीं अितर हिंदुत्वनिष्ठ वृत्तापत्रांस मदत देत असे तशीच 'अग्रणी'स दिली आहे.'

आणि आज 'कॉंग्रेसचे पदाधिकारी आपल्या वृत्तपत्रांना जिल्हा-

निहाय सढळ हातांनीं मदत देत आहेत' ही जनतेची ओरड अैकली तर सावरकरांचेवरील आर्थिक सहाय्याबद्दल आरोप किती फुसका व 'दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ दिसतें पण स्वतःच्या डोळ्यांतील मुसळ मात्र दिसत नाहीं' अशा स्वरुपाचा आहे हें ठरतें. यानंतरही गोडसे-आपटे यांच्या घनिष्ट संबंधाबद्दल सावरकर म्हणाले—

'मीं अध्यक्ष होतों तोंवर महासभेच्या कार्यकर्त्यांशीं माझा संबंध येअी. कार्यकर्त्यांचीही पत्रं येत. अेखाद दुसरें माझें अुत्तरही त्यास जात असें पण कोणत्याही प्रमुख पुढाऱ्यास या गोष्टी कराव्याच लागतात. गोडसे आपटे हे महासभेचे कार्यकर्ते होते. अितर कार्यकर्त्याप्रमाणेंच माझा त्यांचेशीं संबंध येअी अेवढेंच महासभेचे अध्यक्षपद सोडलेनन्तर माझा महासभेशीं व सहाजीकच कार्यकर्त्यांशीं संबंध तुटला.'

**सावरकर सुटले. पुढें काय?—**

अशा प्रकारें सावरकरांचा 'गजेंद्र मोक्ष' झाला. 'सरकारी' नक्रानें स्वातंत्र्यवीरांची 'प्रतिष्टा' भक्ष्य म्हणून जनसरोवरांत ओढली; परंतु बचाव समितीगजानें मगरीच्या तोंडांतून त्यांना ओढून काढलें. वास्तवीक या कटांत सावरकरांना सरकारनें ओढावयास नको होतें. कारण अध्यक्षपदाचा त्याग केल्यानंतर त्यांनीं राजकारणांत प्रत्यक्ष व धडाडीनें भाग घेतला नव्हता. स्वातंत्र्य मिळाल्याचा खराखुरा आनन्द त्यांना झाला होता. प्रसूतीच्या वेदना प्रसूतीलाच समजणार व मुलाचा खरा आनन्द तिलाच होणार आणि म्हणूनच सावरकर अशा स्वातंत्र्यांत 'सनदशीर मार्ग प्राप्त झाले असता' महात्माजीसारख्या थोर व्यक्तीच्या

खुनाच्या कटांत भाग घेणेंच अशक्य होते. पण दुर्दैव सावरकरांचें. दुसरें काय? म्हणूनच त्यांना खटल्यांत ओढावें असें सरकारला वाटलें.

तसेंच विधिमंडळांत सावरकरांची जप्त मालमत्ता मुक्त करणेबाबत श्री. रामभाऊ मंडलिकांनीं प्रश्न विचारला असतां मुंबअीच्या गृहमंत्र्यांनीं 'सावरकरांनीं देशहित करण्यापेक्षांही देशनाशच अधिक केला आहे. ते देशभक्त नसून देशद्रोही आहेत' असे पूर्वग्रहदूषित अुद्गार काढले. ही सरकाराची सदोष नजर असल्यामुळें सावरकरांवर खटला भरला. वृद्धावस्थेंतही त्यांना कारावासाचा व मानसिक विवंचनेचा त्रास दिला. अेवढेंच नव्हे तर कुप्रसिद्ध लियाकत—नेहरू करार झाला त्यावेळीं परत त्यांना तुरुंगांत टाकलें. म्हातारपणीं हिंडलग्यासारख्या दूरच्या तुरुंगांत डांबलें. कुटुंबीय मंडळींनाही भेटूं दिलें नाहीं. ज्या स्वातंत्र्याकरता सावरकरांनीं सर्व हयात झिजवली, हाडांचीं काडं केलीं, रक्ताचं पाणी केलं, मांसाचं खत केलं त्या स्वातंत्र्यांत सावरकरांवर बंदीवान होण्याची वेळ यावी, त्याच स्वातंत्र्यांत आम्हीं जनतेनं त्यांना पायाखालीं तुडवावं, बाबाराव सावरकरांसारख्यांचा दुःखद अंत अुघड्या व निर्विकार डोळ्यांनीं पहावा, नारायणराव सावरकरांना लाठ्यांचा मार देऊन त्यांच्या मृत्यूस कारणीभूत होऊन त्यांनीं केलेल्या सेवेची अशी फेड करावी, भारतमाते! यापरते तुझ्या देशाचा दुर्लौकिक तो काय?

पण तरीही, माते, तुला दोष देणेची जरूर नाहीं. ब्रिटिश सरकारनें सावरकरांना शिक्षा देतांनाच मुळीं १९१० ते १९६० अशी ५० वर्षांची दिली आहे. ब्रिटिश सरकार गेलें, आपलें सरकार आलें, तरी

स्वातंत्र्यवीरांवर अप्रत्यक्ष बंधनें आहेतच. याचाच अर्थ अद्यापही सावरकर तुरुंगांतच आहेत व त्यांची पूर्ण मुक्तता १९६० सालीं म्हणजे आणखी आठ वर्षांनीं व्हावयाची आहे. तोंवर सावरकरांना असेंच अपमानास्पद जीवन कंठावें लागणार!

आणि असें जिणें चुकलें आहे कोणाला? ज्ञानेश्वरांचे त्यांचे ह्यातींत हालच झाले. तुकारामांची कोण दैना केली! रामदासांच्या व शिवाजीच्या कार्याची थोर महती त्यांच्या मृत्यूनंतरच कळली. अगदीं ताजे अुदाहरण घ्यावयाचें तर आगरकरांचें. ते जिवंत असतांना त्यांची प्रेतयात्रा काढली, नेताजी सुभाषचंद्र बोसांना मायदेश जिवंतपणीं सोडावा लागला. पण आज त्यांच्या मृत्यूनंतर जनता त्यांना डोक्यावर नाचवत आहे. म्हणूनच म्हणतात—

'सजीव तोंवरि लत्ता देती,
मरतां घेती खांद्यावरती,
अुफराटा सन्मान.'

# — धुक्यांतून बाहेर —

मुलांनो ! आतांपर्यंत आपण सावरकरांचें जीवन चारित्र्य न्याहाळलें. आपलें सर्व आयुष्य त्यांनीं राष्ट्रासाठीं झिजवलें, हेंही आपण पाहिलें. अशा शूर देशभक्ताला अद्यापही आपण पूर्णपणें ओळखलें नाहीं असेंच मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. कारण कान टवकारून जनतेंत वाव-रणाऱ्या कांहीं पुढाऱ्यांची सावरकरांबाबतची कुजबूज ऐकली तर सर्वत्र त्यांचेविपर्यीच्या गैरसमजाचें धुकें हेतुपुरःसर पसरविलें जात आहे हें स्पष्ट दिसेल.

कुणी म्हणतात सावरकर जातीय आहेत, कुणी म्हणतात प्रांतीय आहेत, कुणी म्हणतात संकुचित व प्रतिगामी आहेत; तर कुणी म्हणतात ते धर्मबुडवे आहेत. मराठी भाषेचे ते कसाई आहेत असेंही म्हणण्यास कुणी कचरत नाहीं. या प्रकरणांत आपणास खरोखरच ते तसे आहेत का याचाच विचार व तोही खुद्द त्यांच्यांत शब्दांत करा-वयाचा आहे व गैरसमजाच्या धुक्यांतून बाहेर पडावयाचें आहे.

**सावरकर जातीय आहेत काय ?—**

जो उठतो तो म्हणत सुटतो कीं, सावरकर जातीय आहेत. कारण काय तर ते केवळ हिंदुधर्माचाच नि हिंदूजातीच्याच हिताचा विचार करतात. मागें अेका प्रकरणांत आपण सावरकरांनीं 'हिंदुधर्मावर' लक्ष कां केंद्रित केलें याचा विचार केलाच आहे. १९३७ साली ते हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदावरून म्हणाले होते कीं—

'हिंदू हे सार्वलौकिक संयुक्त हिंदी राष्ट्र बनविण्यास समुत्सुक आहेत आणि आपले कोणतेही राखून ठेवलेले असे स्वतंत्र हक्क वा अधिकार हिंदुस्थानांतील अहिंदु वर्गावर मुळींच लादूं अिच्छित नाहींत.

'पण तें हिंदीराज्य मात्र निर्भेळ असूं द्या. त्या राज्यानें मताधिकार, नोकऱ्या, हुद्दे, कर यांच्या संबंधांत धर्माच्या व जातीच्या तत्त्वांवर कसल्याहि मत्सरोत्तेजक भेदभावांना मुळींच थारा देअूं नये. त्या हिंदी राज्यांतील सर्व नागरिक त्याच्या त्याच्या वैयक्तिक गुणावगुणानुसार वागविलें जाअूं द्या. कोणतीही जात किंवा पंथ, वंश किंवा धर्म विचारांत न घेतां 'अेक मनुष्य अेक मत' असा सर्वसामान्य नियम होअूं द्या. अशा स्वरुपाचें हिंदी राज्य जर दृष्टीपुढें धरावयाचें असेल तर हिंदुसंघटनवादी स्वतः हिंदू संघटनाच्या हितार्थ त्या राज्याला अन्तःकरणपूर्वक पहिल्यानें आपली निष्ठा अर्पितील.'

असें शुद्ध राष्ट्रीय प्रतिपादन करणारे सावरकर जातीय कसे ?

**सावरकर प्रांतीय व संकुचित आहेत काय ?—**

सावरकरांना जातीय संबोधण्यांत जी चूक होते तीच त्यांना

प्रांतीय व संकुचित म्हणण्यांत होते. सावरकरांनीं असें डागाळलेलें धोरण कधींच स्वीकारलें नाहीं. त्यांनीं प्रांतीयतेचा अभिमान धरला पण मर्यादित. तें स्पष्टच म्हणतात कीं, 'देशाभिमानाच्या आड न येणारा प्रान्ताभिमान दाखविण्यांत मला मुळींच कमीपणा वाटत नाहीं. मात्र हा प्रांताभिमान अितर प्रान्तांची अवहेलना करण्यास प्रवृत्त होणार नाहीं याची प्रत्येकानें काळजी घेतली पाहिजे.'

असा अितरही प्रांतियांचा प्रांताभिमान जाणणारे व त्यांच्या भावना जाणून त्या भावनांस जपणारेही सावरकर प्रान्तीय ठरतील कसे?

आणि केवळ हिंदुस्थानापुरतेंच न पाहतां जगांतील अितर राष्ट्रांकडे वारकाअीनें पाहणारे सावरकर संकुचित तरी कसे ठरतील? त्यांचे कर्णावतीचें (अहमदाबादचें) अध्यक्षीय भाषणच पहा ना. त्यांत त्यांनीं नेपाळचा विचार केला आहे. फ्रेंच हिंदुस्थान नि पोर्तुगीज हिंदुस्थान यांचा विचार केला आहे. अितकेंच नव्हे तर जगाच्या पाठीवर असलेल्या प्रत्येक राष्ट्रांतील आपल्या प्रत्येक बांधवाच्या सुखदुःखाचा विचार केलेला आहे. जणूं कांहीं सावरकर हे स्वतंत्र राष्ट्राचे पंतप्रधान आहेत नि त्यांनीं आपल्या राष्ट्राचें परराष्ट्रीय धोरण आखलेलें आहे. तें विशाल धोरण आखतांना ते म्हणतात,

'आपल्या सहधर्मीय देशबांधवांपैकीं जे आफ्रिका, अमेरिका, मॉरिशस नि असेच जगाचे अितर भाग यांतून जाअून तेथें कसलाही गाजावाजा न करतां महत्तर हिंदुस्थानची अुभारणी करीत आहेत; आणि तसेंच जे बलिद्वीपांतल्याप्रमाणें अद्यापहि आपल्या हिंदुजातीच्या प्राचीन जागतिक साम्राज्याचें अभिमानास्पद अवशेष टिकवून धरून

राहिलेले आहेत त्याहि सर्वांना सहानुभूतीचा नि प्रेमळ स्मृतीचा संदेश पाठविण्याचें आम्हीं विसरूं शकत नाहीं. समग्र हिंदूजगाची 'पितृभू' नि 'पुण्यभू' असें हें आपलें भारतवर्ष त्याची स्वतंत्रता, सामर्थ्य नि महता यांच्याशी त्यांचीं भाग्यें सुद्धां अविभाज्य रीतीनें बद्ध झालेलीं आहेत.'

'तद्वतच हिंदुस्थानांतील तथाकथित 'फ्रेंच हिंदुस्थान' नि 'पोर्तुगीज हिंदुस्थान' या भागांत राहत असलेल्या हिंदूंचाही आम्हांस विसर पडणें शक्य नाहीं. आजच्या या कृत्रिम नि बलात्कृत राजकीय विभागणीचा विचार अेकीकडे ठेवला तर आपण सर्व रक्त, धर्म नि देश यांच्या टिकाअू बंधांनीं अविभाज्य रीतीनें अेकत्र बांधलेलेच आहोंत. कांहीं झालें तरी आपण आपलें ध्येय म्हणून निश्चयपूर्वक घोषित केलेंच पाहिजे कीं, अुद्यांचा हिंदुस्थान हा काश्मीरपासून रामेश्वरापर्यंत नि सिंधपासून आसामपर्यंत केवळ संयुक्त म्हणून नव्हे तर अभिन्न राष्ट्र म्हणून अेक नि अविभाज्यच राहिला पाहिजे!'

**सावरकर प्रतिगामी व धर्मबुडवे आहेत काय ?—**

सावरकरांवरील 'ते जातीय आहेत, प्रांतीय आहेत, संकुचित आहेत' हे आरोप कसे फोल आहेत व निराधार आहेत तें पाहिलेंच. आतांचे हे जे आरोप आहेत ते परस्परविरुद्ध आहेत. प्रतिगामी मनुष्य धर्मबुडवा असूंच शकत नाहीं व धर्मबुडवा मनुष्य प्रतिगामी असूं शकत नाहीं. साहजिकच सावरकर 'पुरोगामी'च आहेत व 'धर्मवीर पण सुधारक धर्मवीर' आहेत. कारण अुघडच आहे. जें जें

नवें त्याचा त्यांनीं पुरस्कार केला आहे. यंत्राचें स्वागत केले आहे. कारखान्यांचें स्वागत केले आहे. विज्ञानाची त्यांनीं कास धरली आहे. विधवांच्या विवाहाचा पुरस्कार केला आहे. जरठ–कुमारी विवाहाचा निषेध केला आहे. जाती उपजातींचा व भोळसट व घातक रूढींचा विच्छेद केला आहे, बळजोरीनें भ्रष्ट झालेल्या स्त्रियांचा चांगल्या मनानें समाजानें स्वीकार केला पाहिजे, असाच त्यांनीं पुरस्कार केला आहे.

असें असूनही त्यांनीं धर्मग्रंथ जाळा म्हणून सांगितलें नाहीं. हिंदुधर्माचा तळपट होवो असा कुःशापहि दिला नाहीं. उलट त्यांनीं त्यांचा आदरच राखला आहे. मंदिरांचें पावित्र्य पटविलें आहे. देवतांचें मांगल्य राखलें आहे. ते म्हणतात—

'त्या काळच्या (प्राचीन काळच्या) परिस्थितींत आपल्या पूर्वजांस जें जें करतां येण्याजोगें होतें नि जीं साधनें त्यांना उपलब्ध होतीं, त्यांच्याकडे पाहतां तीं त्यांच्या बुद्धीमत्तेचीं निदर्शकच मानली पाहिजेत नि या दृष्टीनें अखिल हिंदूंनीं कृतज्ञतेनें, अभिमानानें, आदरानें त्यांस सन्मानिलें पाहिजे.'

पण ते केवळ श्रुति-स्मृति पुराणोक्तांतच गुरफटून गेले नाहींत; तर ते लगेच पुढें म्हणतात —

'आम्हीं कोणताहि ग्रंथ अपरिवर्तनीय आणि त्रिकालाबाधित मानीत नाहीं. श्रुतिस्मृति प्रभृति सारे ग्रंथ आम्हीं अत्यंत कृतज्ञ आदरानें आणि ममत्वानें सन्मानितों, पण ऐतिहासिक ग्रंथ म्हणून

अनुल्लंघ्य धर्मग्रंथ म्हणून नव्हे. त्यांतील सारें ज्ञान आणि अज्ञान आजच्या विज्ञानाच्या कसोटीस आम्हीं लावणार आणि त्यानन्तर आज राष्ट्रधारणास अवश्य असेल तें बेधडक आचरणार. आम्ही अद्यावत् बनणार, अपटुडेट बनणार.'

**सावरकर व भाषाशुद्धि—**

अशा प्रकारें 'अप टु डेट' बनण्याची महत्त्वाकांक्षा मनाशी बाळगली असतां त्यांनीं मराठी भाषेच्या शुद्धीकडे लक्ष पुरविलें. स्वतः सावरकर मराठी भाषेंतील नांवाजलेले व कसलेले प्रतिभावान साहित्यिक आहेत. स्वयंसिद्ध भावनोत्कट व सुरूप कवि आहेत; बुद्धिवादी आणि श्रद्धावादि, स्वयंस्फूर्त आणि तेजस्वी तसेंच चढाओढखोर नाटककारही आहेत; म्हणून तर त्यांना रत्नागिरी साहित्य सम्मेलनाच्या व सांगली नाट्यशताब्दि महोत्सवाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला. एका मुलाखतींत त्यांनीं सांगितलं होतं, 'मी वृत्तीनें कवि व कलावत आहे, पण परिस्थितीनें मला राजकारणी पुरुष केलें आहे.'

आणि तें खोटेंही नाहीं. अंदमानांत असतांना त्यांनीं रचलेलीं काव्यें, महाकाव्यें मनांतून गुणगुणूं लागलों तर याची सत्यता पटेल. 'चांदोबा चांदोबा भागलास कां? लिंबुणीचे झाडावर बसलास कां? लिंबुणीचे झाड करवंदी, करवंदी, मामाचा वाडा चिरेबंदी, चिरेबंदी, मामाच्या वाड्यांत येऊन जा, येऊन जा! तूप रोटी खाऊन जा, खाऊन जा!' हें त्यांचें जानपद व शिशू गीत तर बालसृष्टींत व वाङ्मय क्षेत्रांत अमर होऊन राहिलें आहे. मराठीं भाषेंत त्यांनीं

अशीं बरीच मोलाची भर घालून ते मराठी भाषेला कायमचें ललामभूत लेणें होऊन बसले आहेत.

अशी मराठीची मनोभावें सेवा करणारे सावरकर मराठी भाषेच्या नरडीला नख लावतील हें संभवतें कसें? पण त्यांनीं स्वीकारलेल्या भाषाशुद्धीच्या धोरणास त्यांचें विरोधक हीच उपमा देतात. स्वतःचा गैरसमज ( हेतुतः अगर अहेतुतः ) करून घेतात व अितरांचा तसा तो करून देतात. वास्तवीक सावरकरांनीं मराठी भाषेस मृतावस्था प्राप्त व्हावी, ती दुर्बोध, क्लिष्ट व अशुद्ध व्हावी; तिचं माधुर्य नाहींसें व्हावें अशा प्रकारची भाषाशुद्धी व्हावी असं कधींच सांगितलं नाहीं. त्यांनीं सांगितलेलीं भाषाशुद्धीचीं मूलतत्वें वा सूत्रेंच तपासाना.

( १ ) गीर्वाण भाषेंतील साराचा सारा संस्कृत शब्दसंभार आणि संस्कृतनिष्ठ अशा तामील, तेलगू ते आसामी, काश्मिरी, गोंड, भिल्ल बोलीपर्यंत ज्या आमच्या प्रांतिक भाषाभगिनी आहेत त्या सर्वांतील मूळचे प्रांतिक शब्द हे सर्व आमच्या राष्ट्रभाषेच्या मूलधन-राजकीय शब्दांचें भांडवल होय.

( २ ) ह्या आपल्या राष्ट्रीय शब्दभांडारांत ज्या वस्तूंचे वा विचारांचे वाचक शब्द होते वा आहेत वा निर्मिता येतात त्या अर्थाचे अुर्दू, अिंग्रजीं प्रभृति परकीय शब्द वापरूं नयेत. जर तसे परकीय शब्द आपल्या पूर्वीच्या ढिलाअीमुळें आपल्यांत घुसले असतील तर त्यांना हुडकून काढून टाकावें; अद्यतन विज्ञानाची परिभाषा नवनवे संस्कृत-प्राकृतोत्पन्न शब्द पाडून व्यक्तविली जावी.

( ३ ) परंतु ज्या परदेशी वस्तु अित्यादि पूर्वी आपल्या अिकडे नव्हत्या, त्यामुळें ज्यांना आपलें स्वकीय जुने शब्द सांपडत नाहींत. आणि ज्यांना त्यांच्या त्या परकीय शब्दासारखे सुटसुटीत स्वकीय शब्द काढणें दुर्घट जातें, त्यांचे परकीय शब्द मात्र आपल्या भाषेंत जसेच्या तसे घेण्यास प्रत्यवाय नसावा. जसें बूट, कोट, जाकीट, गुलाब, जिलबी, बूमरँग, टेबल, टेनिस अित्यादि. तथापि अशा नव्या वस्तु आपल्याकडे येतांच जर कोणीं त्यांनाही स्वकीय नांवें रुळून दाखवतील तर अुत्तमच.

( ४ ) त्याचप्रमाणें जगांतील कोणत्याहि परकीय भाषेंत जर अेखादी शैली, वाक्प्रयोग, मोड ही सरसहा चटकदार वाटली तर तीहीं आत्मसात करण्यास अडकाठी नसावी.

अशीं चार सूत्रें सांगून सावरकर विरोधकांना राष्ट्रीय स्वाभिमानापायी नि स्वभाषेच्या प्रतिष्ठेसाठीं कळकळीची विनंति करतात कीं, त्यांनीं (विरोधकांनीं) अेक आठवडाभर तरी भाषाशुद्धी विरुद्ध त्यांचें जे कांहीं पूर्वग्रह असतील ते अगदीं अेकाबाजूस ठेवावे, समालोचकाला शोभेल अशा शांत नि समाहित मन:स्थितित भाषाशुद्धीचीं वर दिलेलीं मूलसूत्रें तेवढीं पुढें ठेवावीं आणि स्वत:ला विचारावें कीं, पराकियांनीं तलवारीच्या बळावर आमच्यावर जीं परराज्यें स्थापलीं त्याच परदास्याचा परिणाम म्हणून घुसलेल्या या दास्यशीलतेच्या सूक्ष्म रोगाणूंना, आपल्या मनोभूमींतच परशत्रूंनीं अुभारलेल्या या आमच्या पराभवाच्या सूक्ष्म स्मारकांना-या अनवश्यक अिंग्रजी, अुर्दू शब्दांना-आज आमचाही दिवस अुगवला असतां, विधर्मीय नि विराष्ट्रीय राज्यसत्ता आज आम्हीं

अुखडून टाकली असतां ह्या अनावश्यक परकीय शब्दांनाही कां अुखडून टाकूं नये? आपले स्वकीय शब्द कां वापरूं नयेत? निदान तसें कोणी वापरले तर त्यांत वावगे काय आहे?

अशाच भावनेनें अिंग्रजीला अुखडून आयर्लंडनें गलिक भाषा पुनरुज्जीवित केली, अरेबीला अुखडून तुर्कांनीं स्वकीय तुर्की भाषा जिवंत केली नि गेली हजार वर्षे जी अक्षरशः मृतप्राय झालेली होती ती हिब्रू भाषा गेल्या अवघ्या दहा वर्षांत ज्यूनीं नुसती जिवंत केली नाहीं तर ती राष्ट्रभाषा नि राज्यभाषा करून सोडून परराष्ट्र दूतागारां-तहि तीच वापरली पाहिजे म्हणून ठरवून टाकलें! अशाच वीरोचित भावनेनें शिवछत्रपतींनीं राज्यव्यवहार कोश लिहविला. त्याच वीरोचित भावनेनें प्रेरित होअून आमच्या राष्ट्रभाषेचें साहित्यमन्दिर संस्कृत निष्ठतेच्या बळकट नि पवित्र पायावर अुभारावयास हवें.

## — अमर पत्र —

मित्रांनो, अीश्वरानें आपल्यापैकीं प्रत्येकाची भूमिका ठरवून टाकली आहे. आपण आपली प्रत्येकानें भूमिका वठवावी यासाठीं आपली ताटातूट होत आहे. अीश्वरानें नेमून दिलेली भूमिका वठवित असतांना प्रसंगीं जळत्या खडकांना बांधून कोंडून पडावें लागेल. प्रसंगीं कीर्तिच्या अुसळणाऱ्या लाटांच्या शिखरांवर स्वार होतां येअील, कधीं आपण लोकांना दिसूं, तर कधीं अदृश्य राहूं. कधीं आपण अवनत होअूं, तर क्वचित अुन्नत होअूं ! जगन्नियंत्यानें कोणत्याहि परिस्थितींत ठेवलें तरी ती परिस्थिति सर्वोत्तम आहे असें मानून आपण असें समजलें पाहिजे कीं, आपलें जीवितकार्य अेकाकी पार पाडणें हेंच आपल्या वांट्याचें कार्य आहे.

अेकाद्या अुदात्त पौर्वात्य नाटकांत भरतवाक्याच्या वेळीं नाटकांत मेलेलीं व न मेलेलीं सर्व पात्रें अेकत्र जमतात. आपण सगळे अति-

इासाच्या अफाट रंगमंदिरांतील असंख्य नटच आहोंत. आपल्या कृतींची प्रशंसा करणारे मानवजातिरूपी प्रेक्षक टाळ्या वाजविण्यासाठीं आपल्यासमोर बसलेले आहेत. हे प्रेक्षक कृतज्ञ व आनंदी बनून जोरजोरानें टाळ्या वाजवतील तेव्हां त्या टाळ्यांचा गरजणारा आवाज दऱ्याखोऱ्यांपर्यंत जाऊन दुमदुमेल !

प्रेमळ मित्रांनो, तो क्षण येईपर्यंत रामराम !

★

माझा देहपात होऊन माझ्या अस्थि आणि रक्षा कोठें पडतील याचा नेम नाहीं. अंदमानचें वातावरण आधींच निर्जन व भेसूर आहे. तेथें वाहणाऱ्या नदी-नाल्यांचा उदासवाणा तेथील आवाज मूळच्या निर्जनपणाला अधिकच भेसूर बनवित असतो. कदाचित माझ्या अस्थि नि रक्षा त्या उदास नदी नाल्यांच्या जवळ पडून राहातील. किंवा असेंहि घडेल कीं, मध्यरात्रीं आपला नियत खेळ आकाशांत खेळणाऱ्या तारकांचें प्रतिबिंब पोटांत सामावून घेणाऱ्या गंगामातेच्या स्फटीक शुद्ध प्रवाहाच्या शेजारीं कोठेंतरी माझ्या अस्थि नि रक्षा पडून राहातील ! त्या कोठेंहि पडलेल्या असोत ! श्रीरामानें आपल्या आवडत्या लोकांचा पक्ष विजयधवल ठरविला आहे, दुष्टांना माघार घ्यावी लागली आहे, आणि त्यांचा पाय जेथून पुढें पडला तेथवर त्यांना मागें हटविण्यांत आलें आहे. आपला हा भारतवर्ष वैभवांत उभा आहे, मानव जातीचें

मार्गदर्शन करणारा दीपस्तंभ म्हणून यापुढें तो तेजास्वतेनें तळपत राहील असा पुकारा झाला, आणि, 'हौतात्म्य गाजविणाऱ्या विचार-वीरांनो नी कृतिवीरांनो, तुम्ही ज्या संग्रामात लढलात आणि पडलात तो संग्राम यशस्वी झाला, उठा!' अशी घोषणा झाली कीं, त्यावेळीं त्या पडून राहिलेल्या अस्थि-आणि ती पडून राहिलेली रक्षा यांच्यात फिरून तेज आणि चैतन्य सळसळूं लागेल!

तोंवर प्रिय मित्रांनो, रामराम!

★

हें पत्र स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं आपल्या स्नेह्यांना ब्रिस्टल तुरुंगांतून पाठविलें. काव्य–प्रतिभा व देशभक्ति यांचा संगम घडलेले सुंदर स्थळ म्हणून याचा साहित्यसम्राट केळकरांनीं निर्देष केला आहे. स्वातंत्र्य प्राप्त होईपावेतों त्यांनीं आपल्या सर्व स्नेह्यांचा निरोप घेतला आहे नि स्वातंत्र्य प्राप्त होतांच स्वातंत्र्याचा जयघोष निनादण्यासाठीं आपल्या अस्थीसुद्धां तेजानें भरून सळसळू लागतील अशी काव्यमय व ओजस्वी कल्पना यांत त्यांनीं रंगवली आहे.

स्वातंत्र्यवीरांच्या पुण्याईनें त्यांना 'याचि देहीं याची डोळां' स्वातंत्र्य पहावयास मिळालें. पण ज्या हुतात्म्यांचे आधीच प्राण पंचमहा-

भूतांत विलीन झाले आहेत, त्या सर्व हुतात्म्यांच्या अस्थि आज आतां १० मेच्या 'हुतात्मा सांगता दिनीं' भारताच्या पूर्ण स्वातंत्र्यांत अुच्चस्वरानें पुकारा करतील.

'हौतात्म्य गाजविणाऱ्या विचारवीरांनो नि कृतिवीरांनो, तुम्ही ज्या संग्रामात लढलात आणि पडलात तो संग्राम यशस्वी झाला, अुठा!'

स मा प्त